
१५०९
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
क्र. २९६८



# राष्ट्रसंघ

## [ लीग ऑफ नेशन्स ]

भा॰ सि॰ चिंचुनखुरे

REFBK-0018165

इंडिया
पब्लिशिंग हाऊस
मुंबई २२

८८६०६

संदर्भ

निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
निबंध
अनुक्रम ८८६०६ वि:
२९६८ नों: दि 39-3-02

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# राष्ट्र संघ

## ( The League of Nations )

मराठी ग्रं संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७८६०५ वि ... दि ३/३/७
क्रमांक २९८५ नों दि

: लेखक :

भा. सि. चिंचुनसुरे

एम्. ए., एल्एल्. बी., बी. एड्.

REFBK-0018165

मूल्य ८ रुपये

९८९६५

इंडिया पब्लिशिंग हाऊस, मुंबई २२.

प्रकाशक :

नरेन्द्र मलिक

इंडिया पब्लिशिंग हाऊस,
२५१ कामदार चेंबर्स,
(पूर्व) सायन, मुंबई २२.

© १९७१ भा. सि. चिंचुनघुरे

प्रथमावृत्ती : १५ ऑगस्ट १९७१

मुद्रक :
ज. श्री. टिळक,
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ,
पुणे ३०.

मूल्य ६ रुपये

GOVERNOR OF MAHARASHTRA
सत्यमेव जयते

RAJ BHAVAN,
Poona–7,
24 July 1970

Shri B. S. Chinchunsure has brought to my notice two publications of his, one on the League of Nations and the other on the United Nations. Unfortunately, because they are both in Marathi, I am still in the course of learning that language, I have not been able to profit by reading either book. From all that I have read and heard about both books, however, and from all I know about their author, I am sure that they would be worthwhile reading. Looking at the list of contents, both books appear to be the result of considerable labour and study.

Much less is known of the League of Nations than of the United Notions to-day for the simple reason that the one belongs to the past and the other belongs to the present and is a force to be reckoned with. However, it should not be forgotten that the United Nations owes much of its important activities, particularly in the economic, social and legal fields, to the League of Nations. Even otherwise, the United Nations represents in a wider and more representative form the same concept of an international organization for the maintenance and promotion of peace, economic co-operation, human rights, the independenee of nations and the rule of international law. In so representing these purposes, it has derived a lot of lessons from the experience – the gains as well as the disappointments – of the League of Nations. No student of the one can, therefore, ignore the other.

The Marathi speaking public needed information on both these institutions and I am glad that Shri Chinchunsure has undertaken to provide it.

( Ali Yavar Jung )

# पुरस्कार

माझे विद्यार्थीमित्र श्री. भाऊराव चिंचुनसुरे यांनी लिहिलेला हा लीग ऑफ नेशन्सवरील प्रबंध आज प्रकाशित होत आहे.

जागतिक शांतता टिकविण्यासाठी लीग किंवा युनोसारख्या आंतरराष्ट्रीय संघटना अत्यंत आवश्यक आहेत, हे कोणीही नाकबूल करणार नाही. जागतिक शांतता हे आज कम्युनिस्ट चीन सोडून जगातील सर्व राष्ट्रांचे उद्दिष्ट आहे. भारताची परराष्ट्रनीती तर जागतिक शांततेवरच निर्भर आहे. अशा परिस्थितीत सर्व नागरिकांना आंतरराष्ट्रीय संघटनांचा व्यवस्थित परिचय असणे आवश्यक आहे. सध्याच्या युगात युद्ध की शांतता हा महत्त्वाचा प्रश्नही लोकमतावरच सोडविला जातो.

लीग ऑफ नेशन्स आणि युनो या संघटनांसंबंधी श्री. चिंचुनसुरे यांचे अध्ययन फार सखोल आहे. शिवाय त्यांची या संघटनांवर आणि जागतिक शांततेवर नितांत श्रद्धा आहे. त्यांनी लीगवर लिहिलेले हे पुस्तक विद्यार्थी, शिक्षक व सर्वसामान्य नागरिक यांना अतिशयच उपयोगी पडेल, अशी मला खात्री वाटते.

श्री. चिंचुनसुरे यांनी लीगच्या अपयशाची कारणेही सांगितली आहेत. त्यांचा बोध घेऊन लीगच्याच मार्गाने युनो जाणार नाही याची आपण सर्वांनी काळजी घेतली पाहिजे.

श्री. चिंचुनसुरे यांनी लेखांच्या स्वरूपात पुष्कळ लेखन केले आहे. ते एक यशस्वी शिक्षक आहेत. स्वतंत्र ग्रंथनिर्मितीचा हा त्यांचा पहिलाच प्रयत्न असून तोही सर्वांच्या चिकित्सेत चांगला उतरेल असा मला भरवसा आहे.

श्री. नरेंद्र मलिक, इंडिया पब्लिशिंग हाऊस यांनी या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली व पुस्तक प्रसिद्ध करून लोकांना सादर केले त्याबद्दल त्यांचेही मी अभिनंदन करतो.

श्री. चिंचुनसुरे यांना शुभेच्छा व्यक्त करून त्यांच्याकडून याहीपेक्षा अधिक श्रेष्ठ साहित्याची अपेक्षा आहे, असे मुद्दाम नमूद करून ठेवतो.

**ना. य. डोळे**

एम. ए., पीएच्. डी.

प्राचार्य

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,

उदगीर, ( जि. उस्मानाबाद )

## शाळा व कॉलेज विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त पुस्तक

श्री भा. सि. चिंचुनसुरे यांनी लिहिलेले 'राष्ट्रसंघ' ( The League of Nation ) हे मराठी भाषेतील पहिले व एकमेव प्रकाशन आहे. या पुस्तकाने इतिहास व राज्यशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची फार मोठी अडचण दूर झाली आहे. सर्व विद्यालये व महाविद्यालयातून राष्ट्रसंघाची माहिती दिली जाते. तरी पण मराठीत या विषयावर आतापर्यंत एकही ग्रंथ प्रकाशित होऊ शकला नाही. आता अशा या आवश्यक व महत्त्वाच्या विषयावर मराठी भाषेत पुस्तके प्रकाशित होऊ लागली आहेत, ही घटना स्वागतार्ह आहे.

पहिले महायुद्ध समाप्त झाल्यानंतर पुन्हा असले महाभयंकर प्रलयकारी युद्ध होऊ नये या हेतूने राष्ट्रसंघ ही संघटना स्थापन करण्यात आली. पण दुर्दैवाने दुसरे महायुद्ध सुरू झाले व ही संघटना बळी पडली, नामशेष झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्र ही नवी संघटना जन्मास आली.

जागतिक शांततेची आस धरणारी ही संघटना जर चिरकाल टिकवावयाची असेल तर यापूर्वीच्या राष्ट्र संघात कोणकोणते दोष होते, याचे परीक्षण होऊन ते नवीन संघटनेमध्ये टाळता आले पाहिजेत; तरच यूनो टिकेल. अखिल मानव-जात वाचेल. जगात शांतता नांदेल. यासाठी राष्ट्रसंघाचा सांगोपांग अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली आहे. श्री. चिंचुनसुरे यांनी ही गरज कांही अंशाने का होईना पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी सारस्वतात या एकमेव पुस्तकाची भर घालून त्याने तिला विभूषित केले आहे.

राष्ट्र संघाची भारताबद्दल काय भूमिका होती, तसेच भारताचा या संघाशी संबंध कसकसा येत गेला याबद्दल विशेष संशोधन करून हे पुस्तक लिहिले गेले आहे.

**हेमचंद्र धर्माधिकारी**
प्राचार्य
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि. नांदेड

# दोन शब्द

जगातील सर्व महान विभूती, त्याचप्रमाणे सर्व राष्ट्रे विश्वशांतीसाठी आज प्रयत्नशील आहेत. प्राचीन काळापासून शांततेसाठी निरनिराळ्या प्रकारचे प्रयत्न होत आहेत. तरीही विश्वशांतीची समस्या आजही कायम आहे. संयुक्त राष्ट्रे अर्थात युनो ही संघटना विश्वशांतीसाठी प्रयत्न करते. त्याबरोबरच मानवी जीवनाच्या विकासासाठीही ती सतत कार्यरत असते.

संयुक्त राष्ट्रांच्या पूर्वी विश्वशांतीच्या प्रस्थापनेच्या कार्यात अयशस्वी झालेली आणि अल्पायुषी ठरलेली अशी राष्ट्रसंघ ही संस्था होती. या संस्थेचे स्वरूप समजून घेणे आज देखील अगत्याचे आहे. राष्ट्रसंघाच्या ठिकाणी कोणत्या उणिवा होत्या किंवा विश्वशांतीच्या कार्यात कोणत्या कारणामुळे तिला अपयश आले, हे लक्षात घेतले तरच वर्तमानकाळी त्यापासून आपणांस मार्गदर्शन मिळू शकेल. याच दृष्टीने राष्ट्रसंघ आणि संयुक्त राष्ट्रे यांच्या तुलनात्मक अभ्यासाला महत्त्व आहे.

संयुक्त राष्ट्रांची माहिती सामान्य जनांना करवून देण्यासाठी मराठीत थोडी का होईना पुस्तके लिहिली गेली आहेत. परंतु राष्ट्रसंघ या संस्थेची माहिती देणारे पुस्तक मात्र मराठीत नाही. मराठीमधील या विषयावरील पुस्तकाची उणीव अल्पांशाने का होईना पूर्ण करण्यासाठी मी या पुस्तकाचे लेखन करण्यास उद्युक्त झालो. माझा हा अल्पसा प्रयत्न विद्वत्संमत व्हावा अशी अपेक्षा बाळगतो.

प्राचार्य, डॉ. ना. य. डोळे यांनी या पुस्तकाचे संपूर्ण हस्तलिखित वाचून मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे प्रा. नरहरराव कुरुंदकर, डॉ. प्र. भा. मांडे आणि श्री. सुधाकरराव डोईफोडे, यांनीही मौलिक सूचना केल्या. या सर्वांच्या ऋणांचा निर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो. माझे मित्र श्री. पंडितराव देशपांडे व द्वा. ला. शर्मा यांच्या सहकार्याचा निर्देश करणेदेखील आवश्यक आहे.

या ग्रंथाच्या प्रकाशनाची जबाबदारी मेसर्स इंडिया पब्लिशिंग हाऊस, मुंबई यांनी स्वीकारल्यामुळेच हा ग्रंथ आपणासमोर येऊ शकत आहे. त्यासंबंधी कृतज्ञता व्यक्त केलीच पाहिजे.

**भा. सि. चिचुनसुरे**
एम्. ए., एलएल. बी., बी. एड.
धुंगराळा, ता. बिलोली, जि. नांदेड

# प्रकाशकाचे निवेदन

'राष्ट्रसंघ हे श्री. भा. सि. चिंचुनसुरे यानी लिहिलेले पुस्तक प्रकाशित करताना आम्हास आनंद होत आहे.

शाळा–कॉलेजातील विद्यार्थी आणि यूनोचे अभ्यासक यांना आजपर्यंत राष्ट्रसंघावर वाचण्यासाठी मराठीमधून कोणतेही पुस्तक उपलब्ध नव्हते. महाराष्ट्रातील पुणे, मुंबई, शिवाजी, नागपूर व मराठवाडा या विद्यापीठांच्या विविध परीक्षात या विषयावर प्रश्न विचारले जात असतात. मराठी भाषेत वरील विषयासंबंधी वाचण्यासाठी काहीं न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना अडचण भासत असे. ही उणीव दूर करण्यासाठी हे पुस्तक प्रकाशित केले आहे. श्री भा. सि. चिंचुनसुरे हे या विषयाचे व्यासंगी व अभ्यासू गृहस्थ आहेत. त्यांनी या पुस्तकात केवळ राष्ट्रसंघाचीच माहिती दिली आहे असे नाही, तर जरूर तेथे भारतीय संदर्भातून त्यांनी राष्ट्रसंघाचे विवेचन केले आहे. पुस्तक परीक्षोपयोगी तर आहेच; पण त्यापेक्षाही लेखकाने संशोधनाच्या भूमिकेतून माहिती दिली आहे. म्हणून त्याच्या प्रकाशनासाठी आम्ही प्रवृत्त झालो.

आमचे हे प्रकाशन सर्वांना आवडेल अशी अपेक्षा आहे.

**इंडिया पब्लिशिंग हाऊस,**
**सायन (पूर्व) मुंबई– २२**

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | राष्ट्रसंघापूर्वी | १ |
| २. | राष्ट्रसंघाचा उदय | १४ |
| ३. | राष्ट्रसंघाची प्रमुख उद्दिष्टे आणि मूलभूत तत्त्वे | १९ |
| ४. | राष्ट्रसंघाची प्रमुख अंगे | २६ |
| ५. | दुय्यम अंगे | |
| ६. | राष्ट्रसंघाचे कायदेशीर स्वरूप | ४८ |
| ७. | राष्ट्रसंघाचे कार्य | ४९ |
| ८. | राष्ट्रसंघ अयशस्वी का ? | ७० |
| ९. | राष्ट्रसंघ आणि भारत | ९९ |
| १०. | समारोप | १०८ |
| ११. | राष्ट्रसंघ व संयुक्त राष्ट्रसंघ यांची तुलना | ११३ |
| | परिशिष्टे | ११८ |



आमचे गाव कासार सिरसी !
या गावच्या शांततेसाठी व
गावकऱ्यांच्या सेवेसाठी ज्यांनी
आपली उभी हयात घालविली
व देह झिजविला, त्या आमच्या
तीर्थरूप कै. सिद्रामप्पा पाटील
(अप्पा) चिंचुनसुरे यांच्या
पुण्य स्मृतीस —



राष्ट्रसंघाचे आद्य प्रणेते वुड्रो विल्सन



पंतप्रधान लॉईड जॉर्ज



डॉ. फ्रिजॉट नानसेन,

राष्ट्रसंघाचे पुनर्वसाहत हाय कमिशनर

१८१६५

# राष्ट्रसंघापूर्वी

मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. समाजाभिमुख राहण्याची त्याची सदैव प्रवृत्ती असते. तो आपल्या विचारांशी सहमत असणाऱ्या, आपल्या भावनांशी एकरूप होऊ शकणाऱ्या अशाच लोकांचा सहवास मिळवू पाहात असतो. परंतु विचारभिन्नतेमुळे मानवाचे विविध गट निर्माण झाले. त्यामुळेच निरनिराळे समाज बनले. या समाजांच्या मूलभूत ध्येय-धोरणातील फरकानुसार निरनिराळ्या वादांचा ( isms ) उदय होत गेला. परस्परांतील मतभेदांमुळे व स्वतःचे वर्चस्व ठेवण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीमुळे इतरांना अंकित करणे अथवा इतरांवर कायम प्रभुत्व मिळाविणे, असे प्रकार साहजिकच निर्माण होऊ लागले. भिन्न भिन्न समाजातील सातत्याने चालू असलेले संघर्ष, लहानसहान लढाया व पुढे मोठी युद्धे हा ह्याच परिस्थितीचा परिणाम होय.

जगातील कोणत्याही देशाचा इतिहास पाहिला तर एवढे निश्चित ध्यानात येते की, लढाया, युद्धे हीच इतिहासाची घडी बदलण्यास कारणीभूत झाली आहेत. अर्वाचीन असो किंवा प्राचीन असो, इतिहास हा लढाई आणि युद्धांनी भरलेलाच आहे. इतरांवर आक्रमण करून त्यांना आपल्या अंकित करणे किंवा दुसऱ्या प्रांतास, देशास, आपल्या साम्राज्यात मिळवून घेणे यासाठी प्रत्येक राजाची धडपड होती. काहींचे तर एखादा प्रदेश जिंकूनही समाधान होत नसे. उदाहरणार्थ, सिकंदर वा नेपोलियन. संपूर्ण जगाचे स्वामित्व मिळविण्याचा निश्चय करूनच युद्धासाठी निघाले होते. एवढीही आक्रमणाची व इतरांना

जिंकण्याची हाव-असे. यामुळे युद्धे ही अपरिहार्य बनली. राज्यकर्त्यांचा तो एक स्थायीभाव बनत गेला.

महाभारताचे युद्ध, स्पार्टा–अथेन्स यांच्यातील युद्ध, प्युनिक युद्ध, पानिपतची लढाई किंवा अगदी अलीकडील रशिया-जपान यांच्यातील युद्ध ( १९०४–५ ) अथवा पहिले व दुसरे या दोन्ही जागतिक महायुद्धांच्या बरोबर या सर्वांचा विचार केल्यास प्राणहानी, अर्थहानी व शांतता-सुख-समृद्धीच्या जीवनाचा ऱ्हास या गोष्टी सर्वच युद्धांत घडल्याचे लक्षात येते. प्रत्येक लहानमोठ्या युद्धानंतर शांतता राखण्याचा तात्पुरता का होईना प्रयत्न होत असे. अशा प्रयत्नांची रूपरेषा खालीलप्रमाणे आहे :

इसवी सनापूर्वी दोन–अडीचशे वर्षे सम्राट अशोकाने बौद्ध धर्माच्या शिकवणुकीने प्रेरित होऊन जागतिक, राजकीय शांतता स्थापण्याचे प्रयत्न केले. अशोकानंतर पाच–सहाशे वर्षांनी पाश्चिमात्य राजे पोपच्या नेतृत्वाखाली जागतिक शांततेसाठी प्रयत्न करीत होते. हे सर्व प्रयत्न वैयक्तिक स्वरूपाचे होते. संघटनेचे स्वरूप त्यास अजून प्राप्त झाले नव्हते. मध्ययुगात एकीकडे पाश्चिमात्य जगात राजकारणामध्ये राष्ट्रराज्याची ( Nation State ) कल्पना मूळ धरू लागली. याच सुमारास दुसरीकडे सामुदायिक स्वरूपाचे जागतिक शांततेचे प्रयत्न सुरू झाले. ह्या दोन्ही प्रक्रिया सारख्या एकमेकींवर परिणाम करीत होत्या. हे प्रयत्न फक्त पाश्चिमात्य देशांतच झाले. कारण तेथील राष्ट्रे स्वतंत्र आणि सार्वभौम होती. असे सामुदायिक स्वरूपाचे प्रयत्न कालांतराने विसाव्या शतकाच्या सुमारास बहुतांशाने साकार झाले.

पाश्चिमात्य जगात स्टॉईक तत्त्ववेत्त्यांनी प्रथमतः विश्वशांतीसाठी वैचारिक भूमिका निर्माण केली. मानवजातीच्या सर्वंकष वैचारिक,

नैतिक व भावनात्मक ऐक्याचा त्यांनी पुरस्कार केला. विश्वनागरिकत्वाची कल्पना प्रथम जगासमोर त्यांनीच मांडली. ग्रीक आणि रोमन यांनी राष्ट्राराष्ट्रांतील संघर्ष कमी करण्याकरिता काही आंतरराष्ट्रीय संकेत बनविले होते. परंतु कायम स्वरूपाच्या दृष्टीने विश्वशांतीच्या बाबतीत यातून भरीव असे काहीच निष्पन्न झाले नाही.

शांतता प्रस्थापित करण्यासाठी अनेक राष्ट्रांना संघटित करावे अशी कल्पना चौदाव्या शतकाच्या आरंभास एकदा कार्यान्वित झाल्याचे दिसून येते. एकोणविसव्या शतकात १८१५ साली स्पेन, रशिया, ऑस्ट्रिया, प्रशिया, वगैरे राष्ट्रांचा जो पवित्र करार ( Holy Alliance ) झाला त्यात ठराविकच राष्ट्रे सम्मीलित होती. जवळ जवळ चाळीस वर्षे या करारामुळे युद्ध मात्र झाले नाही. पण यामुळे युरोपीय राष्ट्रांच्या सामर्थ्यामध्ये वाढ होत जाऊन साम्राज्यवादाचा उदय झाला. विश्वशांतीची गरज तशी त्याही पूर्वीपासून भासत होती. सतराव्या शतकात रूसो, कांट यांनी विश्वशांतीचा पुरस्कार केला. ह्यूगो ग्रोशस यांनी विश्व-शांतीसाठी ( Law of War and Peace ) हा अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिला. त्याचा सर्व राज्यकर्त्यांनी व मुत्सद्यांनी अभ्यास देखील केला. ह्या ग्रंथा-द्वारे त्यांनी काही मार्गदर्शक तत्त्वे जगासमोर मांडली. त्यांतील ठळक तत्त्वे अशी :

१– राष्ट्राराष्ट्रांत समता प्रस्थापित करावी.

२– कोणी कोणावर आक्रमण करू नये. यासाठी परस्परांशी अनाक्रमणाच्या कराराने स्वतःला बांधून घ्यावे.

३– जेव्हा अपरिहार्य होईल अशा वेळीच फक्त स्वतःच्या संरक्षणासाठी युद्धास प्रवृत्त व्हावे.

४– जित राष्ट्राशी सहिष्णुतेने वागावे.

५– राष्ट्राराष्ट्रांतील संबंध हे बळावर न ठरविता न्यायावर ठरवावे.

**सत्तासमतोलाचा सिद्धांत:–** याच काळात युरोपातील राष्ट्रवादाचा अतिरेक होत असल्याचे राजकीय तत्ववेत्यांना जाणवले. या राष्ट्रवादाच्या अतिरेकास पायबंद बसावा आणि त्यामुळे पुढे पर्यायाने युद्धे होऊ नयेत, म्हणून ( Balance of Power ) सत्तासमतोलाचा सिद्धांत बनविला गेला व ( Concert of Europe ) 'युरोपियन एकीकरण मंडळ' स्थापन करण्यात आले. विश्वकुटुंबवादाच्या दिशेने निर्माण झालेली ही पहिली कल्पना होय. युरोपियन एकीकरण मंडळाने आंतरराष्ट्रीय मतभेद व संघर्ष शांततेच्या मार्गाने सोडविण्याचे प्रयत्न केले; पण दुर्दैवाने वसाहतवादाच्या स्पर्धेतून युरोपात लवकरच युद्धे निर्माण झाली व युरोपियन एकीकरण मंडळ विस्कळीत झाले.

नेपोलियनचा पाडाव झाल्यानंतर १८१५ साली व्हिएन्ना परिषदे-( कॉंग्रेस ) मध्ये व त्यानंतर वेळोवेळी झालेल्या बैठकीतून मेटर्निक व कॅसल-रे यांच्या नेतृत्वाखाली शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न झाले. हे प्रयत्न सुद्धा अल्पजीवीच ठरले.

इ. स. १८७२ मध्ये रशिया, ब्रिटन व ऑस्ट्रिया या तीन राष्ट्रांच्या सम्राटांमध्ये करार ( League of Three Emperors ) झाला. तो असा की, तिन्ही सम्राटांनी युरोपीय राष्ट्रांतील शांततेसाठी देखरेख स्वतःच व एकमेकांच्या सल्ल्याने करावी. क्रांतिकारी प्रवृत्तींना वेळीच पायबंद घालावा, पण या करारामुळे सुद्धा युरोपातील शांतता अधिक काळ टिकू शकली नाही.

**हेग शांतता परिषद :–** इ. स. १८९९ मध्ये हेग येथे पहिली शांतता परिषद भरली. त्या परिषदेमध्ये मानवसमाजाच्या कल्याणार्थ युद्धखर्चात कपात करणे अपरिहार्य ठरविले गेले. परंतु परिषदेमध्ये सर्वांची इच्छा शांततेची असली तरी त्या त्या राष्ट्रात युद्धाची तयारी जोराने चालू होती. इ. स. १९०७ मध्ये हेग येथेच पुन्हा दुसरी

शांतता परिषद भरली. या परिषदेने पूर्वीच्या परिषदेत सम्मत झालेले ठराव पुन्हा सम्मत केले. पण हे सर्व ठराव कागदावरच राहिले. दुसऱ्या शांतता परिषदेच्या ठरावावर चर्चा करून एकमताने संमती दर्शवून देखील काही प्रमुख राष्ट्रे शस्त्रास्त्रनिर्मिती करीतच राहिली. शस्त्रास्त्रनिर्मिती-बरोबरच राष्ट्राराष्ट्रांत सहकार्याची व समझोत्याची साखळी पण जुळत होती. विशेषतः युरोपीय राष्ट्रे व्यवहाराच्या क्षेत्रात एकसंध होत होती. विसाव्या शतकाची सुरुवात म्हणजेच युरोपीय देशांच्या सांस्कृतिक व भौतिक विकासाचे नवे पर्व होय. विश्वकुटुंबत्वाचे व मानवतावादाचे वारे सर्वत्र वाहू लागले होते. फक्त वसाहतवादाचा एक मुद्दा सोडला तर इतर बाबतींत एकमेकांना सहकार्य करण्याचे तत्त्व सर्वांनी अगदी सरळपणे स्वीकारले होते. सहकाराबाबतची खालील उदाहरणे उल्लेखनीय आहेत.

१८७५ साली आंतरराष्ट्रीय पोस्टल युनियन, पॅरिस येथील १९०७ मध्ये स्थापन झालेली सार्वजनिक स्वास्थ्यविषयक आंतरराष्ट्रीय समिती व कार्यालय, रेड क्रॉस, वजने व मापे, इत्यादी विषयींच्या संघटना, कॉपीराइटचा कायदा, तसेच आंतरराष्ट्रीय शेती–संस्था, पॅन अमेरिकन संघ, आंतरराष्ट्रीय मजूर संस्था, या व अशा अनेक संस्था या वेळी निर्माण झाल्या व त्या आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करू लागल्या. आंतरराष्ट्रीय सहकार्याविषयी जिव्हाळा निर्माण झाला. १८५६ ते १९१४ या काळात अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय संस्था तीस-पेक्षाहि अधिक होत्या. अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय संस्थांचे स्वरूप समजण्यासाठी कॉपीराइटच्या कायद्याचे उदाहरण पुढे देत आहे.

**कॉपीराइटचा कायदा** :— कॉपीराइटचा कायदा प्रमुख आंतरराष्ट्रिय संस्थेपैकी एक आहे. १८५८, ६१, ७७, ७८ व ८३ या काळात लेखक, पत्रकार, ग्रंथकार, ग्रंथपाल, कलाकार व इतर विद्वान प्रतिनिधींच्या झालेल्या परिषदांमधून लेखन व प्रकाशनासंबंधाच्या

मूलभूत हक्कांची जोपासना करण्याच्या दृष्टीने विधायक योजना आखण्यात आल्या. १८८६ च्या बर्नच्या सभेतील चर्चासत्रात ही कल्पना समूर्त झाली. परंतु १८९६ चा पॅरिस कायदा, १९०८ च्या सुधारणा आणि १९१४ ची दुरुस्ती या तिन्ही प्रकारच्या कारवायांनंतर या कायद्याला एक निश्चित असे स्वरूप प्राप्त झाले. *

कॉपीराइट कायद्यान्वये कोणत्याही राष्ट्रातील व्यक्तीने ग्रंथरूपाने प्रसिद्ध केलेल्या लिखाणाचे पुनर्मुद्रण करण्यास बंधन घालण्यात आले. यामुळे वैचारिक क्षेत्रातील घडामोडींना लेखन व प्रकाशनातील कार्यक्षेत्राला संरक्षण लाभले. यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर लेखन, प्रकाशन व तत्सम इतर प्रकारांची देवाण-घेवाण अधिक सुसूत्र झाली व प्रकाशन-व्यवसाय वृद्धिंगत होत गेला.

**युद्धे का व कशी होत असत? :–** इतिहासाच्या अगदी प्रारंभासूनच युद्धाला सुरुवात झाली आहे. भारतात किंवा अन्य देशांत झालेल्या युद्धांचा इतिहास पाहिला तर आपणांस असे दिसते की, ही सर्व युद्धे प्रामुख्याने राज्यतृष्णा भागविणे, संपत्तीची लूट करणे, या किंवा तत्सम कारणासाठी झालेली आहेत. प्राचीन काळात राज्यतृष्णा हे प्रमुख कारण होते असे दिसते. लहान राज्यांचे राजेसुद्धा जय्यत तयारीनिशी व युद्धकौशल्याच्या जोरावर मोठ्या राज्यांवर चाल

---

* "वसाहत कॉपीराइटचा" कायदा ( Colonial Copy Right ) इ. स. १९११ च्या कॉपीराइट या कायद्यान्वये ब्रिटिश साम्राज्यात येणाऱ्या सगळ्या वसाहतींना एकच समान ( Comprehensive ) कायदा लागू करण्यात यावा, अशी योजना करण्यात आली. होती ----- भारत मुलुखातील इ. स. १९११च्या कायद्याच्या अमलाखाली होता; पण १९१४ मध्ये संमत झालेल्या स्थानिक फेरबदल आणि विशेषतः कॉपीराइटच्या अटीवर घालण्यात आलेल्या मर्यादा यांचेसह हा कायदा भारतास लागू करण्यात आला.

करून जात असत व प्रदेश जिंकून आपल्या राज्यास जोडून घेत असत. मोठे राजे आपल्या शेजारच्या आसपासच्या छोट्या राज्यांचा काही अपराध नसतानादेखील त्यांचेवर हल्ला करीत, लूट करीत किंवा जबरदस्तीने मांडलिकत्व पत्करण्यास भाग पाडीत हे नेहमीचे दृश्य होते. यातच त्यांना भूषण वाटत असे.

दुसरे कारण धर्मप्रसाराचे होय. धर्मप्रसारासाठी युद्धे झाल्याची बरीच उदाहरणे इतिहासात आहेत. इस्लामी राज्यकर्त्यांनी, तसेच ख्रिश्चनांनी धर्मप्रसारासाठी रणांगणे पेटविल्याचे प्रसंग फारच ठळक आहेत.

तिसरे कारण, असुरक्षिततेची जाणीव. प्रत्येकाच्या ठिकाणी आक्रमक प्रवृत्ती ( Instinct of Pugnacity ) ही निसर्गतःच असते. या आक्रमक वृत्तीतून निर्माण झालेला अविश्वास व अविश्वासापायी दुसऱ्यावर आधी घाला घालण्याची अघोरी इच्छा व स्वसंरक्षणाच्या हेतूने झालेली युद्धे-देखील उल्लेखनीय आहेत.

" ----**माझाच देश खरा !**" एकोणिसाव्या शतकात युरोपात राष्ट्रवाद फोफावला. एकांगी राष्ट्रवाद व आत्यंतिक राष्ट्राभिमानाची भावना वर उफाळून आली. 'चूक असो अथवा बरोबर असो, माझाच देश खरा' ( My country ! right or wrong ) अशी भावना युरोपातील तरुण पिढीमध्ये रुजली, पोसली गेली. दोन राष्ट्रांतील मैत्रीपूर्ण तडजोडीमुळे आंतरराष्ट्रीय संकेत निर्माण होण्याऐवजी गटबंदी सुरू झाली. ( My ally right or wrong is the negation of any international ideal ) विसाव्या शतकातील युद्धाचे आत्यंतिक राष्ट्रवाद एक प्रमुख कारण आहे.

**युरोपची युद्धपूर्व स्थिती :–** विज्ञान व इतर भौतिक क्षेत्रांत होत असलेल्या देदिप्यमान प्रगतीच्या अगदी उलट नैतिक विचारांची व

परिस्थितीची अवस्था होत होती. अनीती म्हणजेच राजकीय नीती ही कल्पना या शतकाच्या आरंभापासून मूळ धरू लागली. या वेळेपर्यंत इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीने संपूर्ण युरोपात मूळ धरले होते. कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा व्हावा व पक्क्या मालास सुरक्षित बाजारपेठा लाभाव्यात म्हणून वसाहतवाद फोफावत होता. व्यापारी स्पर्धा, भांडवलशाहीचा प्रभाव व साम्राज्यवादाची तात्त्विक अपरिहार्यतेची जाणीव या औद्योगिक क्रांतीचे दृश्य परिणाम युरोपात ठळक दिसत होते.

विज्ञानाने शस्त्रास्त्रांच्या क्षेत्रात याच काळात क्रांतिकारक यश मिळविले होते. साम्राज्ये विकसित करण्यासाठी या नवीन शस्त्रांची निर्मिती अनेक पटींनी वाढविण्यात आली. शस्त्रांचे व त्यास पूरक अशा इतर उद्योगांचे कारखाने एकीकडे वाढू लागले तर, दुसरीकडे—शेतीकडे दुर्लक्ष होत गेले. प्रचंड औद्योगीकरणाच्या योजनांत आर्थिक व सामाजिक विषमता वाढत होती, बळावत होती. वर्णद्वेष व वंशद्वेषही जागृतच होते. मजुरांवर अन्याय होत होते. मार्क्स, एंजिल्सच्या तत्त्वज्ञानातील वर्गविग्रह व वर्गकलहाची भूमिका मजुरांत प्रभावीपणे जाऊन पोहोचली होती. त्यामुळे मजूर अन्यायाविरुद्ध सतत संघर्ष करू लागले. यातच लष्करीकरणामुळे अनेक लोक शेतीव्यवसाय सोडून लष्करात भरती झाले. देशांतर्गत बंडाळीची चिन्हे सर्वत्र निर्माण होऊ लागली व तिकडे लोकांचे लक्ष जाऊ नये म्हणून परदेशावर आक्रमणे करण्यात येऊ लागली. संपूर्ण युरोप या परिस्थितीच्या परिणामस्वरूप शीत युद्धांनी धुमसू लागला.

याच काळात जर्मनीचे एकीकरण झाले. बिस्मार्कने सामर्थ्यसंपन्न व संघटित केलेले जर्मन राष्ट्र संपूर्ण विश्व पादाक्रांत करण्याची स्वप्ने पाहू लागले. शस्त्रास्त्रांच्या तसेच लष्कराच्या आधुनिकीकरणामुळे नेत्रदीपक प्रगती करून विल्यम कैसरने आपले लष्कर युरोपात पहिल्या

प्रतीचे बनविले. यामुळे इतर राष्ट्रांनाही जर्मनीचे अनुकरण करावे लागल्याने लवकरच सर्व युरोपास लष्करी छावणीचे स्वरूप प्राप्त झाले.

राष्ट्राराष्ट्रांत सत्तास्पर्धा सुरू झाल्याने एकमेकांविषयी भीती, संशय, द्वेष वाढीस लागला. युद्धाची चक्रे फिरू लागली. साधनसामग्रीचे उत्पादन वाढले. लष्कर बलवान करण्याच्या दृष्टीने भूदल व नाविकदल यांच्यात वाढ झाली. आणि कैसर एक अत्यंत बलवान लष्कराचा तसेच प्रगतिशील राष्ट्राचा स्वामी बनला. कुठल्या तरी कुरापतीची जणू काही तो वाटच पाहत होता. सर्वांना त्याची दहशत निर्माण झाली. युरोपातील राष्ट्रांच्या शक्तिसमतोलाच्या तत्त्वाला हादरा बसला. आता केव्हाना केव्हा युद्ध भडकणारच असे गृहीत धरूनच जर्मनी, तुर्कस्थान आणि ऑस्ट्रिया एकीकडे व इंग्लंड, फ्रान्स, रशिया दुसरीकडे असे उघड उघड गट बनले ( Triple Alliance ) आणि पर्यायाने युरोपातील सर्व देश आपापसांतील विरोधानुसार परस्परविरोधी गटांत गुंफले गेले. आपले वर्चस्व वाढविण्यासाठी शस्त्रास्त्रांची निर्मिती व साठा यांची स्पर्धा सुरू झाली; आणि १९१४ साली पहिले महायुद्ध भडकले.

**युद्धाचे वैज्ञानिक स्वरूप** :– प्राचीन काळात धनुष्यबाण, भालेबरची, ढाल-तलवारी वापरत असत. पुढे बंदुकी, तोफखाने अशा प्रकारची युद्धसामग्री वापरून दोन सैन्ये समोरासमोर येऊन लढत असत. पण विसाव्या शतकात सैन्याच्या बळापेक्षा वैज्ञानिक शस्त्रबळाच्या पद्धतीला विशेष महत्त्व प्राप्त झाले.* पहिल्या युद्धात युरोपियन राष्ट्रांनी औद्योगिक आणि वैज्ञानिक प्रगतीचा उपयोग लष्करवादासाठी संहारक व

---

* It is to steel and oil and uranium not to martial order that modern nation must. look for victory in war."

–Burtrand Russel

विध्वंसक पद्धतीने केला. वैज्ञानिक प्रगतीमुळे आधुनिक शस्त्रसामर्थ्य वाढले. विज्ञानाचा अधिकाधिक उपयोग करण्यात आलेले पहिलेच युद्ध म्हणजे पहिले महायुद्ध होय. सैन्याचा संहार करणारे तोफखाने, कसल्याही उंचसखल, डोंगराळ, खडकाळ प्रदेशांतून सर्रास मार्ग काढणारे, जबरदस्त तोफांचे रणगाडे या युद्धातील वैशिष्ट्य म्हणून गणले जाते.

अशा आधुनिक युद्धाला **सार्वत्रिक युद्ध** ( Total War ) म्हटले जाते. अशा वेळी केवळ सैन्यच युद्धात गुंतलेले असते असे नव्हे, तर शस्त्रास्त्रनिर्मिती करणारे कारखाने, शस्त्रपुरवठा करणारी खाती, त्यांतील मजूर, त्यांना रसद पुरवणाऱ्या संस्था, धान्योत्पादन करणारे शेतकरी, आणि त्या सर्वांना पूरक असलेल्या संस्था, वगैरे संपूर्ण मानवी शक्ती युद्धातच गुंतलेली असते, युद्धात प्रतिस्पर्ध्यावर विजय मिळविण्याच्या प्रयत्नात अशा आघाड्यांना हतबल केले जाते. पर्यायाने ज्या बाजूच्या आघाड्या थंड पडतील त्या राष्ट्राला पीछेहाट करण्याची वेळ येते. म्हणूनच युद्धात, रणक्षेत्रावर असलेल्या लोकांइतकेच त्यांच्या पाठीशी असणाऱ्या लोकांवर युद्धाची जबाबदारी असते. अशा रीतीने दोन्ही आघाड्यांचे महत्त्व या युद्धात स्पष्ट झाले.

**पहिले महायुद्ध :—** वरील कारणांमुळे युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे आता कधी न कधी युद्ध भडकणारच असे गृहीत धरून युरोपियन राष्ट्रांत जर्मनी, तुर्कस्थान आणि ऑस्ट्रिया एकीकडे नि इंग्लंड, फ्रान्स व रशिया दुसरीकडे असे उघड उघड ( Triple Alliance ) तट पडले. अशातच ऑस्ट्रियाचा राजपुत्र मारला गेल्यामुळे युद्धाची ठिणगी उडाली व १९१४ साली महायुद्धाचा भडका उडाला.

पहिल्या महायुद्धात रणांगणावर असंख्य सैनिक मारले गेले. तसेच निरपराध अशा जनतेचेही जीवन उद्‌ध्वस्त, छिन्नविछिन्न झाले. ' न

भूतो न भविष्यति ' असा भयंकर दूरगामी परिणाम या युद्धामुळे झाला. रायफल्स, मशिनगन्स, रणगाडे, झेपलीन विमाने वगैरेंचा मोठ्या प्रमाणात उपयोग झाला. तसेच पाणबुड्या बोटी, युद्धनौका, टारपेडो यांच्या द्वारेही भयानक हल्ले झाले. समुद्रकिनाऱ्यावरील बंदरे, शहरे बेचिराख झाली. विमानाद्वारे बॉंबवर्षाव आणि पाणबुड्या, युद्धनौकांतून होणारा तोफांचा मारा यांमुळे कित्येक व्यापारी जहाजे, युद्धनौका उद्ध्वस्त होत; जलसमाधी घेत असत. या युद्धात विषारी वायूचाही वापर झाला. त्यामुळे हजारो मैल अंतरावरील लोकदेखील मृत्युमुखी पडले. बाल्टिक व उत्तर समुद्राला जोडणाऱ्या कील कालव्यात जर्मन आरमार कोंडले गेले होते. जर्मन पाणबुड्या सावधगिरीने, चोरून समुद्राबाहेर डोके काढीत व दृष्टिक्षेपात येणाऱ्या शत्रुनौकातळाला फोडून बुडवीत असत. असा जर्मन पाणबुड्यांनी धुमाकूळच माजविला होता. जर्मन युद्धनौकांनी तर कहरच केला होता. सुमारे तीन कोटी सैनिक या युद्धात गुंतले होते. शस्त्र व पैसा किती लागला ते सांगणे कठीण. सतत चार वर्षे चाललेल्या या युद्धात दोन ते अडीच कोटी लोक मारले गेले. जखमी व निकामी सैनिक जवळ जवळ दोन कोटी होते. सुमारे पन्नास लाख सैनिकांचा शेवटपर्यंत पत्ताच लागला नाही. संपूर्ण युद्धात सर्व राष्ट्रांची मिळून ५६ अब्ज पौंड संपत्ती खर्ची पडली. मानसिक दौर्बल्य, वेड लागणे, शारीरिक ऱ्हास व विषारी वायूमुळे, तसेच इतर विध्वंसक प्रकारांमुळे अनेक प्रकारचे रोग, दुर्बलता इत्यादी हानिकारक प्रकार वाढले.--- --- नीतिमत्ता खालावली, काळाबाजार व फसवणूक, लाचलुचपत, इत्यादी प्रकार वाढले. सामान्य जनतेचे जीवन पर्यायाने अस्थिर झाले. भविष्याविषयी वाटणारा आशावाद नामशेष झाला. युद्धात अमानुष प्रकारही फार झाले. नागरी जीवनाला त्याची झळ पोचली.

ही लढाई तीन खंडांत लढली गेली व सगळे जग या युद्धाग्नीने होरपळले गेले. युरोप खंडाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या संपूर्ण जगावर प्रभुत्व होते. साऱ्या जगाची अर्थव्यवस्था खिळखिळी झाली. चलन-विस्ताराने कमाल मर्यादा गाठली. विजयी आणि पराभूत दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांमध्ये आर्थिक परिस्थिती ताणली गेली. आर्थिक बोजा, हानी, अनैतिक, अमानुष प्रकार, राज्ययंत्रणेतील-नागरी जीवनातील विस्कळीतपणा, वगैरेमुळे जीवन उद्ध्वस्त झाले. बेकारी, उपासमार, दारिद्र्य वाढले. उद्योगधंदे बंद पडले. व्यापार थंड झाले आणि ही परिस्थिती केवळ युरोपातच नव्हे तर साऱ्या जगात पसरली. मानवजातीची फार मोठी हानी झाली. *

तहाच्या वेळी युरोपात सर्वत्र दुःख, गोंधळ, हाहाकार अस्थिरता पसरली होती. कॉलरा, विषमज्वर आणि तत्सम साथींचे रोग पसरले होते. व्यापार थंडावले होते. उद्योगधंदे मोडकळीस आल्यामुळे उपासमारीचा राक्षस घिरट्या घालीत होता. कुटुंबातील कर्ते युद्धात कामी आल्याने विधवा आणि मुले ज्यांवर अवलंबून राहिली, त्या नातेवाइकांची सर्व दृष्टीने शोचनीय अवस्था झाली. सर्व्हियातील उदाहरण घेतल्यास असे दिसून येईल की, या युद्धामुळे सार्व्हियात पन्नास टक्के पुरुष ठार झाले व उरलेल्यांपैकी पस्तीस टके पुरुष क्षय आणि तत्सम रोगांनी पछाडले गेले.

---

* यापूर्वी कधीही मानवाने मानवास इतके संकटात टाकले नव्हते. विविध व संघटित विरोधी मतप्रणालीने संपूर्ण मानवजात धोक्यात आली. विजयाच्या शक्यतेच्या आनुषंगाने राजकारणाचा विचार करणे हे काल व ध्येय यास विसंगत ठरू लागले. राजकीय ध्येयाच्या पूर्ततेकरिता जेव्हा संपूर्ण मानवजात संकटात येते तेव्हा त्या राजकीय ध्येयाचा पुनर्विचार होणे आवश्यक ठरते. Burtrand Russel, Human Society in Ethics & Politics.

निष्कर्ष :- या युद्धामुळे ओढवलेल्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक आपत्तींमुळे विसाव्या शतकाचा पूर्वार्ध हुकूमशाही आणि दुसरे महायुद्ध इत्यादी भयानक घटनांसाठी खर्ची पडला. महायुद्धाच्या भयानक व भीषण परिणामांनी सर्व जगाला ग्रासले. आतापर्यंतचे शांततेचे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले. * आर्थिक मंदी, राष्ट्रवाद आणि स्वयंपूर्णता या कल्पनांनी सर्वच राष्ट्रांत ठाण मांडले. या युद्धाचे भडक, भीषण व दारुण परिणाम ज्या युद्धपिपासूंनी प्रत्यक्ष पाहिले त्यांनादेखील या युद्धाचा वीट आला. जगात शांतता प्रस्थापित व्हावी अशी त्यांची मनोदेवता त्यांना सांगू लागली. अशा प्रकारे शांती प्रस्थापित करण्याचे जुने प्रयत्न नव्याने आकार घेऊ लागले. या युद्धामुळे जग जितके हादरले तितकेच ते विश्वएकात्मतेच्या ध्येयाकडे त्वरेने गेले. जगातील प्रमुख व बलाढ्य राष्ट्रांनी प्रथमच एकत्र येऊन शांततेच्या महान प्रयोगास प्रारंभ केला.

---

* " The Popular mottoes of the day were ' Never again ' and ' A war to end war' It became a generous passtime with our scholars to reconstruct the map of Europe on the basis of Nationality ----- We belived that military empires which would soon be a thing of the past, '–Henry Novel Brailoford, A League of Nations. 2nd Edi., P 17,

• • •

# राष्ट्रसंघाचा उदय २

**राष्ट्रसंघाचा उदय :–** विसाव्या शतकापूर्वी आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या संघटनांचा जन्म झालेला असला तरी या संघटनांच्या कार्यवाहीस मूर्त स्वरूप मात्र विसाव्या शतकातच आले. राष्ट्रवादाचा जरी जगभर विकास झाला होता, तरीदेखील जेवढ्या मोठ्या प्रमाणात महायुद्धामुळे जग हादरले तितक्याच वेगाने राष्ट्रांची बंधने ओलांडून विश्वएकात्मतेच्या ध्येयाकडे, सार्वत्रिक शांततेच्या दिशेने ओढले गेले. भयंकर विध्वंस व संहारामुळे युद्धविरोधी व शांतताप्रेमी विचारांचे वारे वाहू लागले. जागतिक शांतता टिकविणाऱ्या कायम स्वरूपाच्या संघटनेची आवश्यकता भासू लागली. भविष्यकाळात असली भयंकर युद्धे पुन्हा होऊ नयेत म्हणून आंतरराष्ट्रीय वाद, तंटे वगैरे मिटविण्याच्या हेतूने व शांतता प्रस्थापनेच्या दृष्टिकोनातून बड्या राष्ट्रांनी एकत्र येऊन एक आंतरराष्ट्रीय संघ स्थापन करण्याचे ठरविले. *

१९१९ च्या जानेवारीमध्ये पॅरिस येथे सर्व देशांच्या प्रतिनिधींची एक परिषद क्लेमोन्सोच्या अध्यक्षतेखाली झाली. या परिषदेत शांतता-प्रस्थापनेविषयी चर्चा होऊन औपचारिक नि अनौपचारिक सूचनांद्वारे

---

* "The authority of the League is only source of a reasonably Impartial solution, It is, more over, through the League only that there can adequately be worked out that system of neutral zones through which we may hope to avoid the difficulties which arise from considerations of strategy, "
–Harold J. Laski, A Grammar of Politics, P. 590

राष्ट्रसंघाच्या स्थापनेविषयी एकमत झाले. आंतरराष्ट्रीय सहकार्याने युद्धे कशी टाळता येतील हे उद्दिष्ट समोर होते. या प्रकारे नवीन जग निर्माण करण्याची कल्पना रुजली गेली.

जागतिक * शांतता, सहकार्य व समृद्धी निर्माण करण्याकरिता राष्ट्रसंघाची स्थापना करण्याचे ठरले. ह्या नव्या जगाची उभारणी विश्वकुटुंबवादी तत्त्वावर व्हावी अशी अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांची इच्छा होती. वुड्रो विल्सन यांना राष्ट्रसंघाच्या निर्मितीमुळे ज्या गोष्टींची शक्यता ठळक दिसली त्या गोष्टी अशा :—

१— साम्राज्यशाहीचा अंत.

२— शस्त्रास्त्रांची कपात.

३— लष्करशाहीचा ऱ्हास.

४— खुल्या व्यापाराची वाढ व दळणवळणातील प्रगती.

५— मजुरांच्या व सामान्य नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा

६— ठराविक व्यक्तींना व ठराविक राष्ट्रांना मिळणाऱ्या खास सवलतींचा शेवट.

---

* अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन, "आपली (अमेरिकेची) इच्छा असो वा नसो, आपण जगाच्या जीवनामध्ये भागीदार आहोत. जगातील सर्व राष्ट्रांच्या हित-संबंधांमध्ये आपले हितसंबंध गुंतलेले आहेत. इतर राष्ट्रांबरोबर जागतिक हितसंबंधांमध्ये आपणही भागीदार आहोत. ज्या गोष्टींचा मानवी जीवनावर परिणाम होतो, त्याचा परिणाम आपल्यावरही होणे अपरिहार्य आहे. युरोप व आशिया यांमधील राष्ट्रांवर त्याचा सारखाच परिणाम होतो. कारण जगातील सर्व राष्ट्रे एकमेकांची शेजारी झाली आहेत." Ruhl F. Bartlett The League to Enforce Peace, 1944 Edition

**वुड्रो विल्सन यांची चौदा तत्त्वे:** वुड्रो विल्सन यांची तहाची योजना १४ तत्त्वांची होती. ता. ८ जानेवारी १९१८ रोजी त्यांनी जागतिक शांततेसाठी चौदा तत्त्वांचा जो मसुदा बनविला तो असा :–

१– गुप्त राजनीतीऐवजी प्रकट राजनीती.

२– युद्ध व शांततेच्या काळात सर्व राष्ट्रांना सागरसंचाराचे संपूर्ण स्वातंत्र्य.

३– राष्ट्राराष्ट्रांतील आर्थिक बंधने दूर करणे व आर्थिक नाकेबंदी नष्ट करणे.

४– शस्त्रास्त्रनिर्मितीवर नियंत्रण व सैन्यात कपात.

५– वसाहतींविषयींचे प्रश्न तुलनात्मक लोकसंख्येच्या प्रमाण-पद्धतीने सोडविणे.

६– रशियातील दोस्त सैन्य परत बोलाविणे.

७– बेल्जियमचे स्वातंत्र्य प्रस्थापित करणे.

८– जर्मनीकडून अल्साक–लॉरेनचा प्रदेश फ्रान्सला परत मिळवून देणे.

९– इटलीच्या सरहद्दीत फेरबदल करून संलग्न भागांतील इटालियन जनता इटालीच्या अमलाखाली आणणे.

१०– ऑस्ट्रियन साम्राज्यात परतंत्र असलेल्यांना स्वातंत्र्य देणे.

११– रुमानिया, सर्व्हिया, मॉटेनिग्रो यांना स्वातंत्र्य देणे.

१२– तुर्कस्थानच्या अमलाखालील राष्ट्रांना स्वायत्ततेची हमी व दार्दानेल्सची सामुद्रधुनी सर्वांना खुली करणे.

१३– पोलंडला स्वातंत्र्य देणे व त्याला बाल्टिक समुद्रावरील किनारा मिळवून देणे.

१४– जागतिक शांतता व सुरक्षितता स्थापन करण्याच्या दृष्टीने राष्ट्रसंघाची स्थापना करणे.

राष्ट्रसंघाची सनद पॅरिसच्या शांततापरिषदेत २८ एप्रिल १९१९ रोजी सर्वानुमते संमत करण्यात आली. १९२० मध्ये व्हर्सायच्या तहाच्या पहिल्या भागात राष्ट्रसंघाच्या कल्पनेचा समावेश करण्यात आला. अशा रीतीने १० जानेवारी १९२० रोजी अधिकृतपणे राष्ट्र-संघाची स्थापना झाली.

राष्ट्रसंघाची मूळ कल्पना इंग्लंडमध्ये उदय पावली. युद्धकाळात काही शांतताप्रेमी लोकांच्या मनात अशी योजना घोळत होती. तहपरिषदेतील करारानंतर या योजनेस प्रे. विल्सन यांनी मूर्त स्वरूप प्राप्त करून दिले. या योजनेचा मसुदा लॉर्ड फिरमोर व जनरल स्मट्स या दोघांनी तयार केला. राष्ट्रसंघाच्या पुढील सर्व उद्योगाचा आरंभ विल्सनच्या आग्रही धोरणात आहे. पहिल्या महायुद्धात अमेरिकेचा प्रवेश हेच दोस्त राष्ट्रांच्या विजयाचे निर्णायक कारण होते. प्रथम आपले सव्वाशे वर्षांचे तटस्थतेचे धोरण सोडून या युद्धात प्रवेश करण्यास अमेरिकन राष्ट्र व तिचे राष्ट्रपती विल्सन हे नाखूष होते. तेव्हापासूनच म्हणजे आज जवळ जवळ ५० वर्षांपासून अमेरिका सर्व लोकशाही राष्ट्रांचे नेतृत्व करीत आहे.

राष्ट्रसंघाची मुख्य कचेरी जिनेव्हा येथे होती. राष्ट्रसंघाचा खर्च १० लक्ष पौंड ( ७५ लक्ष रुपये ) ठरवून तो सभासद-राष्ट्रांनी वर्गणी द्वारे जमविण्याचे ठरविले. कायम स्वरूपाचे आंतरराष्ट्रीय न्यायालय हेग येथे स्थापन करण्यात आले. या सर्व कामी अमेरिकेचे अध्यक्ष थॉमस वुड्रो विल्सन यांनी पुढाकार घेतला. इंग्लंडचे लॉईड जॉर्ज व फ्रान्सचे क्लेमेन्शो यांनी विल्सन यांच्या विचारसरणीस सक्रिय पाठिंबा दिला.

राष्ट्रसंघासारखी आंतरराष्ट्रीय संघटना स्थापणे हा अखिल मानवजातीने विश्वव्यापी शांततेसाठी केलेला पहिला मोठा यशस्वी

प्रयत्न होय. मानवी मूल्यांच्या संरक्षणाची व जोपासनेची अतिशय नाजूक कामगिरी या संघटनेने उचलली. कडवट अशा राष्ट्रवादाचे आव्हान तिने स्वीकारले. *

---

* " The League, he ( Smuts ) wrote, should be thought of ' not only as a possible means of preventing future wars, but much more as a great organ of the ordinary peaceful life of civilization, as the foundation of the new international system which will be erected on the ruins of this war ', ' The greatest opportunity in history would be met by lhe greatest step forward in the government of man. " F. P. Walters, A History of the Lcague of Nations, 1960 edition ( in one volume ). P. 27·

● ● ●

# राष्ट्रसंघाची प्रमुख उद्दिष्टे आणि मूलभूत तत्त्वे ३

विश्वशांती हे राष्ट्रसंघाचे प्रमुख उद्दिष्ट ठरविले गेले. त्या दृष्टीने राष्ट्रसंघाच्या सनदेच्या सुरुवातीमध्येच संपूर्ण उद्दिष्टांचा आशय उतरविल्याचे दिसून येते. राष्ट्रसंघाच्या सनदेची सुरुवात—" आम्ही देशोदेशींची सरकारे, आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविण्यासाठी, जागतिक शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी, युद्धाच्या मार्गाचा मुळीच अवलंब न करता पूर्णतः युद्धाचा त्याग करण्याची मर्यादा स्वतःवर घालून हे बंधन पाळण्यासाठी परस्परांशी वचनबद्ध होत आहोत. आंतरराष्ट्रीय संबंध न्याय्य आणि जाहीर स्वरूपाचे ( open diplomacy ) असतील व ते कोणत्याही राष्ट्राचा हक्कभंग व मानभंग करणारे राहणार नाहीत. "— अशा प्रकारची आहे.

राष्ट्रसंघाच्या सनदेत समाविष्ट असलेली उद्दिष्टे संकलित स्वरूपाने क्रमवार खालीलप्रमाणे आहेत :

उद्दिष्टे :—

१– युद्धांची कारणे दूर करणे.

२– आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखणे.

३– आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविणे.

४– आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन करणे.

५– आक्रमकांवर सामुदायिक बहिष्कार टाकणे.

६– आंतरराष्ट्रीय न्यायास मान्यता देऊन पालन करणे व करा-राचा मान राखणे.

७– शांती–लवादास नेहमी पुष्टी व प्रोत्साहन देणे.

८– कोणत्याही राष्ट्राकडून शांतताभंग होऊ नये याची दक्षता बाळगणे.

९– सदस्य-राष्ट्रांनी परस्पर, आपसांत कसलाही गुप्त करार न करणे.

१०– वसाहती व परतंत्र प्रदेशांचा सर्वांगीण विकास करणे.

११– शस्त्रास्त्रांवर निर्बंध घालणे व लष्करात कपात करणे.

१२– सदस्य राष्ट्रांनी परस्परांतील संघर्ष व मतभेद शांततेच्या मार्गाने मिटविणे.

१३– सदस्य राष्ट्रांतील जनकल्याणासाठी, विकास व सर्वांगीण उन्नतीसाठी आस्थापूर्वक जागरूक राहून सर्व बाबतींत काळजी घेणे.

## राष्ट्रसंघाची मूलभूत तत्त्वे

ज्या मूलभूत तत्त्वांवर राष्ट्रसंघाची उभारणी करण्यात आली, ती तत्त्वे खालीलप्रमाणे आहेत :

१– जगातील स्वतंत्र राष्ट्रे आणि ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वायत्त वसाहती या सर्वांना राष्ट्रसंघाचे सदस्य होण्याचे आवाहन करणे.

२– सामूहिक सुरक्षिततेसाठी प्रयत्न करणे.

३– सर्व सदस्य-राष्ट्रांना समान दर्जा देण्यात यावा.

४– आंतरराष्ट्रीय समस्या सोडविण्यासाठी युद्धाचा मार्ग न स्वीकारता आंतरराष्ट्रीय विधिनियमांचा अवलंब: करणे.

[ राष्ट्रसंघाच्या प्रत्येक सदस्याने आपले संघर्ष, मतभेद, तंटे वगैरे राष्ट्रसंघाकडे सुपूर्द करणे आणि संघाने निर्णय दिल्याशिवाय व असा

निर्णय दिल्यानंतर किमान तीन महिने मुदतीपर्यंत युद्धाचा अवलंब न करणे. ]

५– आंतरराष्ट्रीय संबंध खुल्या प्रकारे आणि न्याय्य मार्गाने प्रस्थापिले जावेत. [ करारांच्या प्रती संघास देणे; अन्यथा करार कार्यवाहीस पात्र ठरणार नाही. ]

६– आंतरराष्ट्रीय तह आणि जबाबदाऱ्या यांचा मान राखणे; अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यवहारात न्याय व शांतीचा मार्ग अवलंबिणे.

कोणत्याही दोन राष्ट्रांतील तंटे आणि संघर्षांच्या बाबतीत निवाडा देण्याचा हक्क राष्ट्रसंघास होता. मात्र कोणत्याही राज्यसत्तेला अंतर्गत कलहामुळे किंवा यादवीमुळे धोका निर्माण झाल्यास त्याचा बीमोड करण्याच्या हेतूने राष्ट्रसंघाकडून मदत मिळविण्याची शक्यता नव्हती.

**प्राथमिक सदस्यत्व** :– प्रारंभी २७ राष्ट्रांनी संस्थापक-सदस्य म्हणून राष्ट्रसंघाच्या सनदेवर सह्या केल्या. त्यानंतर इतर राष्ट्रे सर्वसाधारण सदस्य होऊ लागली. तेव्हा प्रथम ४२ राष्ट्रे सदस्य झाली व हळूहळू ही संख्या ६३ पर्यंत गेली. जगाच्या क्षेत्रफळाचा ६५ टक्के भाग ज्यात एकूण लोकसंख्येपैकी ७५ टक्के लोकसंख्येचा प्रदेश राष्ट्रसंघात समाविष्ट होता, असे दिसून येते.

एकदा परिपूर्ण सदस्य झाल्यानंतरही त्या सदस्य-राष्ट्रास सदस्यत्वापासून मुक्त व्हावयाचे असल्यास दोन वर्षे अगोदर सूचना देऊन मुक्त होता येत असे.

राष्ट्रसंघ-कार्यवाहीचे नियम फार सरळ व साधे होते. सदस्य होणाऱ्या राष्ट्राने राष्ट्रसंघाची सनद ( Covenant ) पाळली पाहिजे. राष्ट्रसंघ-सभेच्या सदस्यांच्या दोन-तृतीयांश निर्णयाने सदस्यत्व मिळत असे; कोणत्याही राष्ट्राचे सदस्यत्व रद्द करता येत असे. राष्ट्रसंघात

नकाराधिकार ( Veto ) बाबत पक्षपात नव्हता. प्रत्येकाला व्हेटोचा अधिकार होता. त्यामुळे सर्व सदस्य-राष्ट्रे समान दर्जाची होती. प्रत्येक मुद्दा बिनविरोध संमत व्हावा लागत असे. हीच बाब पुढे राष्ट्र-संघाच्या कार्यांत एक प्रमुख अडथळा ठरली.

परतंत्र राष्ट्रे राष्ट्रसंघाची सदस्य होऊ शकत नसत. भारत हे राष्ट्र परतंत्र असूनही राष्ट्रसंघाचे परिपूर्ण सदस्यत्व त्यास देण्यात आले. हे एवढेच अपवाद म्हणून म्हणता येईल. राष्ट्रसंघाने भारतास परिपूर्ण सदस्यत्व का व कसे दिले, याचे सविस्तर विवेचन राष्ट्रसंघ आणि भारत या प्रकरणात दिले आहे.

## राष्ट्रसंघाचे सदस्य

| अ. क्र. | सभासद | | प्रवेश |
|---|---|---|---|
| १— | अफगाणिस्तान | | सप्टेंबर १९३४ |
| २— | अर्जेंटाइन प्रजासत्ताक | * | |
| ३— | अल्बानिया | ० | डिसेंबर १९२० |
| ४— | आयर्लंड | | सप्टेंबर १९२३ |
| ५— | ऑस्ट्रेलिया | * | |
| ६— | ऑस्ट्रिया | (×) | डिसेंबर १९२० |
| ७— | इक्वादार | | सप्टेंबर १९३४ |
| ८— | इंग्लंड ( ग्रेटब्रिटन ) U. K. | * | |
| ९— | इजिप्त | | मे १९३७ |
| १०— | इथिओपिया ( ॲबिसिनिया ) | | सप्टेंबर १९२३ |
| ११— | इटली | * | |
| १२— | इराक | | ऑक्टोबर १९३२ |

| अ. क्र. सभासद | | प्रवेश |
|---|---|---|
| १३— उरुग्वे | * | |
| १४— एस्थोनिया | | सप्टेंबर १९२१ |
| १५— कॅनडा | * | |
| १६— कोलंबिया | * | |
| १७— कोस्टारिका | | डिसेंबरं १९२० |
| १८— क्यूबा | * | |
| १९— ग्रीस | * | |
| २०— ग्वाटेमाला | * | |
| २१— चिली | * | |
| २२— चीन | * | |
| २३— जपान | * | |
| २४— जर्मनी | | सप्टेंबर १९२६ |
| २५— झेकोस्लोव्हाकिया | * | |
| २६— डेन्मार्क | * | |
| २७— डोमीनिकन रिपब्लिक | | सप्टेंबर १९२२ |
| २८— तुर्कस्तान | | जुलै १९३४ |
| २९— दक्षिण आफ्रिका संघ | * | |
| ३०— नॉर्वे | * | |
| ३१— निकाराग्वे | * | |
| ३२— न्यूझीलंड | * | |
| ३३— नेदरलँडस ( हॉलंड ) | * | |
| ३४— पनामा | * | |
| ३५— पर्शिया ( इराण ) | * | |

| अ. क्र. समासद | | प्रवेश |
|---|---|---|
| ३६— पराग्वे | ★ | |
| ३७— पेरू | ★ | |
| ३८— पोलंड | ★ | |
| ३९— पोर्तुगाल | ★ | |
| ४०— फ्रान्स | ★ | |
| ४१— फिन्लंड | | डिसेंबर १९२० |
| ४२— बल्गेरिया | | डिसेंबर १९२० |
| ४३— ब्राझील | ★ | |
| ४४— बेल्जियम | ★ | |
| ४५— बोलिव्हिया | ★ | |
| ४६— भारत ( India ) | ★ | |
| ४७— मेक्सिको | | सप्टेंबर १९३१ |
| ४८— युगोस्लाव्हिया | ★ | |
| ४९— रुमानिया | ★ | |
| ५०— लक्झेंबर्ग | | डिसेंबर १९२० |
| ५१— लाटेव्हिया | | सप्टेंबर १९२१ |
| ५२— लायबेरिया | ★ | |
| ५३— लिथूनिया | | सप्टेंबर १९२१ |
| ५४— वेनेझुला | ★ | |
| ५५— स्पेन | ★ | |
| ५६— स्वित्झर्लंड | ★ | |
| ५७— स्वीडन | ★ | |
| ५८— सयाम | ★ | |

| अ. क्र. | सभासद | | प्रवेश |
| --- | --- | --- | --- |
| ५९— | संयुक्त सोव्हियत समाजवादी प्रजासत्ताक ( U.S S.R. ) | (⁑) | सप्टेंबर १९३४ |
| ६०— | साल्व्हेडार | * | |
| ६१— | हंगेरी | | सप्टेंबर १९२२ |
| ६२— | हांडयूरास | * | |
| ६३— | हैती | * | |

* संस्थापक

० इटलीने पादाक्रांत केले ( १९३३ ते एप्रिल १९३९ )

× जर्मनीने पादाक्रांत केले ( १९३६ ते मार्च १९३९ )

⁑ राष्ट्रसंघाच्या समितीने रशियाचे सभासदत्व रद्द केले ( डिसेंबर १४, १९३९ )

..., ठाणे. स्थळ...
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

# राष्ट्रसंघाची प्रमुख अंगे ४

## १– राष्ट्रसंघ सभा ( Assembly )

राष्ट्रसंघाची प्रमुख अंगे तीन होती ती अशी : १. – राष्ट्रसंघ-सभा Assembly ) २. – राष्ट्रसंघ समिती ( Council ) व ३.– सचिवालय ( Secretariate )·

आंतरराष्ट्रीय सभा म्हणून या राष्ट्रसंघ-सभेने आपले महत्त्वाचे स्थान प्रस्थापित केले होते. जागतिक भूमिका ( world opinion ) तयार करण्यात या सभेचा निर्णायक प्रभाव पडत असे. जागतिक शांतता ही राष्ट्रसंघाची मूळ भूमिका होती. वादग्रस्त प्रश्नांचा निर्णय लावताना हीच भूमिका दृष्टीसमोर ठेवून निष्कर्ष काढले जात असत आणि त्यांची अंमलबजावणी केली जात असे. म्हणून सभेचे स्वरूप केवळ चर्चा करणारी सभा असे नव्हते. न्याय्य मार्गांनी आणि सदस्यांच्या हक्कांना अबाधित ठेवून निर्णय व अंमल केला जाई. *

---

* "The real underlying conception of the Assembly of the League of Nations is that it is the forum of opinion, " said President Wilson in 1919, " It is the debating body; it is the place where the thought of the little nation along with the thought of the big nation is brought to bear upon those matters which affect the peace of the world; - - - where the moral judgement of mankind can sway the opinion of the world. That is the function of the Assembly. The Assembly is the voice of mankind, " Margaret E. Burton, The Assembly of the League of Nations ( The Messages and Papers of Woodrow Wilson, II, 985 ), P. 206.

राष्ट्रसंघाचा प्रत्येक सदस्य या सभेचा सभासद असे. प्रत्येक सदस्य-राष्ट्राला या सभेत तीन प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार असला तरी सदस्य-राष्ट्राला एकच मताचा अधिकार होता * कार्यवाहीची भाषा इंग्लिश किंवा फ्रेंच असे.

इ. स. १९२४ ते १९३१ हा काळ राष्ट्रसंघाचा सुवर्णकाळ होय. या काळात ग्रेटब्रिटन, फ्रान्स जर्मनी, पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, हॉलंड यांनी आपले प्रतिनिधित्व करण्याकरिता राष्ट्रसंघात वारंवार आपले परराष्ट्र मंत्री पाठविले. अशा प्रकारे राष्ट्रसंघास एक राजकीय महत्त्व व प्रस्तुत काळातील अपूर्व असे केंद्रस्थान प्राप्त करून दिले.

सभेच्या सहा कायम कमिट्या होत्या :– १. घटनात्मक व कायदा–विषयक, २. तांत्रिक, ३. शस्त्रास्त्रनियंत्रण, ४. अंदाजपत्रक–विषयक, ५. सामाजिक व मानवी मूल्यासंबंधी, ६. राजकीय.

या सभेचे अधिवेशन वर्षातून कमीत कमी एकदा होई. राष्ट्रसंघाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व विषयांवर विचारविनिमय करण्याचा अधिकार या सभेला होता. सभेचे सर्व निर्णय एकमताने झाले पाहिजेत, असे सनदेमध्ये नमूद केले होते. अपवाद म्हणून केवळ प्रमुख सचिवाच्या निवडणुकीच्या वेळी साध्या बहुमताचा पर्याय दिला गेला होता. ह्या सभेला समितीसह सर्व संलग्न संघटनांवर देखरेख ठेवण्याचा संपूर्ण

---

* "It is that publicity which makes statesmen reluctant to declare, in the old formula of perverted patriotism, that they would stand by the government of their country ' Right or wrong'. For every statesman at Genevac ( Assembly of the League of Nations ) is now concerned to prove to the world at large that his country is not wrong but right, that it demands not what its military forces can exact, but what impartial justice would accord," P. J. Noel Baker, The League of Nations at work, ( 1st Pub. in 1926 ) P. 31-

अधिकार होता. परंतु राष्ट्रसंघ-समितीकरिता राखून ठेवलेल्या विषयावर सभेला चर्चा करता येत नसे. समितीवरील तात्पुरत्या सभासदांची निवड करण्याचे कार्य सभा करीत असे. राष्ट्रसंघ-समिती, प्रमुख सचिवाची व कायम आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या न्यायाधीशांची निवड सभेच्या मान्यतेने करीत असे. समितीच्या संमतीने राष्ट्रसंघाच्या सनदेत दुरुस्ती करण्याचा अधिकार ह्या सभेला होता.

राष्ट्रसंघ सभेकडे संघटनेचे अंदाजपत्रक मंजूर करण्याचा अधिकार होता. अंदाजपत्रकात तीन कोटी रुपयांची तरतूद होती. सदस्यराष्ट्रांच्या सदस्यत्व शुल्काचे प्रमाणबद्ध एकक (Unit) ठरवून त्या त्या राष्ट्रांना तितक्या एककात शुल्क द्यावे लागत असे, याप्रकारे एका अर्थसंकल्पाची रक्कम ९२३ एककांच्या बरोबर होती. कोणत्या राष्ट्राने किती एकक द्यावयाचे हे सभा ठरवीत असे. वर्गणीचे दर भिन्न होते. उदाहरणार्थ, इंग्लंड–१०८ एकक, फ्रान्स–८०, रशिया–९४, इटाली–६०, हिंदुस्थान– ४९ इत्यादी. औद्योगिकदृष्ट्या भारताचा क्रमांक पहिल्या महत्त्वाच्या आठ राष्ट्रांत होत होता. म्हणून वर्गणीचे प्रमाण इतर कोणत्याही बड्या राष्ट्राइतकेच दिसून येते.

उपरोक्त विभागणी इ. स. १९३७–३९ दरम्यानची आहे. काही राष्ट्रे अतिशय कमी म्हणजे ( १ ) एक एकक वर्गणी देत असत, उदाहरणार्थ, लायबेरिया, लक्झेंबर्ग, इत्यादी. युनिटस्चे वाटप बरोबर नव्हते. इंग्लंड व फ्रान्सचे वर्चस्व जास्त होते, त्याप्रमाणे इंग्लंड व फ्रान्स सर्वात जास्त वर्गणी देत असत. वर्गणीचे प्रमाण राष्ट्रांच्या आर्थिक पात्रतेच्या दृष्टीने प्रमाणबद्ध व समतोल नव्हते.

लहान राष्ट्रे स्वतः कमकुवत असल्यामुळे त्यांना स्वसंरक्षणासाठी राष्ट्रसंघावर अवलंबून रहावे लागत असे. त्यामुळे कोणत्याही प्रश्नावर चर्चा होत असताना लहान राष्ट्रे राष्ट्रसंघाचा कल पाहून त्याच बाजूने पाठिंबा देत असत.

## २– राष्ट्रसंघ समिती ( Council )

राष्ट्रसंघ सामिती ही राष्ट्रसंघाची कार्यकारिणी सभा होय. आरंभी यात चार कायम बडी राष्ट्रे ( ग्रेटब्रिटन, फ्रान्स, इटली, जपान व काही काळ रशिया पण ) सभासद राष्ट्रे* व चार हंगामी अस्थायी (लहान राष्ट्रे, सभेने नियुक्त केलेली ) सदस्य-राष्ट्रे; अशी एकूण आठ सदस्य-राष्ट्रे असत.

पूर्वी युरोपीय राष्ट्रे राष्ट्रसंघामध्ये सामान्यतः राष्ट्रदूत तात्पुरते ( Part time ) नेमीत असत. परंतु राष्ट्रसंघाचे एवढे महत्त्व वाढले होते की राष्ट्रसंघ समितीत केवळ जबाबदार मंत्र्यांनीच प्रतिनिधित्व केले असे नव्हे, तर ब्राझील आणि अर्जेंटिना यांसारख्या सुदूरच्या राष्ट्रांनी देखील आपल्या खास प्रतिनिधीस राजदूताचे ( Ambassadorial ) संपूर्ण हक्क देऊन राष्ट्रसंघ समितीत बसण्यासाठी कायम ( Full time ) म्हणून नेमले.

राष्ट्रसंघ सभा व सामिती यांच्या मान्यतेने कायम व हंगामी अस्थायी सदस्यांची संख्या जास्त होऊ शकत असे. यामुळे काही कालानंतर सभासदांच्या संख्येत भर पडून बड्या राष्ट्रांचे कायम पाच आणि लहान राष्ट्रांचे ( सभेने नियुक्त केलेले ) तात्पुरते ९, असे एकूण १४ सभासद झाले.

---

* कायम सदस्य-राष्ट्रे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९२०–२६ : | ग्रेटब्रिटन, | फ्रान्स, | इटली, | जपान | |
| १९२६–३३ : | ” | ” | ” | ” | जर्मनी |
| १९३३–३४ : | ” | ” | ” | | ——— |
| १९३४–३७ : | ” | ” | ” | रशिया | |
| १९३७–३९ : | ” | ” | ——— | ” | |
| १९३९–४६ : | ” | ” | | | |

१९२६मध्ये ज्या वेळेस जर्मनीच्या सभासदत्वाचा प्रश्न निर्माण झाला, त्या वेळी हंगामी सभासदांची संख्या नऊ करण्यात आली. सभासदांची, निवड राष्ट्रसंघ-सभेने तीन वर्षांकरिता करावी व घटनादुरुस्तीच्या अन्वये ज्या राष्ट्रांची ही मुदत संपली असेल त्यांना निवडीचा अधिकार देण्यात आला. यामागे बड्या राष्ट्रांचा एक हेतू असा होता की अधिकृतपणे जर्मनी सभासद राहू शकत नसले तरी अनधिकृत कायम सभासद म्हणून त्याला राष्ट्रसंघ-समितीवर राहता यावे. याचा निषेध म्हणून इ. स. १९२८ मध्ये राष्ट्रसंघाचा ब्राझीलने त्याग केला. भारत परतंत्र असल्यामुळे राष्ट्रसंघात समितीवर त्याला कधीहि जागा मिळू शकली नाही.

राष्ट्रसंघ-समितीची बैठक वर्षातून किमान चार वेळा होत असे. आवश्यकतेनुसार आणीबाणीच्या वेळी तातडीची बैठकही बोलावण्यात येत असे. इ. स. १९१९ ते १९३८ या काळात समितीच्या ९९ बैठका झाल्या. प्रत्येक राष्ट्राला एक मत देण्याचा अधिकार होता. समितीच्या प्रत्येक सभासदाला ( व्हेटो ) नकाराधिकाराचा अधिकार होता. म्हणजे निर्णय एकमतानेच संमत होणे आवश्यक होते. त्यामुळे ज्याच्या विरुद्ध तक्रार आहे अशा राष्ट्राने विरुद्ध मत दिले तरी ठराव संमत होत नसे. निर्णय एकमताने घेण्याचा नियम जरी असला, तरी राष्ट्रसंघाचे यशापयश हे वैयक्तिक सभासद राष्ट्राची जबाबदारी पार पाडण्यावर अवलंबून असे. एकाविरुद्ध, म्हणजे सर्वांच्या विरुद्ध युद्ध समजले जात असे. ( One for all and all for one . . ) प्रत्येक सदस्य-राष्ट्राला युद्धात सहभागी होणे बंधनकारक होते. राष्ट्रसंघात तटस्थतेला वाव नव्हता. परंतु जर राष्ट्रसंघाच्या सनदेविरुद्ध युद्ध नसेल तर कोणत्याही सदस्य राष्ट्राला तटस्थ राहता येत असे.

समिती व सभा यांच्या कार्यक्षेत्रातील फरक स्पष्ट नाही. पण लहान सदस्य संख्या आणि अधिक वेळा होणाऱ्या बैठकी यांमुळे समितीने घेतलेल्या निर्णयाचा प्रभाव सभेवर पडत असे. समितीचे मुख्य कार्य आंतरराष्ट्रीय तंटे सोडविणे हे होते. समितीला जर असे वाटले की आपण तंट्याचा निर्णय देण्याऐवजी हा प्रश्न राष्ट्रसंघाच्या सभेकडे सोपवावा तर तो तसा सोपविण्यास समितीला अधिकार होता. एखाद्या पक्षाने तशी मागणी केल्यास चौदा दिवसांच्या आत समितीने तो प्रश्न सभेकडे सोपविला पाहिजे असे समितीवर बंधन होते.

कोणताही तंटा राष्ट्रसंघाकडे नेल्यास, तो तंटा सोडविण्याकरिता शांततेच्या मार्गाचा अवलंब केला पाहिजे असा नियम होता. वाटाघाटी, चर्चा, गुडऑफिसेस ( शिफारस ), मध्यस्थी, चौकशी, लवाद, सलोखा, वगैरे ही मार्गदर्शक तत्त्वे होती. जर हे सर्व मार्ग अयशस्वी ठरले तरच तो प्रश्न समितीकडे सोपवला जाई.

समितीने एकमताने निर्णय दिला तरच तो पाळण्याचे बंधन दोन्ही पक्षांवर असे. जर एका पक्षाचे म्हणणे असे असेल की तंटा अंतर्गत स्वरूपाचा आहे आणि समितीने त्या विधानास मान्यता दिली तर समितीचे अधिकारक्षेत्र तेथे संपुष्टात येई. कारण कोणत्याही राष्ट्राच्या अंतर्गत बाबतीत राष्ट्रसंघ ढवळाढवळ करू शकत नसे. जर राष्ट्रसंघ किंवा लवाद, सहा महिन्यांत एकमताने निर्णय घेऊ शकले नाही तर आणखी तीन महिने वाट पाहून वादग्रस्त राष्ट्रांना युद्धाचा मार्ग स्वीकारण्यास मुभा होती. लढाई हा आंतरराष्ट्रीय तंटे मिटविण्याचा तोपर्यंत रूढ मार्ग होता.

जर एखाद्या राष्ट्राने आक्रमण केले तर आक्रमित राष्ट्राचे स्वातंत्र्य अबाधित राखण्याकरिता समिती सदस्य-राष्ट्रांना लष्करी साह्य देण्या-

करिता शिफारस करीत असे. तसेच ती आक्रमक राष्ट्राविरुद्ध आर्थिक दंडयोजना सुचवीत असे व जरूर पडल्यास त्या राष्ट्रास राष्ट्रसंघाचे शत्रू समजून लष्करी कारवाईही करण्याची सूचना देत असे. पराभूत ( जर्मनी, तुर्कस्थान, रशिया ) राष्ट्रापासून जिंकलेले अविकासित प्रदेश दुसऱ्या राष्ट्राच्या देखरेखीखाली देण्याचा अधिकार समितीला होता.

समितीच्या कायम सदस्य-राष्ट्रांपैकी चार राष्ट्रे युरोपियन होती व केवळ जपान हे एकमेव युरोपियेतर कायम सदस्य-राष्ट्र होते. त्यांमुळे समितीत युरोपियन राष्ट्रांचे वर्चस्व निश्चित होते. विशेषतः समितीत इंग्लंड व फ्रान्स यांचे वर्चस्व नेहमी असे.

## ३– सचिवालय

**३. सचिवालय व प्रमुख सचिव :—**

राष्ट्रसंघाचे सचिवालय स्वित्झर्लंडमध्ये जिनेव्हा येथे होते. पहिल्या प्रमुख सचिवपदी १९२० साली इंग्लंडचे सर जेम्स एरिक ड्रुमंड यांची निवड झाली. त्यांची कारकीर्द अत्यंत कार्यक्षम व प्रभावी ठरली. १९३३ मध्ये त्यांनी त्यागपत्र दिले. सचिवालयाचे आधारस्तंभ म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. सचिवालयाचे संपूर्ण नियोजन व आखणी त्यांनीच केली. सचिवालयाची कार्यपद्धती एका विशेष चाकोरीत बसवून कार्यवाही अगदी सुरळीत, सुव्यवस्थित व यशस्वी केली.

सर ड्रुमंड यांनी १९३३ मध्ये पदाचा त्याग केला. त्यानंतर १९३३ ते ४० पर्यंत जोसेफ अव्हेनॉय या फ्रेंच मुत्सद्दी अधिकाऱ्याची प्रमुख सचिवपदी निवड झाली.

सर एरिक ड्रुमंड यांनी घालून दिलेल्या चाकोरीतूनच अॅव्हेनॉय यांनी कारभार सांभाळला. १९४० मध्ये त्यांनी राजीनामा दिला.* परंतु त्या वेळी राष्ट्रसंघ मोडकळीस आला होता. अशा परिस्थितीत राष्ट्रसंघाचे कामकाज व्यवस्थित सांभाळणे महत्त्वाचे होते. लेस्टरसन यांनी १९४० ते ४५ पर्यंत या ढासळल्या काळात कारभार सांभाळला.

प्रमुख सचिवाची निवड सभेच्या मान्यतेने समितीमार्फत होत असे. प्रमुख सचिव यांना साह्य करण्याकरिता दोन उपप्रमुख सचिव व दोन अवर ( under ) प्रमुख सचिव यांची नेमणूक केली जाई.

प्रमुख सचिवाची कर्तव्ये साधारणतः दहा विभागांत विभागली जातात :–

१.– सभा व समिती यांच्या कामकाजाची नोंद ठेवणे.

२.– सचिवालयाच्या सर्व कार्याचे संयुक्तीकरण (Co-ordiuation ) करणे.

३.– समितीच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल तयार करून सभेत सादर करणे.

४.– राष्ट्राराष्ट्रांत तेढ निर्माण झाल्यास, सभासद-राष्ट्राच्या विनंतीवरून कलम ११ प्रमाणे समितीची बैठक बोलावणे.

५.– कलम १५ अनुसार राष्ट्राराष्ट्रांतील भांडणाची चौकशी करणे व चर्चा घडवून आणणे.

---

* " His ( Avenol's ) leadership of the Secretariat had been marred by grave faults, [especially in the last years. He had not kept himself free from the infection of ideological prejudice, " F. P. Walters, A History of the League of Nations, P. 809, 1960 edi. in one volume.

६.– घटनेत झालेले बदल सभासद-राष्ट्रांना कळविणे.

७.– कराराची नोंद ठेवणे व ती प्रकाशित करणे.

८.– समितीच्या मान्यतेनंतर सचिवालयात नोकरवर्गाची नेमणूक करणे.

९.– सर्व समित्यांचे व उपसमित्यांचे अहवाल तयार करणे.

१०.– राष्ट्रसंघाच्या निर्णयांची अमलबजावणी करणे.

सचिवालयाचे चार विभाग होते. आर्थिक विभाग, दळणवळण-वाहतूक विभाग, आरोग्य विभाग आणि वैचारिक सहकार्य विभाग. या विभागांच्या कामकाजाच्या नियंत्रणासाठी तांत्रिक समित्या होत्या. या समितीच्या सल्ल्यानेच सचिवालयातील कर्मचारीवर्गाची नेमणूक केली जात असे. नेमणुकीचा अंतिम निर्णयाधिकार प्रमुख सचिवास होता. सुमारे ६०० कर्मचारी सचिवालयात होते. सर्वांवर प्रमुख सचिवाचे नियंत्रण होते. कर्मचारीवर्गात महिलादेखील होत्या. डेम रॅचेल क्राऊर्डा ही महिला तर एका मोठ्या अधिकारपदावर होती. या सर्व कर्मचाऱ्यांना आंतरराष्ट्रीय कायम मुलकी कर्मचारी (Permanent International Civil Service) असे संबोधिले जात असे.

सचिवाल्याचे कामकाज वर्षभर चालू असे.

सचिवालय आंतरराष्ट्रीय स्वरूपाची माहिती गोळा करी व सभा, समिती, वगैरे विभागांना त्यांचे कर्तव्य पार पाडण्यास मदत करीत असे. कामकाजाचे इतिवृत्त तयार करणे, प्रसिद्ध करणे, नियतकालिकाच्या स्वरूपात माहिती प्रसिद्ध करणे व प्रत्येक राष्ट्रास ती पुरविणे, ही ती प्रमुख कार्ये होत. प्रत्येक समितीच्या संबंधित अधिकाऱ्याने आपल्या समितीचे इतिवृत्त व वार्षिक अंदाजपत्रक तयार करून ते सभेस पुरवावे.

राष्ट्रसंघाचे हिशेब ठेवणे, राष्ट्राराष्ट्रांशी पत्रव्यवहार करणे, वगैरे कामे करावयाची असत. तेव्हा त्या त्या अधिकाऱ्यांना काही खास राजकीय ( Diplomatic immunities ) सवलती प्रत्येक राष्ट्राकडून मिळत असत.

# दुय्यम अंगे ५

## १ कायम-पालक-मंडळ

(Permanent Mandate commission)

कायम-पालक-मंडळ राष्ट्रसंघाच्या प्रमुख अंगांपैकी नव्हते. या मंडळाचा विशेष विकास झाला नाही. याचे अधिकार पण मर्यादितच होते. शत्रुराष्ट्र जर्मनी, तुर्कस्तानपासून पहिल्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांनी जिंकलेल्या ज्या वसाहती त्या या मंडळाच्या कक्षेखाली मोडत असत. ( The Mandate System ) पालक-पद्धती ही माजी जर्मनी व तुर्की प्रदेशाला लागू करण्यात आली होती. कारण हे प्रदेश मागासलेले होते आणि शांतता परिषदेच्या वेळी त्यांना ताब्यात देण्यासंबंधी व त्यांच्या स्वामित्वासंबंधी वारंवार मतभेद होत असे. त्या भूभागाच्या प्रगती-करिता वेळोवेळी प्रस्ताव मांडण्यात आले. रशियाने स्वखुशीनेच आपल्या वसाहतींना मंडळाच्या ताब्यात जाण्यापूर्वीच स्वातंत्र्य देऊन टाकले.

या मंडळाखाली मोडणाऱ्या प्रदेशाची विभागणी तीन दृष्टिकोनांतून केली होती.

( अ ) प्रगतिशील अशा परनियंत्रित राष्ट्रांची देखरेख करणे, त्यांच्या व्यवस्थेबाबत मार्गदर्शन व सहकार्य करणे आणि त्यांना कालांतराने स्वातंत्र्य देणे. उदाहरणार्थ, इराक व पॅलेस्टाईन ही राष्ट्रे ग्रेट ब्रिटनच्या

देखरेखीखाली देण्यात आली होती. सीरिया, लेबनॉन, ही राष्ट्रे फ्रान्सच्या देखरेखीखाली देण्यात आली होती.

(ब) शत्रुराष्ट्राकडून जिंकलेल्या प्रदेशावर देखरेखीसाठी ज्या राष्ट्राची नेमणूक केली जात असे ते राष्ट्र त्या प्रदेशाच्या शासकीय व्यवस्थेस जबाबदार असे. अशा देशातील वाईट रूढी, चालीरीती व गुलामगिरी त्या राष्ट्राने दूर करणे. उदाहरणार्थ, ब्रिटिश कॅमोरिन्स, ब्रिटिश टोगोलँड आणि टांगानिका ही ग्रेट ब्रिटनच्या देखरेखीखाली देण्यात आली होती. फ्रेंच कॅमोरिन्स, फ्रेंच टोगोलँड ही फ्रान्सच्या देखरेखीखाली देण्यात आली होती. रूआंडाउरुंडी हे बेल्जियमच्या देखरेखीखाली देण्यात आले होते.

(क) शत्रुराष्ट्रापासून जिंकलेले असे प्रदेश जे क्षेत्रफळाने लहान, लोकसंख्येच्या दृष्टीने विरळ व मागासलेले आहेत, असे प्रदेश देखरेख करणाऱ्या राष्ट्रांचाच भूभाग आहेत, असे समजून तेथे शासन केले जाई व देखरेख करणाऱ्या राष्ट्रांचे कायदेकानून तेथे लागू केले जात. अशा प्रकारे त्या लोकांच्या हितसंबंधांचे रक्षण करून त्यांना प्रगती करण्यास सहकार्य करणे. उदाहरणार्थ, नैर्ऋत्य आफ्रिका हे दक्षिण आफ्रिका संघाच्या, सामोआ ही न्यूझिलँडच्या, उत्तर पॅसिफिक महासागरातील बेटे जपानच्या आणि दक्षिण पॅसेफिक महासागरातील बेटे ऑस्ट्रेलियाच्या देखरेखीखाली होती.

वरील प्रदेशातील लोकांच्या स्वास्थ्याची आणि विकासाची काळजी घेण्याची जबाबदारी राष्ट्रसंघाने आपल्याकडे घेतली होती. अशा पाल्य-प्रदेशावर मालकी राष्ट्रसंघाची आणि कारभार मात्र विश्वस्त म्हणून काही विशिष्ट राष्ट्रांचा असे. कायम पालक (Mandate) मंडळाची नेमणूक राष्ट्रसंघ सभा, समिती व सचिवालयाकडून होत असे. मंडळाचा वार्षिक अहवाल समितीकडे पाठविला जात असे. पाल्य (Mandate)

प्रदेशात लष्करी शिक्षण दिले जात नसे. त्यांना आपल्या धर्माप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य दिले गेले.

पालक-मंडळ वार्षिक अहवाल समितीकडे सादर करीत असे. परंतु पालक-मंडळाचे प्रतिनिधी, (तहतराष्ट्र) पाल्य-प्रदेशात चौकशी करण्यास जात नसत. पाल्य-प्रदेशातील लोकांना अर्ज-विनंत्या करण्याचा अधिकार नव्हता. परंतु पाल्य–प्रदेशातील लोक हळूहळू उन्नती व प्रगती करून वेळ आल्यानंतर आपोआपच स्वतंत्र होतील, तेव्हा त्यांच्यासाठी अशा प्रकारच्या शासनाची जरुरी भासणार नाही. अशा रीतीने स्वतंत्र झाल्यावर ती राष्ट्रे राष्ट्रसंघाची सदस्य बनतील असे अपेक्षित होते.

## २ कायम लवाद मंडळ

(The Permanent Court of Arbitration)

इ. स. १८९९ च्या आंतरराष्ट्रीय प्रश्नांची शांततापूर्ण सोडवणूक (Pacific settlement of International Disputes of 1899 and 1907) व १९०७ च्या आंतरराष्ट्रीय तहान्वये हे कायम लवाद मंडळ स्थापन करण्यात आले. इ. स. १८९९ मध्येच हेग (हॉलंड) येथे वरील मंडळाच्या निर्मितीकरिता आंतरराष्ट्रीय कायम स्वरूपाचे एक सचिवालय स्थापन करण्यात आले.

वरील मंडळाच्या तीन शाखा होत्या :—

१.– सभासद-सूची (the panel to members of the court)

२.– व्यवस्था-समिती (an Administrative council) व

३.– आंतरराष्ट्रीय सचिवालय (an International Bureau)

आंतरराष्ट्रीय सचिवालय वादग्रस्त प्रश्न हाताळण्याकरिता सभासद-सूचीतून एक तात्पुरते निवाडा (tribunal) मंडळ नेमीत असे. हे निवाडा मंडळ वादग्रस्त प्रश्नांची उकल करीत असे.

जी प्रकरणे या न्यायालयाकडे आणली जात असत त्यांबाबत सदर निवाडा-मंडळ आंतरराष्ट्रीय प्रश्नावर आपले मत देत असे. परंतु अट अशी होती की, या निवाडामंडळासमोर प्रकरण नेण्यासाठी संबंधित दोन्ही वादग्रस्त राष्ट्रांची मान्यता असणे आवश्यक होते.

१९३२ पर्यंत या कायम लवाद मंडळाने कै. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या मार्सेलीस पलायनप्रकरणा * सह, २० प्रकरणांचा निर्णय दिला. १९३२ नंतर एकही प्रकरण या मंडळाकडे नेण्यांत आले नाही' तरी पण कायम लवाद मंडळ राष्ट्रसंघाच्या विसर्जनापर्यंत अस्तित्वात होते. पुढे ते संयुक्त राष्ट्रसंघाने चालू ठेवले. परंतु पूर्वीच्या कायम आंतरराष्ट्रीय न्यायालय व आताच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयातही कायम लवाद मंडळाच्या सूचीमधूनच न्यायाधीशांची नेमणूक केली जात असे.

---

* स्वा. सावरकर-मार्सेलीस पलायनप्रकरण :-स्वा. सावरकर हे ब्रिटिशांचे कैदी होते. त्यांच्यावर असा आरोप होता की ते खुनी लोकांस साथ देत असत. त्यांच्यावर खटला भरण्याकरिता त्यांना ब्रिटिश सरकार इंग्लंडहून भारताला आणताना मार्सेलीस ( फ्रान्स ) च्या किनाऱ्याजवळ त्यांचे जहाज येताच स्वा. सावरकर जहाजातून निसटले. त्यांना एका फ्रेंच शिपायाने पकडले. त्या वेळी त्या शिपायाची अशी समजूत झाली होती की, जहाजावरीलच कामगारांपैकी कोणीतरी एखादा गुन्हा करून निसटण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणून त्याने श्री. सावरकर यांस ब्रिटिश अधिकाऱ्याच्या स्वाधीन केले.

फ्रान्स सरकारने यावर आक्षेप घेतला की अधिकृत अधिकाऱ्याशी विचार-विनिमय न करता ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सावरकरांना परत घेणे हे आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विरुद्ध होते. शेवटी हे प्रकरण कायम लवाद मंडळा (Permanent Court of Arbitration) कडे गेल्यावर ब्रिटिश सरकारला अनुकूल असा निर्णय दिला. तो असा की " ब्रिटिशांनी पद्धतिनुसार कैद्याला ताब्यात नेणे योग्य होते, हे निर्विवाद. परंतु अगोदरच सावरकरांना ब्रिटिशांच्या ताब्यात दिल्यामुळे आता कागदी घोडे दौडविण्यात काही अर्थ उरला नाही. "

## ३ कायम आंतरराष्ट्रीय न्यायालय
### ( Permanent Court of International Justice )

कायम आंतरराष्ट्रीय न्यायालय ही ( The Permanent court of Arbitration ) कायम लवाद मंडळाची परिणत अवस्था होय. ही संघटनाही राष्ट्रसंघाच्या प्रमुख अंगापैकी नव्हती. याची घटना स्वतंत्र होती. ती राष्ट्रसंघाच्या ( Covenant ) सनदेस जोडण्यात आली होती. ही घटना इ. स. १९२१ मध्ये अमलात आली. याची कचेरी हेग ( हॉलंड उर्फ नेदरलँड ) या ठिकाणी होती. त्यात ११ न्यायाधीश व ४ उपन्यायाधीश, असे एकूण १५ जण असत. * प्रत्येक न्यायाधीशाला वर्षाला तीस हजार डॉलर्स पगार होता. प्रमुख न्यायाधीश आणि उप-प्रमुख न्यायाधीश यांची निवड इतर न्यायाधीश करीत असत. एखाद्या राष्ट्राचा तंटा कोर्टासमोर असेल तर त्या राष्ट्राला आपला एक न्याया-धीश त्या प्रश्नापुरता पाठविता येत असे. न्यायाधीशांची निवडणूक राष्ट्रसंघ सभा व समिती यांच्या एकाच बैठकीत होत असे.

आंतरराष्ट्रिय न्यायालयाचे क्षेत्र किती मर्यादित असावे हा प्रश्न विवाद्य होता. त्यामुळे जे आंतरराष्ट्रीय संघर्षाचे प्रश्न या न्यायालयाकडे निकालासाठी सादर करण्यात येत, केवळ त्याच वादाचा निर्णय देण्याचा अधिकार या न्यायालयाला होता. तसेच दोन संबंधित राष्ट्रांनी विनंती केल्यास व त्या प्रतिवादी राष्ट्रांनी पूर्वीच, न्यायालयाचा निर्णय

---

* आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या एका विद्यार्थ्याच्या विधानाप्रमाणे असेही म्हणता येईल की आधुनिक जगाच्या इतिहासात प्रथमतःच कायम स्वरूपी न्यायाधीशांचा संघ स्थापन होऊन न्यायविषयक व विधिविषयक कार्यांचे संशोधन करून मानवी जीवन सुखकर करण्याचा प्रयत्न करण्यात येऊ लागला. (Gerard J. Mangone, A Short History of International Orga-nization, P. 138.)

आम्ही मानू असे लिहून दिल्यास त्यांच्यातील वादग्रस्त प्रश्नांचे निर्णय बहुमताने घेतले जात. पण त्यांची अंमलबजावणी करण्याचे सामर्थ्य कोर्टाजवळ नव्हते. न्यायालयाचा निर्णय मान्य करावयाचा की नाही, हे तंटा करणाऱ्या राष्ट्राच्या इच्छेवरच असे. परंतु कोर्टाचे निर्णय ती राष्ट्रे नेहमी मानीत असत.

आंतरराष्ट्रीय कायदा, आंतरराष्ट्रीय करार, परस्पर जबाबदारीवर आधारित असलेल्या प्रश्नाबाबत निर्णय देत. हे न्यायालय, राष्ट्रसंघ सभा किंवा समिती यांना देशादेशांतील प्रश्न सोडविण्यास कायद्याच्या दृष्टीने सल्ला देत असे.

## ४ आंतरराष्ट्रीय कामगार संघटना I. L. O.

राष्ट्रसंघाच्या पूर्वोक्त संस्थांखेरीज इतर काही आंतरराष्ट्रीय संस्था कार्य करीत असत. त्यांपैकी सर्वात महत्त्वाची संस्था आंतरराष्ट्रीय कामगार संघटना ही होय.

इ. स. १९०० मध्ये पॅरिस येथे मजुरांच्या कायदेशीर संरक्षणाकरिता आंतरराष्ट्रीय मजूर मंडळाची ( International Association for Workers' Legal Protection ) स्थापना झाली. पहिल्या महायुद्धात कामगारांनी प्रत्यक्ष रणभूमीवर असा भाग घेतला नाही. परंतु रात्रंदिवस काम करून त्यांनी उत्पादन वाढविले आणि आर्थिक आघाडी ढासळू दिली नाही. कामगारांच्या सहकार्याचे हे महत्त्व लक्षात घेऊन शांतता मंडळाने (Peace conference) दि. २५-१-१९१९ रोजी एक समिती ( commission ) स्थापन केली व या समितीच्या शिफारशीप्रमाणे आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची स्थापना करण्यात आली. या संस्थेचे कार्यालय जिनेव्हा येथील सरोवराच्या काठी एका सुंदर इमारतीत प्रस्थापित करण्यात आले होते. इ. स. १९४० मध्ये

कामगार कार्यालय जिनेव्हाहून (कॅनडा) मॉन्ट्रियलला हलविण्यात आले.

ही संघटना राष्ट्रसंघाचे उपांग ( Agency ) नव्हती. ही संघटना १९१९ मध्ये व्हर्सायच्या तहातील तेराव्या कलमाप्रमाणे स्वायत्तपणे स्थापन झाली. जरी ही संघटना राष्ट्रसंघाचे एक उपांग म्हणून मानली जात नसली तरी आंतरराष्ट्रीय दर्जाची ती एक स्वायत्त संघटना होती आणि या संघटनेचे अंदाजपत्रक राष्ट्रसंघामार्फतच करण्यात येत असे. कामगारांच्या अधिकाराची आंतरराष्ट्रीय सनद राष्ट्रसंघाने निर्माण केली होती. त्या सनदेनुसार ही संस्था कार्य करीत होती. ह्या संघटनेत कामगार, मालक व सरकार यांचे प्रतिनिधी असत. (औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाच्या पहिल्या आठ क्रमांकात आपल्या भारत देशाचा समावेश होता. म्हणून या संघटनेत तेव्हापासून भारत सहभागी होता.) राष्ट्रसंघाचे सर्व सभासद या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे समासद असत. इतर राष्ट्रेही ज्यांना आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अटी मान्य आहेत तीही सदस्य होऊ शकत. ह्या संघटनेची अमेरिका सभासद होती.

I. L. O. ची प्रमुख दोन अंगे :—आंतरराष्ट्रीय कामगार कार्यालय व आंतरराष्ट्रीय कामगार परिषद ( Labour Conference ) या दोन अंगांमार्फत ही संघटना काम करीत असे. व्हर्सायच्या तहापूर्वीच आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची परिषद इ. स. १९१९ मध्ये प्रथम बोलावण्यात आली होती. कामगार जीवनाशी संबंधित सर्व प्रश्नांचे संशोधन, तद्विषयक माहितीचे संकलन आणि संग्रह या संघटनेने केलेला आहे. याशिवाय राष्ट्राराष्ट्रांतील कामगार संघटनांच्या घटना व कार्यपद्धती हे कार्यही या संस्थेने केले. याबरोबरच मजूरविषयक प्रश्नांचे संशोधन करून त्याबाबत मार्गदर्शन केले. विल्सनचा निवडणुकीत जरी पराभव झाला तरी त्याने मांडलेल्या ' फ्रीडम

फ्रॉम फियर, फ्रीडम फ्रॉम वॉंट' या कल्पना क्रमाने सर्वमान्य होत होत्या. या विचारप्रवाहाच्या संदर्भात I. L. O. चे कार्य पाहिले पाहिजे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने बेकारीनिवारण, आजार, रोगराई आणि अपघात या काळातील तरतुदी, स्त्रिया आणि मुले यांकरिता वेगळे कार्य, वृद्धापकाळातील तरतूद, तांत्रिक शिक्षण व सुट्टया या क्षेत्रातहि भरीव कार्य केले. पांढऱ्या फॉस्फरसचा शोध नुकताच लागलेला होता व औद्योगिक उत्पादनात त्याचा मोठ्या प्रमाणात वापर चालू होता. फॉस्फरसचे ऑक्साईड्स् शरीरप्रकृतीस अत्यंत घातक असल्याचे आढळून आले म्हणून पूर्ण खबरदारी घेतल्याविना सार्वत्रिक फॉस्फरसच्या वापरावर बंदी घालण्याची शिफारस करण्यात आली. जगातील कामगार व मजुरांची अवस्था सुधारण्याकरिता व त्यांचे राहणीमान वाढविण्यासाठी ही संघटना स्थापन झाली आहे. मजुरांचे वेतन कोणत्या तत्त्वावर आधारित असावे, दिवसातून काम करण्याचा अवधी किती असावा, औद्योगिक शिक्षण, मुले व स्त्रिया यांच्या कामासंबंधी अवस्था कशा प्रकारे असावी, मजुरांचे संरक्षण इत्यादी त्याचप्रमाणे ह्या विषयाला अनुसरून येणारे वेगवेगळे विषय यांवर नियम तयार झाले. मार्च १९४१ पर्यंत ही सारी रूपरेखा तयार झाली, ज्यामध्ये ६७ नियम होते. ह्या नियमांना ज्या राष्ट्रांनी स्वीकृती दिली त्यांनाच हे नियम लागू होते. काहींनी पूर्णांशाने तर काहींनी अल्पांशाने, अशा प्रकारे एकूण ५० राष्ट्रांनी स्वीकृती दिली होती. बाकीची राष्ट्रे स्वीकृती हळूहळू देत होती. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात कामगारांच्या हिताविषयी या संस्थेने केलेले कार्य भरीव व चिरस्थायी स्वरूपाचे आहे. राष्ट्रसंघाची इतिश्री झाली, पण आंतरराष्ट्रीय कामगार संघटना आजदेखील जोमाने कार्य करीत आहे.

विशेषतः भारतामध्ये परिस्थिती बरीच सुधारली. मुलांच्या कामाचे तास कमी करण्यात आले. लहान मुलांचे काम करणे बंद झाले. तरी पण या क्षेत्रात अद्यापि बरेच कार्य करावयाचे आहे. १९२५ साली जिनेव्हा कॉन्फरन्ससाठी गेलेल्या भारतीय शिष्टमंडळाच्या एका प्रवक्त्याने केलेले निवेदन सारांशाने असे की, "भारतात बालमृत्यूचे प्रमाण किंवा मजुरांचे आणि श्रमजीवी वरातील जनतेचे दैनंदिन जीवन जितके हलाखीचे आहे तितके इतर कोणत्याही देशात नसेल. परंतु प्रगत व श्रीमंत राष्ट्रांतील एखाद्या मान्यवर किंवा सामान्य व्यक्तीच्या खाजगी जीवनात एखादी घटना घडली तरी जगाचे लक्ष अशा वार्तेकडे वेधले जाते. उदाहरणार्थ, मिसेस लॉईड जॉर्ज यांच्या गळ्यातील मौल्यवान हार ( नेकलेस ) हरवला किंवा एखाद्या ख्यातनाम नटीने नवऱ्याला घटस्फोट दिला तरी ही बाब जगाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरू शकते. परंतु याउलट ज्या भारतीयांचे दैनंदिन जीवन एक शोकांतिकाच होऊ शकेल, ज्यांना केवळ आवश्यक अन्न, निवारा व औषध उपलब्ध न झाल्याने हजारोजण असाह्यतेने मृत्युमुखी पडतात त्यांची दखल जगाला नसावी ही केवढी दैवदुर्विलासाची बाब होय. केवढी ही खेदजनक गोष्ट आहे, असे विचार पी. जे. नॉएल बेकर यांच्या League of Natinos at Work या ग्रंथात व्यक्त केले आहेत.

राष्ट्रसंघाचे संस्थापक-सभासद राष्ट्र म्हणून भारतास मान्यता मिळाल्यामुळे राष्ट्रसंघाच्या इतर शाखा व उपशाखांचे सभासदत्व आपणास आपोआप मिळत गेले. त्यामुळे भारतीय प्रतिनिधींना चर्चा-स्वातंत्र्य व कार्य करण्यास भरपूर वाव मिळाला. आंतरराष्ट्रीय कामगार, न्यायालय, शेती-संघटना, इत्यादी राष्ट्रसंघाच्या संस्थांतून आपले कर्तृत्व दाखविण्याची मोठी संधी भारतास मिळाली.

भारताला आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या कार्यकारी मंडळात कायमचे सभासदत्व देण्यात आले. या संघटनेचे अध्यक्ष म्हणून एकमताने निवडून येण्याचा मान सर अतुल चतर्जी या भारतीय सद्गृहस्थास इ. स. १९२७ व १९३२ या दोन वेळेस मिळाला. भारताला हे बरेच हितवह ठरले. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे सभासदत्व, भारतातील कामगार चळवळीस विस्तृत व विशाल स्वरूप देण्यास पूरक ठरले आणि त्यापुढील दहा वर्षांत कामगार कायद्यांच्या स्वरूपात बऱ्याच वेगाने प्रगती झालेली दिसून आली.

## ५ आंतरराष्ट्रीय वैचारिक सहकार मंडळ

### ( Intellectual Cooperation )

युद्धे ही प्रथम माणसाच्या मनात निर्माण होतात व नंतर रणभूमीवर. अज्ञान व वैचारिक संभ्रमामुळे राष्ट्राराष्ट्रांतील संबंध कलुषित होतात. यामुळे युद्धाची पार्श्वभूमी तयार होते. उदाहरणार्थ, 'ईस्ट इज ईस्ट अँड वेस्ट इज वेस्ट' ( East is East and West is West ) असे शिकवण द्वेषभावना वाढीस लावते. राष्ट्राराष्ट्रांतील वैचारिक संघर्ष कमी व्हावेत वा ते मुळीच निर्माण होऊ नयेत म्हणून राष्ट्रसंघाने विद्वान व तज्ज्ञ आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या राजकारणापासून अलिप्त अशा व्यक्तींचे एक मंडळ स्थापन केले होते.

राष्ट्रसंघाला सुरुवातीस या मंडळाची कल्पना पटली नाही. परंतु भारताने सतत याचा आग्रह धरल्यानंतर राष्ट्रसंघाने हे मंडळ स्थापन केले. याची मुख्य कचेरी पॅरिस येथे ठेवण्यात आली. प्रत्येक राष्ट्रात एक राष्ट्रीय वैचारिक संघ स्थापन करून या संघामार्फत आंतरराष्ट्रीय वैचारिक सहकार मंडळास सहकार्य दिले जाई. राष्ट्राराष्ट्रांतील वैचारिक व सांस्कृतिक संबंध दृढ केले जात.

मंडळाला *असा पूर्ण आत्मविश्वास होता की 'जागतिक अस्मितेच्या' निर्मितीवरच राष्ट्रसंघाचे भवितव्य अवलंबून आहे, याची सर्वांना जाणीव झाली. म्हणून या मंडळाने विशेषतः वैचारिक क्षेत्रात वावरणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींचे सहकार्य घेऊन आंतरराष्ट्रीय क्षेत्रात वैचारिक व भावनात्मक सहकार्य निर्माण करावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.+राष्ट्रसंघाच्या शांतता प्रस्थापन कार्यास अधिक भरीव स्वरूप मिळावे म्हणून, शिक्षक, प्राध्यापक, कवी, लेखक व संशोधक यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कर्तृत्व व नैपुण्य दाखविण्यास योग्य संधी मिळावी, प्रगती करता यावी या दृष्टीने मदत व प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने विविध योजना आखण्यात आल्या व त्या योग्य प्रकारे कार्यान्वित करण्यात आल्या.

हे आंतरराष्ट्रीय वैचारिक सहकार मंडळ सोळा सभासदांचे होते. यामध्ये भारताचे श्री. जगदीशचंद्र बोस व डॉ. राधाकृष्णन् हेही होते. या मंडळाच्या अनेक उपसमित्या स्थापन करण्यात आल्या. प्रत्येक उपसमिती एका विशिष्ट क्षेत्रात काम करीत असे. भारतीय शिष्टमंडळ आंतरराष्ट्रीय बौद्धिक सहकार्यात हिरीरीने पुढाकार घेत असे.

---

* " – The future of the League of Nations depends upon the formation of a universal conscience - -- , " The League of Nations and Intellectial Cooperation, Information Section, League of Nations Secretariat, Geneva, Revised edition 1927, August. P. 7.

+ एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिकामध्ये अशी एक नोंद आढळते की " १९२६ मध्ये सभेने ( असेंब्लीने ) एक ठराव केला आणि निरनिराळ्या राष्ट्रांनी व राज्यांनी आपापल्या विद्यार्थी–अभ्यास मंडळांना जिनेव्हा येथे अभ्यास–दौऱ्यावर पाठवावे आणि राष्ट्रसंघाची मूलभूत माहिती व समग्र कार्यपद्धतीचे ज्ञान मिळवावे. " या ठरावानुसार राष्ट्रसंघसभेने अभ्यास-मंडळाच्या दौऱ्यासाठी एक योजनाही आखली होती.

या मंडळामार्फत शैक्षणिकदृष्ट्या अप्रगत राष्ट्रांना साह्य केले जात असे. उदाहरणार्थ, प्राध्यापकांची अदलाबदल, शिष्यवृत्त्या देणे, शैक्षणिक साहित्याचा पुरवठा करणे, संशोधनात्मक पारितोषिके देणे, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक पर्यटनास उत्तेजन देणे, इत्यादी कार्यक्रमांचा यात समावेश होतो. ह्याशिवाय तज्ज्ञांच्या सहकार्याने राष्ट्राराष्ट्रांतील शैक्षणिक सहकार्य वाढविण्याचे प्रयत्न केले जात असत. यामुळे राष्ट्राराष्ट्रांत, सांस्कृतिक सहकार्य निर्माण होऊन परस्परांतील स्नेहभाव वाढविला जात असे.

● ● ●

# राष्ट्रसंघाचे कायदेशीर स्वरूप ६

संस्था व संघ सकृद्दर्शनी निर्जीव व निराकार वाटत असले तरी कायद्याच्या दृष्टीने त्यास व्यक्ती समजण्यात येते. व्यक्तीस ज्याप्रमाणे काही हक्क व कर्तव्ये असतात, त्याचप्रमाणे प्रत्येक संस्थेस व संघासही हक्क व कर्तव्ये असतात. म्हणूनच संघाला कायदेशीर काल्पनिक व्यक्ती मानण्यात येते.

वरील दृष्टिकोनातून पाहू जाता राष्ट्रसंघ ( League of Nations ) हा केवळ एक आंतरराष्ट्रीय मेळावा ( Community ) दिसतो. परंतु राष्ट्रसंघाच्या अंगीकृत कार्यांचा अभ्यास केल्यानंतर ती एक काल्पनिक कायदेशीर व्यक्ती ठरते. कारण राष्ट्रसंघाच्या विविध शाखांच्या कचेऱ्या विविध राष्ट्रांत होत्या व विविध राष्ट्रांशी संपर्क ठेवीत होत्या. राष्ट्रसंघाकडे सोपविलेल्या प्रदेशावर राष्ट्रसंघास स्वयंपूर्ण अधिकार असे. उदाहरणार्थ, सारचे खोरे. दोन राज्यांतील वादग्रस्त प्रश्नांत राष्ट्रसंघ हस्तक्षेप करून त्याची सोडवणूक करीत असे. राष्ट्रसंघाने शांतता व सहजीवन प्रस्थापित करण्याकरिता काही आंतरराष्ट्रीय संकेत निर्माण केले व त्यांचे पालन संबंधित राष्ट्रांकडून केले जात होते. वादग्रस्त प्रदेशांना, उदाहरणार्थ, डॅन्झीगला संरक्षण दिले. राष्ट्रसंघ युद्ध व शांतता यांबाबत जाहीरनामे काढू शकत असे. अल्पसंख्याकांना देखील संरक्षण देत असे. उदाहरणार्थ, रुमानिया, लिथुआनिया हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया व युगोस्लाव्हिया येथील अल्पसंख्याकांना संरक्षण दिले. वरील गोष्टींवरून स्पष्ट होते की राष्ट्रसंघ ही आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टिकोनातून एक व्यक्ती (Legal, Person ) होते.

• • •

# राष्ट्रसंघाचे कार्य ७

राष्ट्रसंघ हा जागतिक शासनाच्या ( World Government) दिशेने महत्त्वाचा एक टप्पा ठरला. जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने राष्ट्रसंघाने ऐतिहासिक कामगिरी केली. जिनेव्हा येथे राष्ट्रसंघाच्या स्थापनेच्या वेळी जी पहिली बैठक झाली त्या वेळी नव्या उमेदीने चर्चा व विचारांची देवाणघेवाण झाली आणि राष्ट्रसंघाच्या उभारणीची व कार्याची आखणी झाली. याप्रमाणे राष्ट्रसंघाने करावयाच्या कार्याचे तीन भाग पाडण्यात आले ते असे :

१.— राजकीय व युद्धप्रतिबंधक,

२.— आर्थिक,

३.— सामाजिक व मानवतावादी.

## १. राजकीय व युद्धप्रतिबंधक

राष्ट्रसंघाची पहिली १० वर्षे राजकीय समस्या सोडविण्याच्या प्रयत्नात गेली. काही महत्त्वाचे तंटे मिटविण्यात त्याला यशाही आले आहे.

[ १ ] ऑलंड बेटाचे प्रकरण ( १९२०-२१ ) :— ऑलंडबेट स्वीडन व फिनलँड या दोहोंच्या मधोमध आहे. १९१७ पर्यंत फिनलँड व ऑलंड यांवर रशियाचे अधिपत्य होते. १९१७ मध्येच फिनलँडने स्वातंत्र्य जाहीर केले. त्याला स्वीडनने मान्यता दिली.

परंतु ऑलंड बेटामध्ये बहुसंख्य लोक स्वीडिश भाषा बोलणारे होते. ऑलंडमधील लोकांनी स्वीडनमध्ये विलीन होण्याकरिता चळवळ

सुरू केली. त्याला स्वीडनच्या जनतेने सहानुभूती दर्शविली. फिनलँडच्या सरकारने लष्कर पाठवून ऑलंडमधील चळवळ दाबण्याचा प्रयत्न केला व चळवळीत भाग घेणाऱ्यांना बंदिस्त केले.

स्वीडनच्या जनतेने स्वीडनच्या सरकारास या प्रकरणात लक्ष घालण्यास भाग पाडले. यामुळे स्वीडन आणि फिनलँड यांत युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली. शेवटी हे प्रकरण राष्ट्रसंघ समितीकडे नेण्यात आले.

समितीने १९२१ मध्ये असा निर्णय दिला की, फिनलँडचे सार्वभौमत्व ऑलंड बेटावर राहील; परंतु तेथील जनतेला स्वायत्तता देण्यात यावी. त्याप्रमाणे तेथील जनतेच्या राजकीय हक्कांना संरक्षण देण्यात आले.

१९२२ मध्ये ऑलंड बेटाला तटस्थ जाहीर करून आंतरराष्ट्रीय संरक्षण देण्यात आले. राष्ट्रसंघाच्या या निर्णयास तत्संबंधित राष्ट्रे स्वीडन व फिनलँड यांनीही मान्यता दिली.

[२] **अप्पर (उत्तर) सायलेशिया प्रकरण ( १९२१ ) :–** पोलंड व जर्मनीमधील सीमावादाबाबत राष्ट्रसंघाने एक समिती नेमली व त्यामार्फत उत्तर सायलेशिया विषयाची कटकट सामोपचाराने मिटविली व त्या देशांची सीमारेषा ठरविण्यात आली.

[ ३ ] **ग्रीस आणि इटाली –ग्रीस आणि अल्बानिया (१९२३)** यांच्यातील सीमाप्रश्नातून इटली व ग्रीस या दोघांत तंटा विलक्षण प्रकारे उपस्थित झाला. ग्रीस व इटली या दोन राष्ट्रांमध्ये सीमेची निश्चिती करण्याकरिता मंडळ नेमण्यात आले होते. या मंडळातील एका इटालियन सभासदाचा खून ग्रीसच्या सत्तेखालील प्रदेशात १९२३ साली करण्यात आला. त्यामुळे इटलीने याची सर्व जबाबदारी ग्रीसवर टाकली

७८६०६ — निबंध — २९६५ ३१.३.५५

व खुनाच्या भरपाईबद्दल कराची मागणी केली. ग्रीसने इटलीची मागणी फेटाळून लावली. इटालीने कर्फू बेटावर कबजा केला, शेवटी राष्ट्रसंघाने मध्यस्थी करून दोन्ही राष्ट्रांत तह घडवून आणला. या तहानुसार ग्रीसने इटलीला नुकसानभरपाई दिली व इटलीने कर्फू बेटामधून सैन्य काढून घेतले.

[ ४ ] इ. स. १९२४–२६ मध्ये इराक व तुर्कस्थानमध्ये सरहद्दी-बाबत मोठा तंटा सुरू होता. तो तंटा ह्या संघाने यशस्वीरीत्या हाताळला.

[ ५ ] ग्रीस व बल्गेरिया ( १९२५ ) मध्ये सीमेबाबत तंटा चालू होता. या प्रकरणात राष्ट्रसंघाने, ग्रीसला आपले लष्कर बल्गेरियाच्या भूमीवरून परत न्यावयास लावले व सरहद्दीचे बेकायदेशीर उल्लंघन केल्याबद्दल ग्रीसकडून नुकसानभरपाई घेण्यात आली.

[ ६ ] इ. स. १९२० मध्ये पोलंड व लिथुनिया यांच्यात, सर-हद्दीच्या तंट्यामुळे तंग परिस्थिती निर्माण झाली होती. या दोन राष्ट्रां-मधील हा वादग्रस्त प्रश्न, दोन्ही राष्ट्रांना समाधानकारक होईल असा राष्ट्रसंघाने सोडविला. अशा रीतीने होऊ घातलेल्या युद्धाचे भय दूर केले.

[ ७ ] १९३३ साली चीन-जपानमधील युद्ध या संघाच्या मध्यस्थीने थांबले.

[ ८ ] दक्षिण अमेरिकेत बोलाव्हिया आणि पॅराग्वे यांच्यात १९२८ साली युद्ध सुरू झाले. राष्ट्रसंघाने १९३५ साली ते युद्ध थांबविले.

[ ९ ] युगोस्लाव्हिया आणि हंगेरी यांच्यामध्ये १९३५ साली तंटा उद्‌भवला, तेव्हांही राष्ट्रसंघाने मध्यस्थी केली.

[ १० ] युद्धोत्तर सरहद्दी निश्चित करण्यासाठी अनेक ठिकाणी निपक्षपातीपणे सार्वमत घेतले.

९७९६

[ ११ ] – युद्धे उपस्थित होऊ नयेत, त्यांची कारणे मूलतः नष्ट व्हावीत, लहानमोठ्या सर्व राष्ट्रांस सुरक्षितता मिळावी अशी स्थिती निर्माण व्हावी, एकमेकांच्या मनांत साशंकता व भीती वाटू नये * म्हणून आपल्या संरक्षणास जरूर तेवढे युद्धसाहित्य ठेवून बाकीचे कमी करावे. शस्त्रास्त्रनिर्मिती व स्पर्धा कमी करावी यासाठी अनेक सभा भरविल्या गेल्या. याबाबत इ. स. १९१९–३९ च्या दरम्यान अनेक प्रयत्न झाले. त्यांपैकी १९२५ मध्ये स्थापलेल्या प्रास्ताविक मंडळ ( Preparatoray Commission ) व १९२८ मधील पॅरिस करार आणि १९३२ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या जागतिक सम्मेलनाचे प्रयत्न या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. ( Treaty of Paris– Kellog Pact ) अमेरिका व रशिया ही दोन्ही राष्ट्रे यास सहमत झाली होती, पण ही दोन्हीही राष्ट्रे राष्ट्रसंघाचे सदस्य नव्हती. +

* "Secrecy breeds suspicion and suspicion is the nurse of fear," Harold J. Laski, A Grammar of Politics P. 589.

+ अमेरिका व रशिया ही दोन्ही राष्ट्रे राष्ट्रसंघाच्या इतर पुष्कळशा कार्यक्रमात सहकार्य करीत होती. George W. Southgate, A Text Book of Modern European History ( 1789–1945 ), chap. 28, 1957 Edition.

वरील जागतिक परिषदांत खालील तीन तत्त्वांना मान्यता देण्यात आली :–

१.– युद्धाशी संबंधित नसलेल्या नागरिकांवर हल्ले करण्यात येऊ नयेत.

२.– जंतुअस्त्रे वापरण्यात येऊ नयेत.

३.– विषारी वायूंचा वापर केला जाऊ नये. परंतु १९३३ मध्ये जर्मनी, शस्त्रास्त्रनियंत्रण सम्मेलनामधून बाहेर पडल्यामुळे अगोदरच्या सर्व कार्यावर पाणी फिरविले गेले.

जरी अभिप्रेत मर्यादेपर्यंत निःशस्त्रीकरण झाले नाही तरी पण लोकार्नो, केलॉग, वॉशिंग्टन, वगैरे करार व सम्मेलनांद्वारे देशांतील परस्पर अविश्वास बऱ्याच अंशीं कमी झाला. शस्त्रास्त्रांच्या उपयोगाची व्याप्ती काही काळापुरती का होईना बऱ्याच प्रमाणात थांबली. अशा तऱ्हेने निःशस्त्रीकरणासाठी केलेल्या चर्चेत गेलेला वेळ फुकट न जाता काही सर्व दृष्टीने उपयुक्त ठराव ( उदाहरणार्थ, शस्त्रास्त्रनिर्मिती, शस्त्रास्त्र-व्यापार प्रसिद्धी, इत्यादींवर मर्यादा घालण्यासंबंधी ) झाले.

[१२]– सारखोरे हा, जर्मनीच्या ताब्यात असलेला खनिज संपत्तीच्या दृष्टीने समृद्ध प्रांत फ्रान्सला नुकसानभरपाईच्या स्वरूपात जर्मनीने द्यावा असे व्हर्सायच्या तहाप्रमाणे ठरविण्यात आले. परंतु सारखोऱ्याचा राजकीय तावा व देखरेख आंतरराष्ट्रीय मंडळामार्फत केली गेली. मध्यंतरीच्या काळात म्हणजे १५ वर्षे ह्या प्रांताची व्यवस्था राष्ट्रसंघानेच पाहिली. इ.स. १९३५ च्या सार्वमताच्या निर्णयानुसार हा प्रांत पुन्हा जर्मनीकडे गेला.

[ १३ ] डॅन्झिग हे बंदर पोलंडचे एकमेव प्रवेशद्वार होते, तरी तेथील बहुसंख्य प्रजा जर्मन होती, म्हणून राष्ट्रसंघाने या बंदरास द्विदल व्यवस्था लागू केली. नागरी प्रशासनाचे अधिकार उदाहरणार्थ, तार, टपाल, दळणवळण व रेल्वे यांची व्यवस्था पोलंडतर्फे पाहिली जाई, इतकेच नव्हे तर पोलंडला हे बंदर व्यापारी व नागरी वाहतुकीकरिताही खुले केले गेले. परंतु पोलंडला लष्करीदृष्ट्या यांचा उपयोग करण्याची सक्त मनाई करण्यात आली व राजकीय व्यवस्था राष्ट्रसंघाने आपल्याकडे घेतली. काही वादग्रस्त प्रश्नांचा निकाल राष्ट्रसंघाचे वरिष्ठ मंडळ अथवा राष्ट्रसंघ सभा करीत असे.

[ १४ ] जगाच्या इतिहासात प्रथमच जागतिक युद्धाबाबत संशोधन व उपाययोजना सुचविणारे मंडळ स्थापन करण्यात आले.

[ १५ ] राष्ट्रसंघाच्या स्थापनेपूर्वी युद्धात विजयी झालेली राष्ट्रे पराभूत राष्ट्रांच्या वसाहती बळकावून त्यांचा स्वतःसाठी उपयोग करीत. पण राष्ट्रसंघाच्या (Permanent Mandate Commission) कायम पालक मंडळ योजनेमुळे या परिस्थितीत इष्ट असा बदल झाला. विजयी राष्ट्रांच्या ताब्यात पराजित जर्मनी व तुर्कस्थानचे प्रदेश आले तरी त्या अप्रगत प्रदेशांच्या विकासाची व तेथे स्वायत्त शासनसंस्था निर्माण करण्याची जबाबदारी राष्ट्रसंघाने विजयी राष्ट्रांवर लादली. राष्ट्रसंघाला वार्षिक इतिवृत्त सादर करून स्वतःच्या नियंत्रणाखालील प्रदेशांच्या विकासाची माहिती वलिष्ठ राष्ट्रांना द्यावी लागे. वरेच पाल्य प्रदेश (Mandate Territories), उदाहरणार्थ, इराक, पॅलेस्टाईन, सीरिया, आफ्रिकेतील जर्मनीच्या वसाहती आणि अनेक इतर प्रदेश संघाच्या देखरेखीखाली होते आणि ह्या राष्ट्रांना क्रमाक्रमाने स्वातंत्र्य मिळाले.

[ १६ ] अल्पसंख्याक :– पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर काही राष्ट्रांची पुनर्रचना करण्यात आली. यामुळे काही अल्पसंख्याक लोकांचे प्रश्न संघापुढे आले. अल्पसंख्याकांना संरक्षण देण्याकरिता प्रत्येक राष्ट्रास मान्य होईल असे काही नियम तयार केले गेले ते खालीलप्रमाणे होत :

अल्पसंख्याकाच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचें संरक्षण करण्याची जबाबदारी स्वतःसंघाने स्वीकारली व त्याकरिता खालील तत्वे सदस्य-राष्ट्रांनी मान्य करावीत असे सुचविले.

१.– अल्पसंख्याकांचे वंश, कुल व जातनिरपेक्ष हक्कांचे संरक्षण केले जावे.

२.– धर्म, विचार आणि संघस्वातंत्र्य असावे.

३.– सामाजिक व राजकीय हक्क दिले जावे.

४.–भाषास्वातंत्र्य दिले जावे.

५.– मातृभाषेतून शिक्षण घेण्याचा हक्क असावा.

६.– संबंधित राष्ट्रांची मान्यता घेऊन अल्पसंख्याकांस धार्मिक व शैक्षणिक संस्था स्थापन करण्याची परवानगी देण्यात यावी.

एखाद्या अल्पसंख्याक जमातीचे वा व्यक्तीच्या हक्कांचे संरक्षण नसल्यास संबंधित राष्ट्राविरुद्ध दाद मागण्याचा अधिकार अशा संस्था व व्यक्तीस देण्यात आला व त्याने तशी दाद राष्ट्रसंघासमोर मागावी; त्याकरिता न्याय मागणारा इसम किंवा व्यक्तीने खालील नियमांची परिपूर्ती करावी अशी तरतूद करण्यात आली.

१.–दाद मागणाऱ्या व्यक्तीने वा संस्थेने आपल्या नावानिशी अर्ज संघाकडे करावा.

२.– अर्ज सनदशीर योग्य भाषेतून असावा.

३.– हक्कमागणीचा त्यात उल्लेख केला जावा. केवळ शाब्दिक तक्रारीचा सूर त्यात नसावा

वरील तरतुदीनुसार रुमानिया, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हिया व लिथुआनिया येथील अल्पसंख्याकांना संरक्षण दिले.

[ १७ ]– प्रत्येक नवोदित राष्ट्राला आंतरराष्ट्रीय नियमांनी, कार्यपद्धतीने व करारांनी एकत्र आणून त्यास आंतरराष्ट्रीय कायद्याचे रूप दिले व अशा प्रकारे परस्परसंबंधांना वैधानिक व न्यायालयीन स्वरूप प्राप्त झाले.

[ १८ ]– कायम आंतरराष्ट्रीय न्यायालयाने ३२ तंटे हाताळले; ११ न्यायनिवाडे व २७ प्रश्नांच्या बाबतीत आपला सल्ला राष्ट्रसंघाला दिला. ६ प्रकरणांच्या बाबतीत एकतर्फी निर्णय दिला.

उदाहरणार्थ, एस. एस. लोटस प्रकरण ( १९२७ ) भूभागावर, जमिनीवर कोणत्याही एका राष्ट्राची व राज्याची सत्ता असते. प्रत्येक राष्ट्राच्या सीमा निश्चित केलेल्या असतात. आपल्या हद्दीत दडलेल्या

अपघातांची वा गुन्ह्यांची चौकशी संबंधित भूभागावरील सत्ता करू शकते. परंतु महासागरावर ( High Sea ) वा सागरावर सीमा निश्चित करता येत नाहीत. म्हणून सागरावर अथवा महासागरावर कोणत्याही एका राष्ट्राची वा राज्याची सत्ता नसते, असे आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार मानण्यात आले आहे. असे असले तरी समुद्रावर असलेले जहाज ज्या राष्ट्राचे असेल त्या राष्ट्राचा तो एक भूभाग, असे समजण्यात येते व नुकसान वा अपघाताबद्दल चौकशी करण्याचा, गुन्हा शाबीत करण्याचा किंवा गुन्हेगारास शासन करण्याचा अधिकार ज्या राष्ट्राचा ध्वज त्या जहाजावर असेल त्या राष्ट्रास असतो, असा कायम आंतरराष्ट्रीय न्यायालयाने एका प्रकरणात निकाल दिला आहे. ते प्रकरण असे :–

२ ऑगस्ट १९२६ रोजी लोटस नावाचे फ्रेंच जहाज समुद्रप्रवास करीत असताना त्याची टक्कर 'बोझकोर्ट' या तुर्की जहाजाशी झाली. परिणामतः बोझकोर्ट हे जहाज पाण्यात बुडाले आणि आठ तुर्की नागरिक प्राणास मुकले.

हसनबेग तुर्की जहाजाचा कप्तान आणि डेमन्स हा फ्रेंच कप्तान या दोघांविरुद्ध तुर्की सरकारने चौकशी करून दोघांनाही शिक्षा ठोठावल्या. फ्रेंच सरकारने तुर्कस्थानच्या निर्णयाविरुद्ध व डेमन्सच्या सुटकेकरिता तुर्कस्थानच्या निर्णयास हरकत घेतली व बाजू मांडली की, घटना समुद्रावर घडल्याने महासागरावर कोणत्याही एका विशिष्ट सरकारची सत्ता नसते. अशा स्थितीत डेमन्सला शिक्षा करण्याचा अधिकार तुर्कस्थान सरकारला पोचत नाही.

हे प्रकरण कायम आंतरराष्ट्रीय न्यायालयासमोर आले. दोन्ही पक्षांच्या बाजू ऐकून घेतल्यावर जागतिक न्यायालयाने असा निर्णय दिला की, महासागरावर कोणत्याही एका विशिष्ट राष्ट्राची सत्ता नसली तरी सागरावरील जहाज ज्या राष्ट्राचे असेल त्या राष्ट्राचा तो प्रदेश

भूभाग असल्याने त्या जहाजावर घडलेल्या आघातांची व गुन्ह्यांची चौकशी करण्याचा अधिकार संबंधित दोन्हीहि राष्ट्रांना आहे. तेव्हा अशा स्थितीत तुर्कस्थानने फ्रेंच कप्तानास दिलेली शिक्षा योग्यच होय.

[ १९ ]- ( High Commission ) निर्वासितांचा व पहिल्या महायुद्धानंतर युरोपभर पसरलेल्या चार लाख युद्धकैद्यांची अदलाबदल व पुनर्वसनाचा प्रश्न :– पहिल्या महायुद्धामुळे अनेक शहरे उद्ध्वस्त झाली. त्यामुळे निर्वासितांची संख्या वाढली व युद्धकैद्यांच्या संख्येतही वाढ झाली. रशियातील यादवीमुळे दोन लाख ऑर्थडाक्स चर्चचे ख्रिश्चन लोक निर्वासित झाले. इ. स. १९२२ मध्ये केमालपाशाच्या विजयी सैन्याच्या धुमाकुळामुळे तुर्कस्थानमधील अनेक लोक निर्वासित बनले. याशिवाय इ. स. १९३३ मध्ये नाझींच्या जुलमास कंटाळून अनेक ज्यू लोकांनी देशत्याग केला. म्हणून एक उच्चाधिकार सामिती ( High Commission ) स्थापन करण्यात आली. युद्धकैद्यांना चांगली वागणूक मिळावी म्हणून राष्ट्रसंघाने प्रयत्न केले. १९१८ मध्ये डॉ. फ्रिजॉट नानसेन ( Dr. Fridtjot Nansen ) यांची राष्ट्रसंघातर्फे पुनर्वसाहत हायकमिशनर म्हणून नेमणूक झाली व त्यांना ' रेड क्रॉस सोसायटी' चे सहकार्य मिळवून देण्य त आले.

डॉ. नानसेन यांची कारकीर्द बहुमोलाची ठरली. त्यांच्या नेतृत्वाखाली बहुविध कल्याणकारी योजना कार्यान्वित आणि फलद्रूप झाल्या. प्रामुख्याने निर्वासितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न, युद्धामुळे अनाथ व अपंग झालेल्या बालकांचे जीवन सुखी करण्याचा प्रयत्न करतानां डॉ. नानसेन यांना अनेक प्रकारच्या अडीअडचणीतून मार्ग काढावा लागला. त्यांच्या या कामगिरीचे महत्त्व अद्वितीय दर्जाचे ठरले. त्यांनी मानवी जीवनाच्या विकासाकारिता भरीव कार्य केले. डॉ. नानसेन यांची तिकिटे काढूनही

निर्वासितांच्या राजकीय कैद्यांना आर्थिक साहाय्य केले. रेडक्रॉस संस्था आणि इतर संस्थांनीहि या क्षेत्रात भरीव कार्य केले.

राष्ट्रसंघाने १९२७ मध्ये स्थापन केलेल्या भूतदयावादी मंडळाने या कामी फार मोलाचे कार्य केले वंश, जात व धर्म निरपेक्षपणे, अपंग व अनाथांचे पुनर्वसन केले. डॉ. नानसेन यांनी सैबेरिया, चीन, इत्यादी भागातील पाच लाख युद्धकैद्यांचा ( Repatriation ) पुनर्वसाहत केली. रशियातील सोळा लाखांपेक्षा अधिक दुष्काळपीडितांना साहाय्य केले व सुमारे एक कोटी पीडितांना अन्नदान केले. रशियन, अरमेनियन व ग्रीक निर्वासितांना वसविण्यात आले. १९२३ मध्ये डॉ. नानसेन यांना शांतता पारितोषिक ( Noble Peace Prize ) देऊन गौरव करण्यात आला. इ. स. १९३० मे च्या १३ तारखेस त्यांना देवाज्ञा झाली. वुड्रो विल्सन यांनी राष्ट्रसंघाच्या कार्याचा पाया रचला तर डॉ. नानसेन यांनी भरीव कामगिरी करून त्यावर कळस चढविला.

१९३१ साली चीनमध्ये नद्यांच्या महापुरामुळे फार मोठे नुकसान झाले. लाखो जीवांची हानी झाली. चिनी सरकारला राष्ट्रसंघाने या कामी बरेच साहाय्य केले. श्री. मित्र ह्या भारतीय प्रतिनिधीने, सर्व आशियाई राष्ट्रांनी या कामी चीनला फार मोठे साह्य करावे म्हणून विनंती केली. ह्या विनंतीस चांगलाच प्रतिसाद मिळाला होता.

[ २० ] इ. स. १९२८ मध्ये ज्या वेळी बल्गेरियामध्ये भूकंप झाला त्या वेळी तेथील पीडितांना संघाने सढळ हस्ते मदत केली.

[ २१ ] जगातील लोकसंख्येच्या एक-चतुर्थांश असलेल्या चिनी जनतेच्या आधुनिक राष्ट्र बनण्याच्या आकांक्षेला मूर्त स्वरूप आणण्यासाठी राष्ट्रसंघाकडून तांत्रिक मदत भरपूर मिळाली.

[ २२ ] सयामची बंदरे सुधारण्यासाठी राष्ट्रसंघाने पुरेशी मदत केली.

## २. आर्थिक कार्य

राष्ट्रसंघ स्थापन झाल्याबरोबर तेथील कर्मचाऱ्यांनी निरनिराळ्या तांत्रिक संघटना निर्माण करण्याच्या योजना आखल्या. त्या संघटनांमार्फत आंतरराष्ट्रीय सहकार्याने रोगराईनिवारण, आर्थिक सुव्यवस्था, दळणवळण व व्यापार, चलन, हुंडी आणि इतर सुधारणा प्रस्थापित करण्याचे योजिले. त्याप्रमाणे आर्थिक-संघटना, दळणवळण-संघटना व आरोग्य-संघटना, अशा तीन आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण करण्यात आल्या. या संघटना राष्ट्रसंघाच्या विस्तृत धोरणापासून स्वतंत्र व स्वयंपूर्ण होत्या. शिवाय त्या परिस्थित्यनुरूप होत्या. राष्ट्रसंघाच्या सभासदांच्या मतानुसार तांत्रिक संघटनांची निर्मिती व्हावी ही एक महत्त्वाची बाब होती. स्वित्झर्लंडचे प्रतिनिधी श्री. अडोर यांनी घोषणा केली की, "राष्ट्रसंघाने नुसत्या आदर्श वातावरणात राहावयाचे नसून, त्या संघाने विधायक कार्य व तत्कालीन व्यावहारिक प्रश्न हाताळण्याची सिद्धता दाखविली पाहिजे."

आर्थिक संबंधात ह्या संघाने बरेच भरीव कार्य केलेले आहे. राष्ट्रसंघाच्या विविध तांत्रिक उपशाखांपैकी ( Economic and Financial Organisation ) आर्थिक शाखेचा बराच विकास झाला होता. आर्थिक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविण्याचे प्रयत्न केले आहेत.

( १ )– आर्थिक मंदीला तोंड देण्याकरिता इ. स. १९२० मध्ये ब्रुसेल्स येथे एक आंतरराष्ट्रीय आर्थिक काँग्रेस ( International Financial Conference ) बोलाविण्यात आली होती. अशी संम्मेलने वारंवार बोलाविण्यात येत असत. आर्थिक व सामाजिक प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले जात.

(२)– आर्थिक मंदीमुळे अनेक राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था कोसळण्याच्या बेतात होत्या. जागतिक आर्थिक घडी विसकळीत झाली. चलनाचे अवमूल्यन होत गेले. कागदी नोटांचा वापर अमर्याद प्रमाणात सुरू झाला. त्यामुळे जागतिक उद्योग व वाणिज्यावर मंदीची लाट उसळली. हे आर्थिक ऱ्हासाचे चक्र अधिक गतिमान होऊ नये या हेतूने राष्ट्रसंघाने १९३१ मध्ये अत्यंत मोल्यवान संशोधन केले आहे. राष्ट्रसंघाने तांत्रिक सल्ला व आर्थिक साह्यहि दिले.

( ३ )– ऑस्ट्रिया, हंगेरी, बल्गेरिया आणि ग्रीस या राष्ट्रांना चाळीस कोटी डॉलरचे कर्ज राष्ट्रीय पुनर्घटनेकरिता देण्यात आले.

( ४ )– आकडेवारीनिशी अधिकृत माहिती मिळविणारे आंतरराष्ट्रीय दर्जाचे मंडळ ( Commission ) कायम करण्यांत आले. या मंडळाने तुलनात्मक दृष्ट्या गुणात्मक आणि संख्यात्मक दृष्टीने माहिती पुरवावी असेही सुचविण्यात आले. ज्या राष्ट्रांची पाहणी करावयाची त्या राष्ट्रांची आर्थिक, सामाजिक व आरोग्यविषयक निश्चित माहिती मिळवून त्यावर उपाययोजना करणे यामुळे सोइस्कर झाले.

( ५ )– ( Bruce Report ) ब्रूस रिपोर्ट :—

जिनेव्हा येथे १९२७ मध्ये जी आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषद भरली होती तीत भारतीय प्रतिनिधी सर सी. पी. रामस्वामी बोलताना म्हणाले की, "जागतिक सुरक्षितता स्थापन करण्यासाठी आर्थिक शांततेचा कणा मजबूत करणे जरूरीचे आहे. कारण बहुतेक संघर्षाचे उगमस्थान आर्थिक व सामाजिक विषमता आहे." राष्ट्रसंघाने हे आर्थिक क्षेत्र जागतिक पातळीवर समर्थ करावे, असाच भारतीय शिष्टमंडळाचा प्रयत्न सातत्याने होता. या शाखेचे आधिवेशन जेव्हा सॅन्फ्रॅन्सिस्कोला भरले तेव्हा भारताचे रामस्वामी मुदलियार त्याचे अध्यक्ष होते.

जगात पहिल्या महायुद्धानंतर काही काळपर्यंत जी आर्थिक मंदीची भयानक लाट उसळली त्या वेळेस या संकटाला तोंड देण्यासाठी होणारे प्रयत्न व अभ्यास आंतरराष्ट्रीय पातळीवरूनच व्हावा, असा जो प्रयत्न भारतीय प्रतिनिधींनी केला तो एकमताने मान्य करण्यात आला व भारतीय प्रतिनिधींच्या प्रयत्नामुळे हा अभ्यास पुढेही चालू ठेवण्यात आला.

जागतिक शांतता प्रस्थापित करून किंवा कायम टिकवावयाची असल्यास आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक समस्यांकडे सर्वप्रथम अधिकाधिक लक्ष द्यावयास हवे. भारताने हा विचार पुनःपुन्हा आग्रहाने १९ वर्षे सतत मांडला. हे तत्त्व इतर राष्ट्रांनाहि हळूहळू पटत गेले व त्याचे फल म्हणून राष्ट्रसंघाने सर ब्रूस यांच्या अध्यक्षतेखाली या समस्येचा विचार करण्यासाठी एक कमिटी नेमली.

मे १९३९ मध्ये ब्रूस यांनी अध्यक्षपद स्वीकारले. त्या कमिटीचे सभासद श्री. चार्ल्स रिस्ट, हॅरॉल्ड बटलर, हॅम्ब्रो, मॉरिस, ब्रोकीन, फान्सिसको टुडेला हे होते. यांनी ही योजना तयार केली. केवळ राजकीय समस्यांची उकल केल्यानेच शांतता प्रस्थापित होत नाही तर त्यासाठी आर्थिक, सामाजिक प्रश्नही विचारात घेणे आवश्यक असल्याचे हेरून, ब्रूस व त्यांच्या सहकाऱ्यांनी योजना तयार केली.

ब्रूस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी राष्ट्रसंघाच्या आर्थिक व सामाजिक शाखांनी केलेल्या कार्याची व भविष्यात त्यांच्याकडून होणाऱ्या कार्याच्या अपेक्षेची दखल घेतली. त्यांच्या अपेक्षांचा मूळ आधार शांततापूर्ण सहजीवन व जागतिक शांततेसाठी मानवतेच्या आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणारा राष्ट्रसंघ हा होता.

१९३९ ऑगस्टमध्ये पॅरिस येथे ब्रूस कमिटीची बैठक झाली. या बैठकीचा जो वृत्तान्त बाहेर आला, त्यात असे निवेदन करण्यात आले

होते की, विविध राष्ट्रांच्या शासन व राज्यकारभार यांच्याशी सुसंबद्ध साखळी निर्माण करू शकेल, अशा प्रकारची एक संस्था माध्यम म्हणून अस्तित्वात यावी. आर्थिक व सामाजिक स्वरूपाच्या जागतिक कल्याणाकरिता एक स्वतंत्र आर्थिक व सामाजिक मंडळ राष्ट्रसंघाच्या नेतृत्वाखाली स्थापण्यात यावे. मध्यवर्ती मंडळ सुमारे २४ राज्यांच्या प्रतिनिधींचे बनविण्यात यावे. आर्थिक व सामाजिक प्रश्नांसाठी केंद्रीय मंडळाचे ( A Central Committee for Economic and Social Questions ) सभासदत्व राष्ट्रसंघसभेतर्फे ठरविण्यात यावे. ·मंडळाच्या कार्यकक्षेत तांत्रिक मंडळाची नेमणूक करणे, त्यांच्या कार्यक्रमावर देखरेख करणे, त्यांचे अंदाजपत्रक तयार करणे, त्यांच्या योजनांना मान्यता देणे किंवा रद्द करणे वगैरे विषय होते. सभासद नसणाऱ्या राष्ट्रांना देखील यात प्रवेश दिला जाई, किंवा कांही तज्ज्ञ सभासदांना राज्य सरकारांच्या प्रतिनिधींच्या बरोबरीने बसून कार्य करण्यासाठी सामील करून घेतले जाई. या मंडळाने एक वार्षिक अहवाल राष्ट्रसंघ सभेला सादर करावा म्हणजे कार्यवाही आणि अंमलबजावणीची प्रगती स्पष्ट कळू शकेल. या शिफारशीनुसार आर्थिक व सामाजिक दृष्ट्या जागतिक कल्याणाचे कार्य करणारी संस्था स्थापली गेली.

जर्मनीने पोलंडवर स्वारी करण्यापूर्वी काही दिवस आधी म्हणजे २२ ऑगस्ट १९३९ मध्ये ब्रुस अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. वरील घटनेची परिणती महायुद्धात झाली. त्यामुळे अहवालाची अंमलबजावणी होऊच शकली नाही. परंतु ( U. N. ) संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक व सामाजिक मंडळांची उद्दिष्टे, कार्यपद्धती व हेतू यांची रचना ब्रुसच्या योजनेवर आधारलेली आहे. युद्धाच्या अखेरच्या महिन्यात पुन्हा राष्ट्रांनी एकत्र येऊन संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या स्थापनेविषयी चर्चा केली तेव्हा ब्रुसच्या

अहवाल स्वीकृत करण्यात आला. त्यामुळे आता आर्थिक व सामाजिक मंडळ हे संयुक्त राष्ट्रसंघटनेचे एक प्रमुख अंग म्हणून गणले जाते.

## ३ सामाजिक व मानवतावादी कार्य

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात देखील राष्ट्रसंघाने भरीव कामगिरी केली. वैचारिक आणि शास्त्रीय क्षेत्रामध्ये नवीन विचारप्रवाह आणि वैचारिक देवाणघेवाण यांबाबत राष्ट्रसंघाचे कार्य फारच भरीव आहे.

(१)– राष्ट्रसंघाने अज्ञान, अस्वास्थ्य, विषमता यांविरुद्ध युद्ध पुकारले. त्या काळी जगात ज्या ज्या भागात गुलामगिरीची कोणत्याही स्वरूपाची प्रथा प्रचलित होती ती प्रथा समूळ नष्ट करण्यासाठी संघाने भरीव कामगिरी केली.

(२)– ( Traffic in Women and Children ) **अनैतिक व्यवहारावरील निर्बंध** :– शासकीय व सामाजिक बंधने शिथिल झाल्यामुळे समाजाची नैतिक पातळी खालावली होती. आंतरराष्ट्रीय टोळया मुलांमुलींना पळवून नेण्याचे प्रकार पद्धतशीर करीत होत्या. तरुण मुलींना पळवून कुमार्गास लावण्यासाठी मुलामुलींची विक्री करणाऱ्या अशा टोळयांचे संघटित जाळे पसरले होते. या प्रश्नांकडे सर्व विचारवंतांचे लक्ष वेधले गेले. इ. स. १९०२ व १९०४ मध्ये पॅरिस येथील परिषदेत असल्या प्रकारांना पायबंद बसावा म्हणून आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे निर्बंध घालण्यात आले. असल्या प्रकारचा व्यापार करणाऱ्या संस्थांची माहिती मिळविणे, त्यावर निर्बंध घालणे व अपहृतांचे पुनर्वसन करणे अशा प्रकारचे प्रयत्न करण्यात आले.

राष्ट्रसंघाच्या सभेने एक चौकशी समिती नेमली. त्या समितीत स्त्रियाही सभासद होत्या. ह्या समितीला अरमेनिया येथे चौकशीसाठी पाठविण्यात आले होते.

त्यानंतर जुलै १९२१ मध्ये जिनेव्हा परिषदेत राष्ट्रसंघाने या कार्या-करिता भरीव प्रयत्न केले. संघाने एका समितीची स्थापना करून या अनैतिक प्रकारांना पायबंध घालण्याकरिता करावयाचा उपाययोजनेवर विचार केला. या समितीच्या शिफारशीनुसार राष्ट्रसंघाने सर्व राष्ट्रांतील अशा गुन्हेगारांसाठी स्वतंत्र न्यायालये स्थापन करणे, अपंग व अंध मुलांच्या आश्रयाची व्यवस्था करणे, अश्लील वाङ्मय, चित्रे व चित्रपटां-वर बंदी घालणे, इत्यादींबाबत सल्ला दिला. या कार्याच्या पूर्ततेसाठी दोन वेगवेगळ्या समित्या स्थापन करण्यात आल्या. याशिवाय ऑक्टो-बर १९२३ मध्ये स्त्रियांच्या अपहरणाबद्दल आंतरराष्ट्रीय कायदे कर-ण्यात आले. स्त्रियांना पोलिस खात्यात भरती करून वेश्यागृहावर छापे घालण्याची व्यवस्था करण्यात आली. अतिपूर्वेकडे जावामधील बांडुंग या शहरी इ. स. १९३७ च्या फेब्रुवारी महिन्यात स्त्रियांच्या अपहर-णाला पायबंद घालण्यासाठी एक परिषद भरविण्यात आली होती.

( ३ )- **मादक पदार्थांच्या व्यापारावर निर्बंध** ( Traffic in opium and other Dangerous Drugs ) :— पहिल्या महायुद्धा-मध्ये विनाशकारी शस्त्रास्त्रांनी मानवी जीवनाची भयंकर वाताहत केली. ते भयंकर दृश्य पाहून कित्येक वेडे झाले. तर कित्येकांना त्या दृश्याचे स्मरण तापदायक ठरू लागले म्हणून विस्मरणाकरिता मादक पदार्थां-च्या सेवनाची प्रथा सुरू झाली. हे जरी खरे असले तरी पहिल्या युद्धानंतर मादक पदार्थांच्या उपयोगात भयंकर वाढ झाली व मादक पदार्थांच्या सेवनामुळे सामाजिक जीवन उद्ध्वस्त होऊ लागले. काही राष्ट्रांनी मादक पदार्थांच्या उत्पादनावर निर्बंध जाहीर केले.

अमेरिका, इटली, चीन, भारत, डच, ईस्टइंडीज, मलायन राज्ये आणि इतर ब्रिटिश, फ्रेंच वसाहती यांमध्ये मादक पदार्थांचे उत्पन्न व व्यापारामुळे मोठ्या प्रमाणात सारा मिळविला जात असे. जर्मनी व

युगोस्लाव्हिया मध्ये पॉपीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात केले जात असे. मोठ्या प्रमाणात नफा मिळत असल्यामुळे मादक पदार्थांचे उत्पादन पराकोटीला गेले होते आणि पोलिसांकडून यावर देखरेख करण्याचे धोरण साफ निष्क्रिय ठरले होते. या उत्पादनावर निर्बंध घालण्यासाठी झालेल्या दिरंगाईसंबंधी कितीही सबबी सांगण्यात आल्या असल्या तरी जपान आणि युरोपमधील देशांमध्ये या पदार्थांचा व्यापार मोठ्या प्रमाणात वाढविण्यातच आला होता. यावर निर्बंध घालण्यासाठी एक अमेरिकन प्रतिनिधिमंडळ नेमण्यात आले; ज्यात इटलीच्या सभासदांचा समावेश करण्यात आला होता. त्याने सुधारणावादी दृष्टिकोन प्रकर्षाने मांडला.

अफू आणि इतर अपायकारक मादक पदार्थ यांचाही प्रश्न पहिल्याच अधिवेशनात हाताळण्यात आला. हा प्रश्न नेदरलँड सरकारकडून काढून घेऊन, त्याबाबत इत्थंभूत माहिती गोळा करण्याचे कार्य राष्ट्रसंघाच्या सचिवालयाकडे सुपूर्द करण्यात आले आणि त्यांना मदतनीस म्हणून एक सल्लागार समिती नेमली.

अफू, गांजा, कोकेन वगैरेबाबत होणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर आळा घालण्यासाठी राष्ट्रसंघाने एक समिती स्थापन केली. याशिवाय राष्ट्रसंघाने एक स्थायी स्वरूपाचे मध्यवर्ती अफू-मंडळ कायम केले. अशा प्रकारे मादक पदार्थ वाहतूकनिर्बंधाबाबत राष्ट्रसंघाने मध्यवर्ती स्थायी समिती व देखरेख मंडळे नेमून त्यांमार्फत कार्य केले. यामुळे मादक पदार्थांचे उत्पादन, खरेदीविक्री, साठा आणि व्यापार या गोष्टींना मोठ्या प्रमाणात आळा बसला.

भारतामध्ये अफूच्या निर्मितीवर बंधने घालण्यात आली. मादक द्रव्यांच्या वापरासंबंधी भारताने जो पुढाकार घेतला होता तो स्मरणात ठेवण्यासारखा आहे. १९२५ व १९३१ या वर्षी अनुक्रमे जिनेव्हा येथे

या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद भरविण्यात आली व जे काही करार मान्य करण्यात आले त्यांत भारतीय यशाचा वाटा मोठा होता. त्यामुळे अफूचे उत्पादन कमी झाले. याच पद्धतीचे कायदे सर्व राष्ट्रांनी मान्य केले. जिनेव्हा परिषदेमध्ये राष्ट्रसंघाने वरीलप्रमाणे ठराव संमत केला व मद्यपान करणाऱ्यांची आकडेवारी जमा केली. सुदैवाने सर्व राष्ट्रांनीही राष्ट्रसंघाच्या या कार्याला साह्य केले.

(४)– ( Health Organization ) आरोग्याच्या दृष्टीने देखील राष्ट्रसंघाने बरेच कार्य केले. संसर्गजन्य आणि साथीच्या रोगांमुळे दरवर्षी लक्षावधी माणसे मृत्युमुखी पडत असत. अप्रगत व अविकसित राष्ट्रांना निकृष्ट आर्थिक परिस्थितीमुळे या रोगांवर प्रभावी उपाययोजना करणे शक्य नव्हते. पहिल्या महायुद्धानंतर या रोगांनी उग्रस्वरूप धारण केले होते. मानवजातीची ही अपरिमित हानी थांबविण्यासाठी राष्ट्रसंघाने दि. २२ जून १९२१ रोजी आरोग्यसंस्थेची स्थापना केली. या संस्थेची मुख्य कचेरी जिनेव्हा येथे ठेवली. त्यामध्ये विविध राष्ट्रांचे प्रतिनिधी सामील करण्यात आले. तसेच या संस्थेच्या वेळोवेळी घेण्यात आलेल्या सभांमध्ये विविध राष्ट्रांचे आरोग्यमंत्रीदेखील प्रतिनिधी म्हणून भाग घेत. भारताचे प्रतिनिधी म्हणून डॉ. सोंझा जिनेव्हा व जपान येथे भरलेल्या आरोग्य–परिषदेला गेले होते.

या समितीने संसर्गजन्य व साथीच्या रोगांविषयी सविस्तर माहिती गोळा केली व निरनिराळ्या प्रदेशांतील रोगग्रस्त विभागास भेटी दिल्या.

इ. स. १९२० आणि १९३७ मध्ये या संस्थेने पोलंडला आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. भारतात मलेरियाचे निर्मूलन करण्याकरिता साह्य केले. वैद्यकीय पद्धतीमध्ये संशोधन करण्यासाठी संशोधन-केंद्रे कायम केली. विषुववृत्तीय प्रदेशातील रोगासंबंधाने संशोधन करण्यात आले.

राष्ट्रसंघाने साथींच्या रोगांचा खास अभ्यास करण्यासाठी एक स्वतंत्र कार्यालय सिंगापूर येथे स्थापन केले. त्यात भारतीय प्रतिनिधींचीही निवड करण्यात आली होती. या प्रतिनिधींनी असा आग्रह धरला होता की, पाश्चिमात्य राष्ट्रांनी आपल्या धनाबरोबर ज्ञानाचाही उपयोग पूर्वेकडील देशांना करून द्यावा. राष्ट्रसंघाने मलेरियावर संशोधनात्मक उपाय शोधले व या उपायांचा आपल्या देशालाही मोठ्या प्रमाणात उपयोग झाला.

सिंगापूर येथे रोगप्रतिबंधक योजना प्रभावीरीत्या अमलात आणण्याकरिता एक नभोवाणी केंद्र स्थापन केले. या केंद्रातर्फे विविध कार्यक्रम आयोजित केले जात असत आणि निरनिराळ्या रोगांची व त्यांवरील उपायांची माहिती पुरविली जात असे. १८६ पेक्षा अधिक बंदरांतून प्रचारकेन्द्रे उभारण्यात आली. १९२५ पासून या समितीने आपले कार्यक्षेत्र अधिक विस्तृत केले. सार्वजनिक आरोग्याकडेदेखील अधिक लक्ष पुरविले. विनयन-केंद्रे स्थापन केली व परिसंवाद आयोजित केले. रशिया, पोलंड, चीन वगैरे राष्ट्रांना या संस्थेची सक्रिय मदत मिळाली. या राष्ट्रांना साथींच्या रोगांपासून बचाव करण्याकरिता तज्ज्ञांचा सल्ला, औषध व वैद्यकीय मदत देण्यात आली होती. चीनमध्ये महापुरामुळे अनेक रोग निर्माण झाले. त्या रोगांना दूर करण्याकरिता या समितीने सक्रिय मदत केली. ब्राझिलची राजधानी रियादो जानेरा येथे कुष्ठरोग उपचार-केन्द्रे स्थापन केली. ग्रीस, आफ्रिका, रुमानिया या देशांना या केन्द्रांतून भरीव सहकार्य देण्यात आले.

या संस्थेतर्फे ७०० पेक्षा अधिक वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ३५ राष्ट्रांना भेटी देऊन तेथील आरोग्यविषयक व्यवस्थेची पाहणी केली व त्यांना योग्य ती मदत पुरविली.

( ५ )— (The League's Nutrition Committee) :— सर्व लोकांना सकस अन्न उपलब्ध व्हावे म्हणून राष्ट्रसंघाने खालील उपक्रम हाती घेतले.

१.— राष्ट्रीय सकस अन्नविषयक धोरणाची तपासणी केली.

२.— ग्रामीण भागात अन्नवाटपाची व्यवस्था केली.

३.— युद्धकाळात धान्यावर नियंत्रणे ठेवली.

४.— दुष्काळपीडित भागातील जनतेला व गरोदर स्त्रियांना आवश्यक ती मदत पोहोचविली.

५.— शेतीउत्पादनास साहाय्य केले.

६.— अन्नधान्य व कच्चा माल यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रण ठेवले.

( ६ ) राष्ट्रसंघाने कामगारांच्या व मुलांच्या कल्याणाचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. मजुरीचे दर, कामाचे तास, तांत्रिक शिक्षणाच्या सोयी, अल्पवयीन मुले आणि स्त्रियांचे संरक्षण व या कामगारवर्गाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांबाबत सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत समान स्वरूपाचे कायदे निर्माण व्हावेत यासाठी आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने प्रयत्न केले व बऱ्याच प्रमाणात ते यशस्वी झाले.

( ७ ) ( The Communication and Transit Organization ) १९२० मध्ये बारसेलोना परिषदेत राष्ट्रसंघाने दळणवळण व वाहतूक या संबंधीचे कार्य करण्यास प्रारंभ केला. यासाठी एक आंतरराष्ट्रीय कायदा तयार केला. एका संस्थेमार्फत या कार्यावर देखरेख ठेवली गेली. या संघात सभासद नसलेल्या राष्ट्रांना देखील समान तत्त्वावर प्रवेश दिला जाई. आंतरराष्ट्रीय दळणवळण व वाहतूक संघाने सागरी वाहतुकीतील अपघात टाळण्यासाठी व मार्गदर्शक सूचना देण्यासाठी बंदरावर सूचक प्रकाशझोत व दीपस्तंभ उभे करून प्रकाश-व्यवस्थेसंबंधी कार्यवाही केली. त्याप्रमाणेच जर्मनी आणि इतर युरोपीय राष्ट्रांमध्ये मोटारींच्या

वाहतूक नियमांमध्ये एकसूत्रीकरण करण्यात आले. राष्ट्रसंघाने सभासद-राष्ट्रांच्या सरकारांना सागरी वाहतुकीबाबत मार्गदर्शन केले व तज्ज्ञ सल्लागारांचे कार्यही केले. याशिवाय अंतर्गत वाहतूकविषयक वादग्रस्त प्रश्नावर तडजोडही सुचविली. विशेषतः राष्ट्रसंघाने या बाबतीत राष्ट्रीय चीन सरकारास मोलाचे तांत्रिक मार्गदर्शन केले.

( ८ ) लहान मुलांच्या कल्याणाकरितादेखील राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे काही नियम तयार केले.

( ९ ) आंतरराष्ट्रीय चित्रीकरण ( Cinematography ) संस्था स्थापन करून त्या संस्थांना राष्ट्रसंघास जोडले.

( १० ) स्त्री-हक्कविषयक कार्य :– या क्षेत्रात राष्ट्रसंघाने खालील कार्य केले :–

१– वैवाहिक जीवनातील संकेत व व्यावहारिक दृष्ट्या आवश्यक असलेले नियम.

२– घटस्फोटित पतिपत्नींचे संबंधी नियम.

३– विधवांच्या अधिकाराबाबत नियम.

४– पालक व पाल्य संबंध.

५– दत्तक वारसाचे अधिकार.

६– वारसाहक्काचे अधिकार.

यांसंबंधी निश्चित नियम तयार केले.

# राष्ट्रसंघ अयशस्वी का ?                                    ८

जागतिक शांतता व सुरक्षितता प्रस्थापनेच्या हेतूने राष्ट्रसंघाची स्थापना झाली हे खरे. परंतु राष्ट्रसंघ आपल्या कार्यवाहीत असफल राहिल्यामुळेच त्याचा अस्त झाला व पुढील काळात त्याची पर्यायी 'संयुक्त राष्ट्रसंघ' ही संस्था स्थापन झाली. परंतु प्रथम ही गोष्ट विचारात घ्यावयास पाहिजे की पर्यायी संस्था स्थापन करण्याऐवजी राष्ट्रसंघाचेच पुनरुज्जीवन का केले गेले नाही? तेव्हा हे लक्षात येते की, राष्ट्रसंघाच्या सनदेतील व कार्यवाहीतील दोषांचे प्रमाण इतके ठळकपणे दिसत होते की त्या सर्वांचे परिमार्जन करण्याऐवजी नवीनच पर्यायी संस्था काढणे उचित वाटले.

एच जी. निकोलस यांनी ' दि युनायटेड नेशन्स ' या ग्रंथात असे म्हटले आहे की, " संयुक्त राष्ट्रसंघ " स्थापनेच्या वेळी राष्ट्रसंघाचेच पुनरुज्जीवन का करू नये असा मुद्दा उपस्थित झाला होता. पण त्या बाबतीतच एवढी चर्चा झाली, गुणदोषांचे इतके विवेचन झाले की हे बदल व सूचना त्यात सम्मिलित करण्याऐवजी पर्यायी संस्था स्थापन करणे अधिक योग्य वाटले. राष्ट्रसंघ हे नाव देखील कायम न ठेवता व त्याचा संदर्भही न देता संयुक्त राष्ट्रसंघ असे नाव देण्याचे सर्वानुमते ठरले. त्याशिवाय सभा, समित्या, न्यायालये इत्यादींच्यासाठी काम करण्याची पद्धती, नावे व कार्यवाही देखील बदलण्यात आली. एवढा बदल करणे किंवा दुसरी संस्था स्थापन करणे आवश्यक वाटले याचाच

अर्थ राष्ट्रसंघाच्या सनदेत व कार्यवाहीत दोष होते हे नक्की. ते दोष कोणते व अपयश का आले त्यावर आपण आपल्या सोईच्या दृष्टीने चार विभाग पाडून विचार करू :—

१.– सनदेतील दोष.

२.– आर्थिक दोष.

३.– राजकीय दोष.

४.– तात्कालिक कारणे.

## १. सनदेतील दोष

( १ )– उदयातच ऱ्हासाची बीजे :– व्हर्सायच्या तहातून राष्ट्र-संघाचा उदय झाला आणि त्या तहातच राष्ट्रसंघाच्या ऱ्हासाची कारणे होती. उदयातच अस्ताची बीजे पेरली गेली. या दृष्टीने पाहता राष्ट्र-संघाच्या अपयशाचे पहिले नि महत्त्वाचे कारण 'व्हर्सायचा तह व त्याचे परिणाम' हे होय.

राष्ट्रसंघाने पराजित राष्ट्रांना विजेत्या राष्ट्रांच्या समान दर्जाचे मानले नाही. व्हर्सायचा तह हा अनेक राष्ट्रांच्या दृष्टिकोनातून अपमानकारक, सूड उगविणारा होता. राष्ट्रसंघाची सनद ही व्हर्सायच्या तहाचा एक भाग असल्यामुळे, या तहाच्या प्रतिकूल मते असणारी इतर अनेक राष्ट्रे पर्यायाने राष्ट्रसंघाच्याही विरुद्ध झाली होती. व्हर्सायच्या तहा-प्रमाणे, राष्ट्रांच्या ज्या सीमा निश्चित करण्यात आल्या त्या नेहमीकरिता कायम राहातील. इतःपर एकमेकांच्या राज्यांच्या प्रदेशांत बदल हा संबंधित राज्यांच्या संमतीने केला जाईल; असे गृहीत धरून राष्ट्रसंघाची

स्थापना करण्यात आली होती. युरोपात अनेक राष्ट्रराज्ये निर्माण करण्यात आली. तरी देखील सर्व अल्पसंख्याकांचा प्रश्न सुटू शकला नाही. हे अल्पसंख्याक स्वतंत्र होण्याचा किंवा शेजारच्या राज्यात विलीन होण्याचा प्रयत्न करू लागले. ज्याला राष्ट्रसंघ तोंड देण्यास अपात्र होता.

पॅरिसला झालेली शांतता परिषद ही खऱ्या अर्थाने शांतता परिषद नव्हती तर ती विजेत्या राष्ट्रांची परिषद होती. केवळ पहिल्या महायुद्धाच्या स्थगितीपूर्वी त्यांनी आपसांत केलेल्या करारांची पूर्तता करण्यासाठीच ही परिषद झाली होती.

व्हर्सायचा तह कसा झाला हे थोडक्यात आपण पाहू. ११ नोव्हेंबर १९१८ रोजी जर्मनीने आपला पराजय मान्य केला. या युद्धानंतर पॅरिस येथे मित्रराष्ट्रांची सभा झाली.

जर्मनीला दोषी ठरविणे, जर्मनीची सर्व बाजूंनी ससेहोलपट करणे, त्यावर पूर्णपणे सूड उगविणे हीच भावना त्या वेळी सर्व युद्धमान राष्ट्रांची होती * त्या दृष्टीनेच १८ जानेवारी १९१९ रोजी पॅरिस येथे ही परिषद भरविण्यात आली. सर्वच युद्धमान राष्ट्रांचे सदस्य परिषदेला हजर होते. तहाचा मसुदा तयार झाला. २८ जून १९१९ रोजी तहाच्या करारावर सह्या झाल्या.

---

* The British election was won on the cry of 'making Germany pay to the last farthing," A. J. Grant and Harold Temperley, Europe in the Nineteenth and Twentieth Centuries (1789–1950), 6te edi. 1962, P. 434.

व्हर्सायच्या तहाच्या करारार्ची १५ कलमे आहेत. पहिल्याच कलमात राष्ट्रसंघाची स्थापना सुचविण्यात आली आहे. बाकीची १४ कलमे जर्मनीचा सूड उगविण्याच्या दृष्टीनेच केली असावीत असे उघड दिसते. या अपमानकारक अटींवर सही करण्याची पाळी जर्मनीवर आली. या कलमांद्वारे जर्मनीवर जी बंधने घालण्यात आली ती अशी :–

जर्मनीने आल्सेन व लॉरेन हे प्रांत फ्रान्सला द्यावेत. सरहद्दीवरील काही भाग बेल्जियमला द्यावा. शेल्वीज डेनमार्कला मिळावे. सायलेशिया पोलंडला द्यावा. ममेल प्रांत लिथुआनियाला मिळावा आणि ऱ्हाईन नदीच्या दोन्ही तीरांवर आपले सैन्य ठेवू नये. सार प्रांत आंतरराष्ट्रीय देखरेखीखाली राहावा. कलम चार द्वारे असे बंधन घातले की, जर्मनीने आपल्या सर्व वसाहती मित्र संघाला द्याव्यात. कलम पाच व सहा द्वारे जर्मनीवर शस्त्रास्त्रनिर्मिती व साठ्याबाबत कडक निर्बंध घालण्यात आले व सध्याच्या सैन्यात कपात करण्याची सक्ती करण्यात आली. कलम सात द्वारे शत्रूतील बड्या अधिकाऱ्यांना जबर शिक्षा ठोठावण्यात आल्या. आठ व नऊ द्वारे जर्मनी आणि दोषी ठरविलेल्या इतर राष्ट्रांकडून जी खंडणी घेण्याचा ठराव झाला त्या खंडणीचा विनियोग युद्धखर्चाची व हानीची भरपाई म्हणून २०० कोटी डॉलर्स दोस्त राष्ट्रांना द्यावे, असा ठराव केला. इतर कलमांद्वारे आर्थिक, व्यापारी, नाविक नियोजन, आंतरराष्ट्रीय मजूरसंघटना स्थापणे, ऱ्हाईनच्या भागात मित्रसंघाने सैन्य ठेवणे, तसेच युद्धकैदी, युद्धात कामी आलेल्यांची थडगी, विमानवाहतूक, वगैरे बाबतीत नियम घालून देण्यात आले.

जर्मनीबरोबरच इटली, बल्गेरिया, ऑस्ट्रिया, हंगेरी या राष्ट्रांचेही व्हर्सायच्या तहामुळे लचके तोडले गेले.* दोस्त राष्ट्रांनी जर्मनी व इतर दोषी राष्ट्रांची १९३२ पर्यंत पिळवणूक केली. त्यामुळे जर्मनीत असंतोष व सूडाची आग धुमसत राहिली. व्हर्सायच्या तहाने कोणाचेच समाधान झाले नाही. युरोपचेही प्रश्न सुटले नाहीत आणि जगाचे तर नाहीतच. व्हर्सायच्या तहाने अनेक राष्ट्रे दुःखी झाली; आणि म्हणूनच राष्ट्रसंघाच्या स्थापनेला अनेक राष्ट्रे अनुकूल नव्हती हे निश्चित.

---

* ऑस्ट्रियाला कायमचा कमकुवत व लहानात लहान ६० लाख लोकवस्तीचा छोटा देश करण्यात आला. जर्मनीत विलीन होण्याची त्याची इच्छा असल्यास त्याला राष्ट्रसंघाची अनुमती घ्यावी लागणार होती आणि ती अनुमती राष्ट्रसंघाने एकमताने द्यायची होती. ट्यूटन आणि मॅगर्स वंशांच्या ( जर्मनी, ऑस्ट्रिया- हंगेरी ) राज्यांचे लचके तोडण्यात येऊन नवीन राष्ट्रे निर्माण केली गेली. उदाहरणार्थ, रशियाच्या बाल्टिक प्रदेशीय साम्राज्यामधून एस्थोनिया, लॅटव्हिया, लिथुआनिया बनविले गेले. फिनलँडने स्वातंत्र्य स्वीकारले. तसेच रशियाने जर्मनीचे भाग मिळून पोलंड बनविला गेला व ऑस्ट्रियन साम्राज्याचे विघटन करून झेकोस्लाव्होकिया, हंगेरी, युगोस्लाव्हिया ही राज्ये बनविली गेली. रुमानिया, ग्रीस, इटाली यांना ऑस्ट्रियातून काही प्रदेश मिळाला. तुर्कस्तानच्या साम्राज्याचे लचके तोडण्यात आले व युरोपातील बाल्कन राष्ट्रांना स्वातंत्र्य देण्यात आले. आशियातील साम्राज्य संपविण्यात आले आणि यातून कृत्रीमरीत्या बनविलेल्या अरब राष्ट्रांचा उदय झाला.

ऑस्ट्रियाने ३०,००० पेक्षा व बल्गेरियाने २०,००० पेक्षा अधिक फौज ठेवू नये, असे बंधन घालण्यात आले. उपरोक्त विचार ठरविताना हेतू असा होता की, सबंध युरोपातील देशांत फौज आणि शस्त्रास्त्रे कमी ठेवता यावीत. परंतु कोणत्याही राष्ट्राने या प्रकारे आपल्या सैन्यात कपात केली नाही. या पराजित राष्ट्रांचे सैन्यबळ कमी करण्यात आले. परंतु जेते राष्ट्रांच्या सैन्यात कोणत्याही प्रकारची कपात केली गेली नाही. अर्थात ही टीका ब्रिटनला लागू पडू शकत नाही. कारण ब्रिटनने आपल्या सैनिकी शक्तीत कपात केली होती, इतकी की परिणामी १९३९-४५ च्या युद्धात सुरुवातीस ब्रिटनला भयंकर संकटास तोंड द्यावे लागले. George W. Southgate, A Text Book of Modern European History ( 1787-1945 ), Chapter 27.

अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी कायमची शांतता राखण्यासाठी १४ मुद्दे सुचविले होते. परंतु विजेत्या राष्ट्रांचे विल्सनच्या या १४ मुद्दयांवर पूर्ण समाधान नव्हते. प्रे. विल्सन यांचे पवित्र ध्येयवादी धोरण निखळून पडले व युद्धापाठोपाठ जगामध्ये एकीकडे साम्यवादाची झोटिंगशाही व दुसरीकडे फॅसिझम, नाझिमच्या स्वरूपात आक्रमक राष्ट्रवादाचा भस्मासूर निर्माण झाला. याचा परिणाम असा झाला की, युरोपातील लोकशाहीपुढे एक विचित्र संकट उभे राहिले.

विल्सनच्या १४ तत्त्वांना धरून व्हर्सायिचा तह झाला असता व त्यातील जर्मनीविरुद्ध दिसणारी सूडाची भावना मागे घेण्यात आली असती तर या १४ तत्त्वांचा मान राहिला असता. परंतु इंग्लंडचे पंतप्रधान लॉईड जॉर्ज व फ्रान्सचे क्लेमोन्सो या मुत्सद्दी व राजकारणी लोकांनी स्वार्थासाठी व आपले हितसंबंध लक्षात घेऊन राष्ट्रसंघाच्या उदात्त तत्त्वांचा विपर्यास केला. जर्मनीवर अपमानकारक अटी लादल्या. व्हर्सायिचा तह संगिनींच्या बळावर जर्मनी वगैरे पराजित राष्ट्रांवर लादण्यात आला होता. परिणामतः त्या राष्ट्रांच्या कोट्यवधी सैनिकांचा स्वाभिमान डिवचला गेला. या ठिकाणीच राष्ट्रसंघाच्या विनाशाचे बी रुजविले गेले. पुढे लवकरच दुसरे महायुद्ध पेटले व त्यातच राष्ट्रसंघाचा बळी पडला.

( २ )– राष्ट्रसंघामध्ये जनतेला वाव नव्हता. ती संघटना सरकारी ( राज्य ) सत्तेची होती. * लोकांची नव्हे. राज्याचे प्रतिनिधी जे सभा व समिती यांमध्ये प्रतिनिधी म्हणून कार्य करीत असत त्यांचे कार्य

---

* Preamble of the Covenant begins with, " The High contracting Parties . . . . . . ' and not as the Preamble of the U. N. Charter w. ich begins with, ' We the People of United Nations . . . . . "

केवळ एका संघाच्या नोकरासारखे दिसत असे. कित्येकदा संघाचे नोकरच आपआपल्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींचे बरेचसे कार्य करून जात.+ हा संघ लोकप्रिय होऊ शकला नाही व त्यात कसलाच जोम निर्माण झाला नाही।

शांतता निर्माण करण्यासाठी राष्ट्रसंघाने जगाच्या तांत्रिक विद्येच्या सुधारणेत भाग घेतला. परंतु विश्वबंधुत्वाच्या भावनेचा लोकांत अभाव असल्यामुळे राष्ट्रसंघ अपयशी ठरला. राष्ट्रसंघाचे कार्य घटनेच्या चाकोरीतून होत असे. राष्ट्रसंघाचे उद्देश उत्कृष्ट असे होते. तसेच त्याचे कार्यही अधिक प्रभावीरीत्या झाले असते तर सभासद-राष्ट्रांमध्ये सामाजिक एकोप्याची भावना दृढ झाली असती. राष्ट्रसंघाचे कार्य जनमताच्या पुढचे पाऊल ठरले असते. राष्ट्रसंघाची निर्मिती ज्या आदर्श सिद्धांतावर झाली होती त्यासाठी जगाची अद्यापि मानसिक सिद्धता झाली नव्हती. कायद्याची निर्मिती लोकमतांतून होत असली तरी त्याचे यश सर्वस्वी लोकांच्या मान्यतेवर अवलंबून असते. राष्ट्रसंघ मात्र ठराव निर्माण करीत असे. परंतु लोकमत त्यास धुडकावून लावीत असे. कारण पहिल्या महायुद्धानंतर देशामध्ये राष्ट्रीय भावना अधिक वाढली. परिणामतः एकानंतर दुसरे देश राष्ट्रसंघाच्या तत्त्वांचे उल्लंघन करू लागले.

---

+ If the new service was to be truly international it was necessary that its members should receive their appointments not from their own governments but from the international authority. Drummond had been warned that each of the great powers would expect to see one of its nationals appointed in the rank immediately below himself, " F. P. Walters, A History of the League of Nations, 1960 edition (in one volume), P. 76.

( ३ )- सभा व समिती यांचे निर्णय एकमताने घ्यावेत अशी अट जाचक होती. राष्ट्रसंघाचे अपयश त्याच्या ( Rule of unanimity in Proaedings ) या एकमत कार्यवाहीतील दोषात, मतदान-पद्धतीत व ठरावाच्या अंमलबजावणीत ( lack of effective sanction ) त्या बरोबरच सभासद राष्ट्राला ( withdrawal ) पदत्यागाचा हक्क, वगैरे या सर्व गोष्टींत साठवलेले आहे. सभासद-राष्ट्रांचे सर्वाधिकार राष्ट्रसंघास नष्ट करण्यास कारणीभूत ठरले.

( ४ )- एक राष्ट्र-एक मत. त्यामुळे ( लहान भूप्रदेशाचा देश ) लायबेरिया आणि अफाट भूप्रदेशाचा देश(सोव्हिएत रशिया) यांना एकाच पातळीवर समान लेखण्यात आले. किंवा कोस्टरिका व इंग्लंड यांना बरोबरीने महत्त्व देण्यात आले. अन्थानी ईडन यांच्या म्हणण्यानुसार हे एक कारण राष्ट्रसंघाच्या अपयशास कारणीभूत ठरले.

( ५ )- राष्ट्रसंघाच्या ( Covenant ) सनदेप्रमाणे युद्ध, हा प्रश्न सोडविण्याचा बेकायदेशीर मार्ग नव्हता. तंटा मिटविण्याचा लढाई हा एक मार्ग होता. शिवाय राष्ट्रसंघाच्या सनदेमध्ये घोषित ( जाहीर )युद्ध व आक्रमक युद्ध यांतील फरक अस्पष्ट होता.

राष्ट्राराष्ट्रांतील अंतर्गत संघर्ष पॅसिफिक सेटलमेंटमार्फत सोडविण्यात यावेत अशी मूळ धारणा होती. परंतु जर एखाद्या राष्ट्राने हे अमान्य करून लष्करी सामर्थ्याचा वापर या संघर्षापायी केला तर अशा वर्तनास आक्रमण म्हणूनच संबोधिले जाईल आणि राष्ट्रसंघाच्या अन्य सदस्य राष्ट्रांनी याविरुद्ध सामुदायिक रीतीने लष्करी व आर्थिक हल्ला करावा अशी त्यावर तोड सुचविण्यात आली. परंतु आक्रमणाच्या या व्याख्येमुळे बऱ्याच अडचणी निर्माण झाल्या आणि प्रत्येक सदस्य राष्ट्रास ( Veto ) नकाराधिकाराचा हक्क दिला गेल्याने मूळ धारणेला काहीच अर्थ राहिला नाही. अशा प्रकारे ही एक निष्फळ योजना ठरली.

( ६ )– मुख्य सचिवाचे अधिकारक्षेत्र फारच मार्यादित होते.

( ७ )– जागतिक अशांतीचे मूळ कारण आर्थिक व सामाजिक विषमतेत आहे. परंतु राष्ट्रसंघामध्ये स्वतंत्र अशी आर्थिक, सामाजिक मंडळे नव्हती. तांत्रिक साह्य व आर्थिक मदत वगैरे सर्व प्रश्न समितीच्या अधिकारातच होते. समितीमध्ये कायम सदस्य राष्ट्रांचे राजकारण चालू झाल्याने या मूलभूत प्रश्नांकडे योग्य तितके लक्ष देण्यास राष्ट्रसंघ समितीला सवड होत नसे.

( ८ )– राष्ट्रसंघामध्ये ( Specialized Agencies ) उपांगे नव्हती. युद्धाचे कारण दूर करण्याकरिता, राष्ट्रसंघाचा पाया पक्का करण्याकरिता व सर्वांगीण उन्नतीकरिता एजन्सीज असणे फार आवश्यक होते. जागतिक शांततेच्या दृष्टीने मजूर संघटना, सहकारी संस्था, महिला संघटना यांची गरज होती. परंतु अशा संस्था फारच उशिरा अस्तित्वात आल्या. यांच्यातिरिक्त विविध क्षेत्रांतील आंतरराष्ट्रीय संघटना राष्ट्रसंघाच्या अस्तित्वापासून काम करीत होत्या. उदाहरणार्थ, जागतिक टपाल व तार संघटना, आंतरराष्ट्रीय शेतकी संस्था या राष्ट्रसंघाशी असहकाराच्या भावनेने वागल्या. याउलट आंतरराष्ट्रीय आरोग्य संघटना राष्ट्रसंघाच्या हातचे बाहुले बनली. शांततेच्या काळात विविध संस्थांनी भरीव कार्य केले यात संशय नाही. परंतु राष्ट्रसंघाच्या संघर्ष काळात वरील संस्थांचे असहकार्य अपयशास कारणीभूत ठरले.

( ९ )– कायम पालक ( Mandate ) मंडळाचे अधिकार व कार्यक्षेत्र मर्यादित होते. युद्धाचे मूळ कारण साम्राज्यशाही दूर करण्याकरिता पालक-मंडळाचे अधिकार व कार्यक्षेत्र वाढवावयास पाहिजे होते. त्याला विशेष महत्त्व द्यावयास हवे होते.

( १० )– " राष्ट्रसंघ" हे नाव देखील दुर्दैवी ठरले. याचे नाव समोर येताच जर्मनी, तुर्कस्तान व ऑस्ट्रिया यांच्या विरुद्ध ' राष्ट्रसंघ'

या प्रकारचीच आघाडी उघडली गेली होती. त्याची आठवण होई. त्यामुळे ' राष्ट्रसंघ' या नावामुळे त्या आघाडीची स्मृती जागृत होत असे.

( ११ )– ( League had no actual Supra national authority) राष्ट्रसंघाच्या हातात कोणत्याही प्रकारची स्वयंपूर्ण सार्वभौम सत्ता नव्हती. राष्ट्रसंघाला स्वतःचे लष्कर नसल्याने त्याचे निर्णय कोणी बंधनकारक मानत नसे.

कोणत्याही राष्ट्राने आपले सार्वभौमत्व कसल्याही प्रकारे राष्ट्रसंघाच्या स्वाधीन केले नाही. कारण राष्ट्रसंघाजवळ कसलीही सैनिकी शक्ती अथवा कार्यकारी सूत्रे, वा पुरेसा कार्यकारी अधिकारीवर्ग नव्हता.

१९३५ मध्ये जेव्हा इटालीने अबेसिनियावर स्वारी केली तेव्हा, राष्ट्रसंघाने काही प्रमाणात का असेना, इटलीच्या विरुद्ध आर्थिक नाकेबंदी केली पण ती असफल राहिली, अशा प्रकारे आपला अधिकार प्रस्थापित करण्याचा प्रयत्न ( Supra National ) कोणतीच शक्ती नसल्यामुळे अयशस्वी ठरला. याचा प्रत्यय पुन्हा १९३९ मध्ये आला. रशियाने ज्या वेळेस फिनलंडवर स्वारी केली त्या वेळेस केवळ रशियाला राष्ट्रसंघातून बाहेर काढण्यापलीकडे राष्ट्रसंघ काही करू शकला नाही. फिनलंडला राष्ट्रसंघ संरक्षण देऊ शकला नाही. थोडक्यात या संघटनेपाशी आक्रमणापासून सोडविण्यासाठी किंवा असहकाराविरोधी उभे राहण्यासाठी आपली स्वतःची अशी कोणतीही शक्ती नव्हती. तसेच त्यांना आपले ठराव अनिवार्य करण्याची कोणतीच सत्ता नव्हती. त्यामुळे हिचे निर्णय स्वीकारणे अथवा फेटाळणे हे प्रत्येक राष्ट्राच्या मर्जीवर अवलंबून होते.

(१२)– राष्ट्रसंघाची सनद काही प्रश्नांवर संदिग्ध व वादग्रस्त होती. उदाहरणार्थ; जर एखाद्या प्रदेशासंबंधी वाद असला तर प्रथम राष्ट्रसंघ या वादाची नोंद घेत असे. आता या वादाचा निर्णय कसा घ्यावा ? हे

काम करण्याचा प्रयत्न अवैध स्वरूप धारण करी. असे वादग्रस्त प्रश्न कोठे व कोणत्या तत्त्वाने सोडवावे हेही वादग्रस्त प्रकरणच होते. वादाचे निकाल ज्यांच्या विरोधी गेले ती राष्ट्रे हा निर्णय अमान्य करीत. कित्येकदा सगळा प्रश्नच पुनर्विचारासाठी येई. एकीकडे प्रश्न भिजत पडलेला असे तर दुसरीकडे वातावरण स्फोटक व तंग होई, आणि युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण होई.

## २. आर्थिक दोष

( १ )– राष्ट्रसंघ ही एक महत्त्वाची व तसेच विश्वव्यापी संस्था होती. या संस्थेच्या आर्थिक व्यवहारास पुरेशी रक्कम उपलब्ध होऊ शकली नाही. खर्चाचे प्रमाण बघितल्यास त्यामानाने उत्पन्न कितीतरी पटीने कमी होते हे दिसून येते. इ. स. १९२० ते १९४६ या कालात झालेल्या पाहणीवरूनही ही गोष्ट सिद्ध झाली आहे. उदाहरणार्थ, इ. स. १९३३ आणि १९३४ या वर्षांचे राष्ट्रसंघाचे ( आंतरराष्ट्रीय कामगार संघटना व कायम आंतरराष्ट्रीय न्यायालय यांच्या खर्चासह ) एकूण उत्पन्न केवळ ६० ते ७० लक्ष डॉलर्स होते. हे एका आंतरराष्ट्रीय संघटनेच्या कार्यास अत्यंत अपुरे ठरणारे होते. हे उत्पन्न इतके तुटपुंजे होते की, एकच राष्ट्र दररोज इतकाच पैसा लष्कराकरिता खर्च करीत असे. * उदाहरणार्थ, १९४२ मध्ये दर ४५ मिनिटांस अमेरिका ८० लक्ष डॉलर्स खर्च करीत असे. राष्ट्रसंघ एक राष्ट्र नसून अनेक राष्ट्रांची संघटना होती. या संघटनेचे उत्पन्न व खर्च एखाद्या राष्ट्राच्या खर्चापेक्षाही कमी असावे यावरून उत्पन्न किती तुटपुंजे होते हे ध्यानात येईल. +

---

* F. P. Walters, A History of the League of Nations, 1960 edi. ( in one volume) P. 130.

| वर्ष | आर्थिक काल | एकूण खर्च | कायम आंतरराष्ट्रीय न्यायालय | आंतरराष्ट्रीय कामगार संघटना व खर्च | आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचा एकूण खर्च | आर्थिक एकक (युनिट) |
|---|---|---|---|---|---|---|
| १९२० | ( व्यवस्था ) | १८६०४६५ | ७४४ | २४५५८१ | ---- | भारतीय नाणी ( रुपये ) |
| १९२० | द्वितीय | १५३८००० | २३०७० | ४९९८५० | ---- | ,, |
| १९२१ | तृतीय | ५६३४१४६ | ४०९२६० | १९०७८८० | २३८९१६० | ,, |
| १९३० | बारावे | ३०४५५७८ | २४४८५१ | ९२३२७५ | ९५६५२६ | ,, |
| १९३१ | तेरावे | ३४५०७०२ | २९५८७० | ९४४७२६ | ९९८८३२ | ,, |
| १९३२ | चौदावे | ४३९०८९३ | ३७३८२४ | १२३३९१० | १३०३३८६ | ,, |
| ९३३ | पंधरावे | ५३१७५६३ | ४२२९१७ | १३२७७९६ | १४४१२२३ | ,, |
| १९३८ | विसावे | २७१४१६२ | २२३३०० | ६४३०३२ | ---- | ,, |
| | | ३२२७३२५१ | २८९४५१६१ | ८३३५२७२ | १०२६१००४ | स्विस नाणी |
| १९३९ | एकविसावे | २३३२१४३ | १८४०६४ | ५४४११३ | ---- | भारतीय नाणी ( रुपये ) |
| | | ३२२३४०१२ | २८३९६८९ | ८३९४२४३ | १०३९९७७९ | स्विस नाणी |
| १९४० | बाविसावे | १५४१८५८ | १७१३२७ | ४५६५२८ | ---- | भारतीय नाणी ( रुपये ) |
| | | २१४५१४०८ | २३८३६३८ | ६३५१६०० | ७८५८००० | स्विस नाणी |

सभासद-राष्ट्रांवर वर्गणीची सक्ती नसल्याने काही सभासद-राष्ट्रांकडे अनेक वर्षांची वर्गणी तुंबून राहिल्यामुळे व सभासदपदत्यागासंबंधी स्वातंत्र्य असल्यामुळे राष्ट्रसंघास कार्य करणे अशक्य ठरले. मुख्य सचिवाचा अर्धाअधिक वेळ खर्चात कपात कशी करता येईल किंवा अंदाजपत्रकात कशी काटकसर करता येईल यावर जात असे. यामुळे सामाजिक कार्याच्या विभागाचीसुद्धा वाढ खुंटली. आवश्यक तेवढे कर्मचारी ठेवता आले नाहीत; आणि योजनांच्या पूर्ततेसाठी गरज असून देखील प्रवास, प्रसिद्धी व इतर कार्यवाहीसाठी पुरेसा खर्च करता आला नाही. म्हणून या कार्याच्या विभागांचे काम नाममात्र चालू राहिले व प्रगती झाली नाही.

साम्राज्यवादी आणि बड्या राष्ट्रांच्या संरक्षणाच्या दृष्टीने व त्यांच्या आर्थिक परिस्थितीला अनुसरूनच पाऊल टाकण्याचे धोरण ठेवल्याने राष्ट्रसंघाला अपयश आले. जर राष्ट्रसंघाने कर लादल्याप्रमाणे सर्व सदस्यांकडून पैसा वसूल केला असता तर आर्थिक पाया मजबूत झाला असता असे वाटते.

( २ )– जागतिक अशांतीचे मूळ कारण आर्थिक व सामाजिक विषमतेत आहे. परंतु राष्ट्रसंघामध्ये स्वतंत्र अशी आर्थिक, सामाजिक मंडळे नव्हती. तांत्रिक साहाय्य व आर्थिक मदत वगैरे सर्व प्रश्न समितीच्या अखत्यारीतच होते. समितीमध्यें कायम सदस्य-राष्ट्रांचे राजकारण चालू झाल्याने या मूलभूत प्रश्नांकडे योग्य तितके लक्ष देण्यास राष्ट्रसंघ-समितीला सवड होत नसे.

( ३ )– अप्रगत देशाच्या आर्थिक प्रश्नांची सोडवणूक शांततापूर्ण मार्गाने सोडविण्याच्या कार्यात राष्ट्रसंघाला म्हणावे तसे यश आले नाही.

( ४ )– प्रत्येक राष्ट्रात व्यापारवाढ झाली, व त्यामानाने गिऱ्हाईक कमी झाले. म्हणून देशादेशांतील कारखान्यात मजुरांना इतर उत्पादन

न करता शस्त्रास्त्रे तयार करण्याचे आदेश देण्यात आले. १९१४ मध्ये निर्माण झालेल्या भयानक शस्त्रास्त्रस्पर्धेप्रमाणे याही वेळेला शस्त्रास्त्र-स्पर्धेने त्याहीपेक्षा अति भयानक स्वरूप धारण केले. यासाठी लोकांवर कर बसविण्यात आले व गणराज्यांना कर्जे काढावी लागली. त्यामुळे आपापल्या देशाची भरभराट कशी होईल ही चिंता प्रत्येक देशाला पडली व त्यातच परदेशावर हल्ले करून आपले साम्राज्य वाढविण्याचा राष्ट्रवाद जन्माला आला. सर्व सोने संयुक्त संस्थानात ( अमेरिकेत ) गेले. देशादेशांतील व्यापर खालावला. पहिल्या महायुद्धातील राष्ट्रसंघामुळे शांततेची जी गोड स्वप्ने पडली होती ती सर्व नष्ट झाली आणि आर्थिक स्थिती सुधारून राष्ट्रवादाला चेतना देणारे हुकूमशाही नेते उदयास आले. जर्मनीतील हिटलर, इटलीतील मुसोलिनी आणि स्पेनमधील जनरल फ्रँको ही या राष्ट्रवादाची अपत्ये होत. या नेत्यांनी आपापल्या देशात सुधारणा केल्या. सैन्य व शस्त्रास्त्रे यांची वाढ केली आणि आपल्या अपमानाचा सूड घेण्याची तयारी चालविली. हिटलर, मुसोलिनी यांसारखे युद्धवादी व सत्तापिपासू नेते जगावर सत्ता काबीज करण्यासाठी उभे राहिले. स्पेनमध्ये अंतर्गत मोठी यादवी माजून तिथेही हुकूमशाही आली.

## ३ राजकीय दोष

राष्ट्रसंघाला राजकीय वर्तुळात महत्त्वाचे प्रश्न सोडविता आले नाहीत.

राष्ट्रसंघाची स्थापना अशा तत्त्वावर झाली होती की जी तत्त्वें अंगीकृत करण्यास जग अद्यापी तयार नव्हते. विश्वबंधुत्वाची कल्पना ही राष्ट्रीय भावनेवर कुर्‍हाड करणारी आहे. ही भावना चांगली व स्तुत्य आहे. राष्ट्रसंघाने ह्या तत्त्वाला प्रोत्साहन दिले. ह्या संस्थेच्या संस्थापकाने गृहीत धरले की जगातील सुसंस्कृत राज्ये, वरील तत्त्वास चालना देण्या-

करिता एकत्रित येतील. परंतु पुढील काळात असे दिसून आले की पहिल्या महायुद्धापूर्वी राष्ट्रीय भावना जितकी प्रबळ होती ती तशीच नेहमीप्रमाणे राहिली. जेव्हा एखाद्या राष्ट्राच्या जिव्हाळ्याच्या हित-संबंधाबाबत दुसऱ्या राष्ट्राशी खटके उडाले तेव्हा राष्ट्रहित आणि राष्ट्र प्रतिष्ठा यासमोर विश्वबंधुत्वाच्या भावनेची अथवा राष्ट्रसंघाची ते पर्वा करीत नसत.

( १ )– राष्ट्रसंघाने कोणत्याही राष्ट्राच्या अंतर्गत राजकारणाचा ज्यायोगे आंतरराष्ट्रीय शांततेवर परिणाम होईल अशा परिस्थितीचा विचार केला नाही. काही अंतर्गत प्रश्न असे होते की, ज्यांचा विचार केल्याशिवाय जागतिक शांतता टिकणे शक्य नव्हते. पण हे प्रश्न राष्ट्रांतर्गत प्रश्न आहेत, या तांत्रिक कारणाखाली झाकण्यात आले व म्हणून राष्ट्रसंघ त्यांचा विचार करू शकला नाही. राष्ट्राराष्ट्रांतील बरीचशी युद्धे एखाद्या देशाच्या अंतर्गत राजकीय कलहातूनच निर्माण होत असतात याकडे दुर्लक्ष केले. उदाहरणार्थ, स्पेनमधील यादवी.

स्पेनमधील रिपाब्लिकन पक्षाविरुद्ध जनरल फ्रँकोने उभारलेले बंड म्हणजे त्या देशातील अंतर्गत बंडाळीचा प्रकार होता. परंतु फ्रँकोला जर्मनी व इटालीने उघड मदत दिली. त्याची प्रतिक्रिया म्हणून सोवि-यत रशियाने रिपाब्लिकनांना मदत दिली शिवाय जगातील बहुतेक देशांचे नागरिक ‘ स्वयंसेवक ’ या नावाखाली या ना त्या बाजूकडून लढले. अशा रीतीने स्पेनमधील बंडाळीने छोट्या महायुद्धाचे स्वरूप धारण केले. एवढेच नव्हे तर आगामी महायुद्ध कोणत्या प्रकारे लढवावे याची रंगीत तालीमच स्पेनच्या भूमीवर झाली असे म्हणावे लागेल.

( २ ) आक्रमकांना थोपविण्यात राष्ट्रसंघाला यश मिळाले नाही. सभासद-राष्ट्रावर जर कोणी आक्रमण केले तर त्यास राष्ट्रसंघ थोपवू

शकला नाही. एखाद्या प्रबल पण आक्रमक राष्ट्राविरुद्ध आर्थिक व सैनिकी उपाय योजण्यास राष्ट्रसंघ असमर्थ ठरला. उदाहरणार्थ, १९३५ साली इटलीला युद्ध साहित्याची अतिशय जरुरी होती. ते सर्व साहित्य तिला बाह्य राष्ट्राकडून मिळत गेले. अशा प्रकारे कोणत्याही प्रबळ राष्ट्राविरुद्ध आर्थिक उपाययोजना करणे म्हणजे युद्धास निमंत्रण देणे असे होते. या असमर्थतेमुळेच पॅसिफिक करारात राष्ट्रसंघाची इभ्रत पार धुळीस मिळाली.

(१) १९३१ मध्ये जपानने मांचुरियावर हल्ला केला.
(२) १९३५ मध्ये इटलीने ॲबिसीनियावर स्वारी केली.
(३) १९३७ मध्ये जपानने चीनवर आक्रमण केले.
(४) १९३८–३९ सालांत जर्मनीने ऑस्ट्रिया, झेकोस्लोव्हाकिया, मेमेल व पोलंड यावर स्वाऱ्या केल्या.
(५) रशियाने बाल्टिक राष्ट्रावर आपले प्रभुत्व स्थापन केले व १९३९ मध्ये फिनलँडवर स्वारी केली. बड्या राष्ट्रांनी खाजगी व गुप्त करार केला.

(३)– चिमुकल्या राष्ट्रांचे चिमुकले प्रश्न त्यांच्या नजरेत भरले नाहीत. ग्रीस व बल्गेरियाचा सीमाप्रश्न योग्यरीत्या हाताळला गेला नाही. हाच प्रकार युगोस्लाव्हियामधील परिस्थितीचा प्रश्न सोडविण्याबाबत झाला.

नमूद केलेल्या ६६ आंतरराष्ट्रीय प्रश्नांपैकी ११ प्रश्न देखील राष्ट्रसंघ सोडवू शकला नाही; २० प्रकरणे ( good offices ) मध्यस्थी करिता पाठविली गेली.

(४)– जर्मनी आणि इटलीचे प्रयत्न राष्ट्रसंघाला भेडसावण्याचे होते. जपान आणि इटली यांची राष्ट्रसंघाशी प्रतारणा चालू होती, जर्मनी आणि रशियाची वृत्ती धरसोडीची व ग्रेटब्रिटन आणि फ्रान्स यांची वर्तणूक अविश्वासाची होती.

( ५ )– इ. स. १९२६ पर्यंत जर्मनीला राष्ट्रसंघात घेण्यात आले नव्हते. आस्ट्रिया नि तुर्कस्थान ह्या शत्रुराष्ट्रांना मज्जाव करण्यात आला. त्यामुळे राष्ट्रसंघ ही संघटना केवळ युरोपातील बड्या सत्ताधारी व सत्तास्पर्धक राष्ट्रांच्या हातातील बाहुले बनली. पुढे जपान ( १९३४ ), जर्मनी ( १९३५ ), इटलीसारख्या १६ बलाढ्य राष्ट्रांनी राष्ट्रसंघाला सोडून दिले. यामुळे कोणत्याही राष्ट्राला, बिनसभासद राष्ट्राला निःशस्त्रीकरणाबाबत सांगणे अशक्य झाले. यामुळे राष्ट्रसंघ कमजोर झाला.

आपत्तीच्या काळात सदस्य-राष्ट्रे युद्ध थांबेल अशी कठोर कारवाई करण्यास कचरत होती. या संबंधात फक्त सरकारची एकट्याचीच चूक नसून विषेशतः इतर कोणतेही प्रजासत्ताक सरकार, जोपर्यंत त्याला प्रबळ जनमत प्राप्त होणार नाही, तोपर्यंत कठोर कारवाई करण्याचा आदेश देण्यास सिद्ध नव्हते.* याशिवाय युद्ध थांबविण्याच्या

* जर्मनी, जपान आणि इटली या देशातील जनतेने आपापल्या शासनाला साम्राज्यवादाच्या धोरणास पाठिंबा दिला. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स येथील जनतेने आपल्या शासनाला आक्रमणापासून परावृत्त केले. यामुळे फ्रान्स इंग्लंड, वगैरेच्या सरकारांनी राष्ट्रसंघाला म्हणावे तितके प्रोत्साहन व पाठिंबा दिला नाही हेही अपयशाचे एक कारण होय.

राष्ट्रसंघाच्या विरोधी अपप्रचार करून पद्धतशीरपणे राष्ट्रसंघाच्या कार्यवाहीला अडथळा निर्माण करण्याची एक मोहीमच जर्मनी–ऑस्ट्रिया–टर्की यांच्या युतीने योजिली होती. परंतु फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका अशा लोकशाहीवादी राष्ट्रांनी या अपप्रचाराला विरोध केला नाही. एवढेच नव्हे तर राष्ट्रसंघानेदेखील या अपप्रचारास वेळीच पायबंद घालण्यासाठी योग्य ते पाऊल उचलेले नाही. यामुळेच राष्ट्रसंघाची प्रतिष्ठा आणि ख्याती यांना ग्रहण लागले. राष्ट्रसंघ अयशस्वी ठरण्यासाठी हे एक कारण घडले. यामुळेच आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापनेच्या कार्यास खीळ बसली.

ऐवजी युद्ध करण्याचाच प्रसंग येईल या भीतीने पुष्कळशी राष्ट्रे अशी कारवाई करू इच्छीत नव्हती.+

१८२३ मध्ये प्रेसिडेंट मन्रोने अमेरिकेचे अलिप्ततावादी (We shall not interfere in the affairs of Europe. You should not interfere in the affairs of America ) धोरण जाहीर केले. अमेरिका खंड अमेरिकन लोकांसाठी आहे, या खंडाच्या अंतर्गत कारभारात परकीयांचा हस्तक्षेप झाल्यास ते शत्रुत्वाचे कृत्य मानले जाईल; याच्या उलट अमेरिका युरोपच्या राजकारणात कसलाच हस्तक्षेप करणार नाही, असे सांगण्यात आले. अमेरिकेचे सत्ताप्राबल्याचे क्षेत्र ( sphere of influnce ) उत्तर व दक्षिण अमेरिका हे सुरक्षित ठेवण्याचे धोरण या तत्त्वाच्या मुळाशी आहे. या मन्रो सिद्धान्ताने अमेरिकन लोक भारून गेले होते. यामुळे ती जागतिक राजकारणापासून व युरोपमधील सत्तासंघर्षापासून शक्यतोवर अलिप्त राहिली. पहिले महायुद्ध जरी १९१४ मध्ये सुरू झाले तरी इ. स. १९१७ पर्यंत अमेरिका युद्धात उतरली नव्हती.

जेव्हा पहिल्या महायुद्धाचा भडका उडाला तेव्हा अमेरिकेतील लोकांनी या राजकीय घडामोडीशी मुळीच कर्तव्य नाही, अशी वृत्ती स्वीकारली. अमेरिकेने तटस्थतेचे धोरण स्वीकारले. अमेरिकेतील सुमारे एकपचमांश जनता मूळ जर्मन वंशाची होती हेही एक तटस्थतेचे कारण होते. शिवाय अमेरिकेतील भांडवलदार व्यापाऱ्यांना अमेरिकेची तटस्थता हवी होती. कारण अमेरिका युद्धात सहभागी झाल्यास त्यांना

* "....The effectiveness of the league depends very largely upon the degree of its inclusiveness; that consequently, the absence of states like Russia and America is fatal to the proper fulfilment of its purposes," Harold J. Laski, A Grammar of politics, P. 587

अधिक त्याग करावा लागला असता व कर द्यावे लागले असते. परंतु जर्मनीने इ. स. १९१५ ते १९१७ मध्ये काही अमेरिकन जहाजांना व अमेरिकनांना जलसमाधी दिली. जर्मनीने मेक्सिकोशी अमेरिकेविरुद्ध केलेला कट उघडकीस आला. इ. स. १९१७ मध्ये अमेरिकेतील लोकमत फ्रान्स, ब्रिटन व दोस्त राष्ट्रे यांना अनुकूल बनले. तत्कालीन अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी अमेरिकन काँग्रेसला संदेश दिला की, या युद्धात अमेरिकेने भाग घेतल्यास जगाची होत असलेली मोठी हानी टळेल व दोस्त राष्ट्रे टिकाव धरू शकतील. लोकशाही जिवंत राहील, जगातील पुढील लढाई टाळता येईल. ( War to end war. It is a war for freedom and justice and self government amongst all the nations of the world, a war to make the world safe for the poeople who live upon it and have made it their own ) चिरकाल शांततेकरिता युद्ध जिंका. जगातील युद्धे कायमची थांबविता येतील. जागतिक शांतता प्रस्थापित करता येईल. यामुळे जगावर उपकार केल्यासारखे होईल. जग अमेरिकेचे कृतज्ञ राहील. मग युद्धानंतर पुन्हा आपल्याला अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारता येईल, असे सांगितल्याने अमेरिकेने अखेर दिनांक ६-४-१९१७ रोजी युद्धात भाग घेतला व युद्ध जिंकले. वुड्रो विल्सनच्या भगीरथ प्रयत्नानेच राष्ट्रसंघाची स्थापना झाली. प्रे. विल्सन यांनी राष्ट्रसंघाच्या ( Covenant ) सनदेला अमेरिकेतर्फे मान्यता दिली होती.

व्हर्सायच्या तहाच्या वेळी प्रे. विल्सनचा असा आग्रह होता की, तह करताना कोणाचाही मुलूख खालसा करावयाचा नाही, किंवा कोणावरही खंडणी लादावयाची नाही, किंवा कोणापासून नुकसानभरपाई मागावयाची नाही. सर्व प्रादेशिक प्रश्न सोडविताना त्यास तेथील जनतेची मान्यता असणे आवश्यक आहे. व्हर्सायच्या तहाने विल्सनची घोषणा धुळीस मिळविली. तसेच युद्धात राष्ट्रांना दिलेले

कर्ज परत मिळविण्याची हमी याव्यतिरिक्त अमेरिकेला दुसरा काही प्रादेशिक अगर अन्य तऱ्हेचा लाभ झाला नाही. इतकेच नव्हे तर किमान नुकसानभरपाईदेखील मिळाली नाही. यामुळे पहिले महायुद्ध संपताच मन्रो तत्त्वाच्या भोक्त्या अमेरिकेत अलिप्ततावादाला भरती आली. परराष्ट्रीय भानगडीत पडू नये असे अमेरिकन कायदेमंडळास वाटले. परिणामतः अमेरिकन सेनेटने व्हर्सायचा तह व राष्ट्रसंघाच्या योजनेस मान्यता देण्याचे नाकारले. इ. स. १९२३-३३ पर्यंतच्या काळात अमेरिकेने पुनश्च अलिप्ततावादाचे धोरण अवलंबिले. राष्ट्र-संघाच्या ( Covenant ) सनदेचे कलम नं. १० प्रमाणे प्रत्येक सभासद-राष्ट्राला प्रादेशिक स्वायत्ततेची हमी इतर राष्ट्रांनी दिली पाहिजे. ही अट मन्रो तत्त्वाविरुद्ध असल्यामुळे अमेरिकेने राष्ट्रसंघात प्रवेश करण्याचे देखील नाकारले. अमेरिकन लोकमतदेखील या काळात संपूर्णपणे अलिप्ततावादी होते.

राष्ट्रसंघाच्या स्थापनेच्या वेळी संयुक्त संस्थाने ( अमेरिका ), जर्मनी, मेक्सिको व ब्राझील यांना सभासदत्व नव्हते. जर्मनी हा मानवजातीचा शत्रू समजला जाई. इ. स. १८२३ च्या मन्रो ( डॉक्ट्रीन ) तत्त्वाप्रमाणे संयुक्त संस्थानांना युरोपीय राजकारणात हात घालावयाचा नव्हता. अमेरिकन प्रतिनिधिगृहाने अमेरिकेने राष्ट्रसंघाचे सभासदत्व स्वीकारू नये असा ठराव केला. * त्यामुळे प्रथमपासूनच अमेरिका राष्ट्रसंघाची सभासद नव्हती.

---

* " विल्सनसाहेबांना जागतिक राजकारणात जेवढी हौस होती तितकी अमेरिकन राष्ट्राला नव्हती. कुठल्याही राष्ट्राने कुरापत काढली तर त्यासाठी राष्ट्र-संघाच्या हुकमाने लक्षावधी अमेरिकन लोकांचे रणक्षेत्रावर बळी देण्यात यावेत, ही कल्पनाच अमेरिकन जनतेला मान्य होईना, "– द. श्री. मराठे, जगाचा इतिहास पान ९३६.

( ६ ) – दुसरे अपयशाचे कारण, या संघाचा कार्यक्रम पार पाडण्यात अमेरिकेने सहकार्य केले नाही.+ अमेरिकेच्या अध्यक्षाच्या प्रेरणेने राष्ट्रसंघाची स्थापना झाली. परंतु तीच अमेरिका हा राष्ट्रसंघ कोलमडून पडेपर्यंत त्याच्यापासून अलिप्तच राहिली. त्यामुळे हा राष्ट्रसंघ दुबळा बनला. व दुसरे महायुद्ध थोपवू शकला नाही. तो अपयशी ठरला. तो जागतिक शांततेचे रक्षण करण्यास असमर्थ ठरला. अमेरिकेने व्हर्सायच्या तहावर सही केली नाही ती नाहीच, पण राष्ट्रसंघाचीही ती सभासद झाली नाही. जगाचे प्रश्न तसेच अर्धवट टाकून देऊन तिने पुन्हा अलिप्ततावादाचा आश्रय घेतला. युद्धाने जर्जर झालेली, इंग्लंड व फ्रान्स ही राष्ट्रे कमजोर होती. ही दोन्ही राष्ट्रे राष्ट्रसंघाची योग्य प्रकारे जोपासना करू शकली नाहीत. त्यामुळे राष्ट्रसंघ सुरुवातीपासूनच दुबळा राहिला व गंभीर स्वरूपाचे प्रश्न सोडविण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी कधीच आले नाही. अमेरिकेसारख्या मोठ्या राष्ट्राने जर राष्ट्रसंघाच्या राजकारणात भाग घेतला असता तर कदाचित जागतिक राजकारणाच्या रंगमंचाचे स्वरूप निराळे झाले असते व जगावर दुसऱ्या महायुद्धाचे संकट ओढवले नसते; जर्मनीमध्ये हिटलरचा आणि इटलीमध्ये मुसोलिनीचा उदय झाला नसता. थोडक्यात म्हणजे या कारणामुळे या राष्ट्रसंघाचा प्रभाव कधीच पडला नाही.

( ७ )– राष्ट्रसंघामध्ये युरोपचा प्रभाव, विशेषतः इंग्लंड व फ्रान्सचे वर्चस्व असल्याने इतर राष्ट्रांचा राष्ट्रसंघावर विश्वास राहिला नाही. *

---

+ प्रे. वुड्रो विल्सन हे डेमॉक्रॅटिक पक्षाचे होते. परंतु अमेरिकेचा कारभार रिपब्लिकन पक्षाच्या हाती होता. सिनेटमध्ये रिपब्लिकन पक्षाचे बहुमत होते. त्यामुळे अमेरिकेच्या ( विल्सनच्या ) परराष्ट्रीय धोरणावर या पक्षाचे नियंत्रण होते. अशा परिस्थितीत जेव्हा प्रे. विल्सननी तह-परिषदेला उपस्थित राहण्याचा आपला मनोदय प्रकट केला तेव्हा रिपब्लिकन पुढाऱ्यांची अशी समजूत झाली की, अध्यक्षमहाशय आपल्या भावी धोरणाविषयी आपल्याशी विचारविनिमय करतील. पण त्यांनी तसे केले नाही. रिपब्लिकन पुढाऱ्यांना तो आपला अपमान वाटला व त्याचा वचपा म्हणून त्यांनी धरसोडीचे धोरण स्वीकारून प्रे. विल्सनच्या मार्गात वारंवार अडथळे आणले.

साम्राज्यवादी आणि बड्या राष्ट्रांच्या संरक्षणाच्या दृष्टीने व त्यांच्या आर्थिक परिस्थितीला अनुसरूनच पाऊल टाकण्याचे धोरण ठेवल्याने राष्ट्रसंघाला अपयश आले. जर राष्ट्रसंघाने कर लादल्याप्रमाणे सर्व सदस्यांकडून पैसा वसूल केला असता तर आर्थिक पाया मजबूत झाला असता.

( ८ )- राष्ट्रसंघाच्या समितीत ज्यांचे वर्चस्व होते त्यांनी सर्वच कार्यवाही स्वार्थी दृष्टीने आपल्याकडे वळवून घेतली आणि एका तऱ्हेने स्वार्थी हेतूनेच अंमलबजावणी केली म्हणून राष्ट्रसंघाला इतर सदस्यांकडून आवश्यक ते प्रोत्साहन मिळाले नाही. पर्यायाने ज्यांचा अधिकार गाजला त्यांच्या एकांगी धोरणामुळेच हे अपयश आले. आणि १९३९ साली म्हणजे एका पिढीतच दुसऱ्या वेळी जागतिक महायुद्ध सुरू झाले.

---

* " The League of Nations failed because it was always designed to be an instrument for securing the protection of the imperialist and economic system of the majoı powers," P. 105. " . . . . the League finances would be on a sounder basis if the contributions from member states were supple. mented by some kind of League Tax, This might conceivably be levied on all international movements of goods, money, aud persons," Julia E Jonson, Reconstituting the League of Nations, P. 113.

+ राष्ट्रसंघाच्या अस्तित्वाने सत्तेचे समतोलाचे ( Balance of Powar ) महत्त्व कमी झाले नाही, परंतु त्याची गरज तीव्रतेने भासू लागली, कारण एखादे सर्व शक्तिमान राष्ट्र राष्ट्रसंघाला धुडकावू शकत असे. वास्तविकरीत्या सामुदायिक सुरक्षितता ( Collective Security ) अमलात आली नाही.

" What will be the relation of this collective s ecurity to that of the League of Nations ? Some states want an American League of Nations, independent of Geneva. Some

( ६ ) – दुसरे अपयशाचे कारण, या संघाचा कार्यक्रम पार पाडण्यात अमेरिकेने सहकार्य केले नाही.+ अमेरिकेच्या अध्यक्षाच्या प्रेरणेने राष्ट्रसंघाची स्थापना झाली. परंतु तीच अमेरिका हा राष्ट्रसंघ कोलमडून पडेपर्यंत त्याच्यापासून अलिप्तच राहिली. त्यामुळे हा राष्ट्रसंघ दुबळा बनला. व दुसरे महायुद्ध थोपवू शकला नाही. तो अपयशी ठरला. तो जागतिक शांततेचे रक्षण करण्यास असमर्थ ठरला. अमेरिकेने व्हर्सायच्या तहावर सही केली नाही तो नाहीच, पण राष्ट्रसंघाचीही ती सभासद झाली नाही. जगाचे प्रश्न तसेच अर्धवट टाकून देऊन तिने पुन्हा अलिप्ततावादाचा आश्रय घेतला. युद्धाने जर्जर झालेली, इंग्लंड व फ्रान्स ही राष्ट्रे कमजोर होती. ही दोन्ही राष्ट्रे राष्ट्रसंघाची योग्य प्रकारे जोपासना करू शकली नाहीत. त्यामुळे राष्ट्रसंघ सुरुवातीपासूनच दुबळा राहिला व गंभीर स्वरूपाचे प्रश्न सोडविण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी कधीच आले नाही. अमेरिकेसारख्या मोठ्या राष्ट्राने जर राष्ट्रसंघाच्या राजकारणात भाग घेतला असता तर कदाचित जागतिक राजकारणाच्या रंगमंचाचे स्वरूप निराळे झाले असते व जगावर दुसऱ्या महायुद्धाचे संकट ओढवले नसते; जर्मनीमध्ये हिटलरचा आणि इटलीमध्ये मुसोलिनीचा उदय झाला नसता. थोडक्यात म्हणजे या कारणामुळे या राष्ट्रसंघाचा प्रभाव कधीच पडला नाही.

( ७ )– राष्ट्रसंघामध्ये युरोपचा प्रभाव, विशेषतः इंग्लंड व फ्रान्सचे वर्चस्व असल्याने इतर राष्ट्रांचा राष्ट्रसंघावर विश्वास राहिला नाही. *

---

+ प्रे. वुड्रो विल्सन हे डेमॉक्रॅटिक पक्षाचे होते. परंतु अमेरिकेचा कारभार रिपब्लिकन पक्षाच्या हाती होता. सिनेटमध्ये रिपब्लिकन पक्षाचे बहुमत होते. त्यामुळे अमेरिकेच्या ( विल्सनच्या ) परराष्ट्रीय धोरणावर या पक्षाचे नियंत्रण होते. अशा परिस्थितीत जेव्हा प्रे. विल्सनने तह-परिषदेला उपस्थित राहण्याचा आपला मनोदय प्रकट केला तेव्हा रिपब्लिकन पुढाऱ्यांची अशी समजूत झाली की, अध्यक्षमहाशय आपल्या भावी धोरणाविषयी आपल्याशी विचारविनिमय करतील. पण त्यांनी तसे केले नाही. रिपब्लिकन पुढाऱ्यांना तो आपला अपमान वाटला व त्याचा वचपा म्हणून त्यांनी धरसोडीचे धोरण स्वीकारून प्रे. विल्सनच्या मार्गात वारंवार अडथळे आणले.

साम्राज्यवादी आणि बड्या राष्ट्रांच्या संरक्षणाच्या दृष्टीने व त्यांच्या आर्थिक परिस्थितीला अनुसरूनच पाऊल टाकण्याचे धोरण ठेवल्याने राष्ट्रसंघाला अपयश आले. जर राष्ट्रसंघाने कर लादल्याप्रमाणे सर्व सदस्यांकडून पैसा वसूल केला असता तर आर्थिक पाया मजबूत झाला असता.

( ८ )- राष्ट्रसंघाच्या समितीत ज्यांचे वर्चस्व होते त्यांनी सर्वच कार्यवाही स्वार्थी दृष्टीने आपल्याकडे वळवून घेतली आणि एका तऱ्हेने स्वार्थी हेतूनेच अंमलबजावणी केली म्हणून राष्ट्रसंघाला इतर सदस्यांकडून आवश्यक ते प्रोत्साहन मिळाले नाही. पर्यायाने ज्यांचा अधिकार गाजला त्यांच्या एकांगी धोरणामुळेच हे अपयश आले. आणि १९३९ साली म्हणजे एका पिढीतच दुसऱ्या वेळी जागतिक महायुद्ध सुरू झाले.

---

* " The League of Nations failed because it was always designed to be an instrument for securing the protection of the imperialist and economic system of the major powers," P. 105. " . . . . the League finances would be on a sounder basis if the contributions from member states were supplemented by some kind of League Tax, This might conceivably be levied on all international movements of goods, money, aud persons," Julia E Jonson, Reconstituting the League of Nations, P. 113.

\+ राष्ट्रसंघाच्या अस्तित्वाने सत्तेचे समतोलाचे ( Balance of Powar ) महत्त्व कमी झाले नाही, परंतु त्याची गरज तीव्रतेने भासू लागली, कारण एखादे सर्व शक्तिमान राष्ट्र राष्ट्रसंघाला धुडकावू शकत असे. वास्तविकरीत्या सामुदायिक सुरक्षितता ( Collective Security ) अमलात आली नाही.

" What will be the relation of this collective s ecurity to that of the League of Nations ? Some states want an American League of Nations, independent of Geneva. Some

want a regional League within the frame work of the Geneva institution. Others, including the United States, favour Cooperation with the Leaague of Nations for purposes of trade and peace, but favor the absolute independence and equality of the Inter-American group of nations," P. 77

' Sumner Wells, in a really notable address, has aptly said, " The League of Nations, as he (Wilson ) conceived it, failed in part because of the blind selfishness of men here in the United States, as well as in other parts of the world; it failed because of its utilization by certain powers primarily to advance their own political and Commercial ambitions; but it failed chiefly because of the fact that it was forced to operate, by those who dominated its councils, as a means of maintaining the status quo," Julia E. Johnson, Reconstituting the League of Nations, P. 164.

" I hope we shall not lightly cast aside all the immense work which was accomplished by the creation of the League of Nations certainly we must take as our foundation the lofty conception of freedom, law and morality which was the spirit of the League, We must try—I am speaking of course, only for ourselves—we must try to make the council of Europe or whatever it may be called, into a really effective League with all the strongest forses concerned woven into its texture with high court to adjust disputes and with forces, armed forces, national or international, or both, held ready to enforce these decisions and prevent renewed aggression and the preparation of future wars," British Prime Minister, Winston Churchill, Address, March, 21, 1923, Congressonai Record, Mr. 23,43, p. A. 1474.

The idea of a European federation, long favoured by democrats, is basically sound. Scholars and politicians should vie in giving it realistie shape, equally remote from utopian dreams and inactive pessimism," Arnold Brecht, Graduate Faculty, New School for Social Research, Harvard Law Review, F. 42, P. 593—4.

## तात्कालिक कारणे

पहिल्या महायुद्धात रशियन सैन्याचा मोठ्या प्रमाणात संहार होऊन ते मोडकळीस आले होते. याच सुमारास तेथे रक्तलांछित क्रांती झाली व साम्यवादाचा आरंभ झाला. रशिया हे पहिले साम्यवादी राष्ट्र ठरले. साम्यवादाविरुद्ध इतर युरोपियन राष्ट्रांची व अमेरिकेची प्रतिक्रिया तीव्र होती. सर्वांनी रशियन साम्यवादास संपुष्टात आणण्याचा अतोनात प्रयत्न केला. परंतु यातून साम्यवाद टिकून राहिला. इतरांना साम्यवादाबद्दल वाटणाऱ्या तिटकाऱ्यामुळे रशियास राष्ट्रसंघाचे सभासदत्व देण्यात आले नाही. * पुढे १९३४ साली युरोपातील राजकीय परिस्थिती जलद गतीने बदलू लागली. जर्मनी नव्याने सामर्थ्यसंपन्न होऊ लागला. त्यामुळे युरोपियनांमध्ये एकी

---

* " साधारणपणे एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात ढवळाढकळ करू नये हा नियम पाळला जातो. रशिया हे कम्युनिस्ट राष्ट्र असल्यामुळे आणि कम्युनिस्टांचे जागतिक क्रांतीचे तंत्र जगप्रसिद्ध असल्यामुळे इतर राष्ट्रे रशियाशी कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवावयास बिचकत असत. रशियन क्रांतितंत्राची अन्य राष्ट्रांना इतकी भीती वाटे की, कम्युनिझमच्या प्राथमिक अवस्थेमध्ये कम्युनिझमचा नाश करण्यासाठी म्हणून कम्युनिस्ट सत्तेविरुद्ध बंड करणाऱ्यांना पैसा, दारूगोळा, इत्यादींची त्यांनी सढळ हाताने मदत केली.----

रशियातील कम्युनिझमचा परभारे नाश झाला तर तो पुष्कळ युरोपियन राष्ट्रांन हवा होता. पण त्यासाठी कोणी झीज सोसावयास फारसे तयार नव्हते, म्हणून कम्युनिझमला जीवदान मिळाले. रशियाबद्दल बहुतेक सुधारलेल्या राष्ट्रांनी औदासीन्य पत्कारले. रशियन तत्त्वज्ञानाच्या संसर्गाने आपली जनता बिघडेल या भीतीने रशियाशी संबंध ठेवावयास बहुतेक राष्ट्रे नाखूष असत --- या काळात रशियाला युरोपियन राष्ट्रांनी वाळीतच टाकले होते." द. श्री. मराठे, जगाचा इतिहास, पा १०१४.

आवश्यक भासू लागली * या कारणामुळे रशियास या वेळेस राष्ट्रसंघाचे सभासदत्व देण्यात आले.

१९३४ नंतर जर्मनीबद्दलची भीती वाढतच राहिली. युरोपात सत्तास्पर्धा व गटबाजीस ऊत येऊ लागला. रशियास अशी भीती वाटतच होती की आपल्यावर जर्मनीने जर स्वारी केली तर कोणी साहाय्यासाठी धावून येणार नाही. या असुरक्षिततेच्या भावनेतूनच रशियाने १९३९ साली जर्मनीस पाठिंबा दिला व जर्मनीबरोबरच पोलंडवर स्वारी केली व फिनलँडचा बफर ( buffer ) राज्य म्हणून उपयोग व्हावा म्हणून तेही जिंकून घेतले. या सर्व आक्रमकांना राष्ट्रसंघ आवरू शकला नाही. त्याने उलट रशियाचे सभासदत्व रद्द केले. या सत्तास्पर्धेपुढे राष्ट्रसंघ हतबल होत गेला व त्याची असमर्थता सतत वाढूच लागली.

पहिल्या महयुद्धानंतर लोक युद्धाला विटले होते. शांततेची आस त्यांच्यात निर्माण झाली होती. त्या भावनेतूनच राष्ट्रसंघाचा जन्म झाला होता. पण दुर्दैवाने पहिल्या महायुद्धाच्या जखमा भरून निघताच युद्धाबद्दलची घृणाही नाहीशी होऊ लागली. युरोपीय राष्ट्रे व अमेरिका नवीन जोमाने युद्धाच्या तयारीस लागली. १९३४ पासून तर युरोपियन इतिहासातील महान संघर्षाचा काळ सुरू झाला. युद्धाचे ढग युरोपियन क्षितिजावर जमू लागले. शेतीच्या उत्पन्नाकडे संपूर्ण

---

* अमेरिकेच्या, राष्ट्रसंघाचे सभासद न होणे व अँग्लो-फ्रेंच-तुर्क संयुक्त करारात सामील न होणे,या धोरणास पश्चिम युरोपीय राष्ट्रांनी तीव्र नापसंती व्यक्त केली. प्रे. विल्सनची तशी इच्छा ( to France's cry for security ) असून देखील फ्रान्सला संरक्षण देता आले नाही.

दुर्लक्ष करून शस्त्रनिर्मिती वेगाने सुरू झाली. त्यामुळे अन्नधान्याचे उत्पन्न घटले; व्यापारात मंदी येऊ लागली व लोकांचे प्रश्न भयानक स्वरूप धारण करू लागले. यातच स्पेनमध्ये क्रांती होऊन तेथे फ्रँकोच्या हुकूमशाहीस आरंभ झाला. मुसोलिनी, हिटलर आणि टोजो हे तीन अदम्य हुकूमशहा जगाच्या क्षितिजावर तळपू लागले. त्यांनी हाहाकार माजविला होता. मुसोलिनीने ॲबिसिनिया पादाक्रांत केला, तर टोजोने मांचुरिया गिळंकृत केला. हे सर्व प्रकार राष्ट्रसंघ उघड्या डोळ्यांनी असहाय्य स्थितीत पाहत बसला.

या परिस्थितीत राष्ट्रसंघ ही एक प्रभावी संघटना असावयास पाहिजे होती. तिने सदस्यांना शक्यतो टिकवून ठेवावयास पाहिजे होते. परंतु कोस्टारिकासारखे लहान राष्ट्र–जे राष्ट्रसंघाच्या आर्थिक अटी पूर्ण करू शकले नाही– त्यास त्याने या संघटनेतून बाहेर काढले. वाढत्या जर्मन, इटाली व जपानच्या आक्रमणांना राष्ट्रसंघ थोपवू शकला नाही. म्हणून त्याचा निषेध दर्शविण्यासाठी ब्राझिल आदि पाच-सहा राष्ट्रे बाहेर पडली; व बहुतेक राष्ट्रे युद्धयमान परिस्थितीस बळी पडून लहान लहान आक्रमणे करू लागली व शांतता धोक्यात आणू लागली होती. राष्ट्रसंघ आपणास बाहेर काढील या कल्पनेमुळे अशी राष्ट्रे आधीच बाहेर पडू लागली होती.

युद्धाच्या सुरुवातीसच मोडकळीस आलेल्या राष्ट्रसंघाचे १९४६ ला विसर्जन झाले. अनेक राष्ट्रांनी या संघटनेशी असहकार पुकारला. ज्या राष्ट्रांनी या अनौपचारिक विसर्जनापूर्वीच राष्ट्रसंघ स्वतः होऊन सोडला किंवा संघाच्या नियमाचे पालन न केल्यामुळे ज्यांना सोडावा लागला अशी राष्ट्रे खालीलप्रमाणे आहेत :

| समासदत्व संपल्याच्या तारखा | राष्ट्र |
|---|---|
| १ जानेवारी १९२७ | कोस्टरिका |
| १३ जून १९२८ | ब्रॉझील |
| २७ मार्च १९३५ | जपान |
| १९ ऑक्टोबर १९३५ | जर्मनी |
| २३ फेब्रुवारी १९३७ | पॅराग्वे |
| १८ मार्च १९३८ | ऑस्ट्रिया |
| २५ मे १९३८ | ग्वाटेमाला |
| २६ जून १९३८ | निकाराग्वुआ |
| ९ जुलै १९३८ | हांड्युरास |
| ९ ऑगस्ट १९३९ | साल्व्हेडार |
| १० डिसेंबर १९३९ | इटली |
| १४ डिसेंबर १९३९ | संयुक्त सोवियत समाजवादी प्रजासत्ताक ( U. S. S. R. ) |
| १ जून १९४० | चिली |
| ११ जुलै १९४० | व्हेनेझुएला |
| १० एप्रिल १९४१ | हंगेरी |
| ८ मे १९४१ | स्पेन |
| १० जुलै १९४२ | रुमानिया |
| ८ एप्रिल १९४४ | हैती |

युरोपात प्रत्यक्ष युद्धसदृश्य वातावरण निर्माण झाले असूनही राष्ट्रसंघ स्तब्ध होता. वर दर्शविल्याप्रमाणे सभासद-राष्ट्रे बाहेर पडत होती. आक्रमणे उघड उघड होऊ लागली. त्या आक्रमणांना बड्या राष्ट्रांचा पाठिंबाही मिळू लागला. इटालीने ॲबिसिनियावर आक्रमण करून ते राष्ट्र पादाक्रांत केले व सर्व बड्या राष्ट्रांनी,ॲबिसिनिया हा इटालीचा भाग आहे असे मान्य केले.राष्ट्रसंघाने इटालीच्या आक्रमणाच्या निषेधार्थ इटालीवर आर्थिक नाकेबंदी घालण्याचे घोषित केले होते. पण हे निर्बंधही बड्या राष्ट्रांनी पाळले नाहीत. अन्याय, अनीती, सत्तालोलुपता यांमुळे फोफावू लागली. जर्मनी व्हर्सायच्या तहाचा अपमान अजूनपर्यंत मनात घोळवीत होता. निर्लष्करीकरणाचे नियम धाब्यावर बसवून जर्मनीने लष्करीकरणाकडे घोडदौड आरंभिली. सरहद्दीचे तंटे निर्माण होऊ लागले. फ्रान्स, बेल्जियम व नेदरलँड यांच्या सरहद्दीच्या कटकटी चांगल्याच गाजू लागल्या. रशिया व जर्मनीचे वैमनस्य वाढू लागले. अशा या स्फोटक अवस्थेत अतिशय दुर्दैवाची गोष्ट म्हणजे अमेरिका, रशिया आदी प्रभावी राष्ट्रे या संघटनेत नव्हती. त्यामुळे या युद्धाच्या भडकत्या ज्वालांत राष्ट्रसंघ निष्प्रभ वाटू लागला. या संघटनेची अवस्था अतिशय केविलवाणी झाली* राष्ट्रसंघ अस्तित्वात असूनही वर दर्शविल्या-

---

*१९३८मध्ये फेब्रुवारीच्या अखेरीस परलोकवासी चेंबरलेन यांनी राष्ट्रसंघाच्या कार्यवाहीबद्दल, आर्थिक नाकेबंदीच्या घडामोडीबद्दल, तसेच सनदेतील १० व्या कलमानुसार राष्ट्रसंघाच्या कार्यक्षमतेबद्दल अविश्वास व्यक्त केला. परलोकवासी चेंबरलेन म्हणतात, "मला खात्री आहे, माझ्या मते राष्ट्रसंघाची कार्यवाही अयोग्य असून प्रत्यक्षात अयशस्वी आहे.संयुक्तपणे सुरक्षिततेची अंमलबजावणी व त्यासाठी प्रयत्न करण्यास राष्ट्रसंघ असमर्थ आहे. म्हणून माझे म्हणणे असे आहे की, आपल्या सुरक्षिततेसाठी आपण या संघावर विसंबून राहू नये. कोणत्याही लहान व असमर्थ राष्ट्रानेसुद्धा या संघाकडून कसल्याही प्रकारच्या मदतीची अपेक्षा करू नये. आपल्याला हा संघ मदत करील असा समज कोणा राष्ट्राचा असेल तर तो दूर केला पाहिजे. या संघाकडून कोणतीही फलदायी अपेक्षा करण्यात अर्थ नाही.

प्रमाणे इटाली ॲबिसिनियावर आक्रमण करते आहे. जपानने मांचूरिया जिंकले आहे. जर्मनी, रशिया हे पोलंडचा फडशा पाडत आहेत. यामुळे राष्ट्रसंघाची अवस्था केविलवाणी झाली. या संघटनेवरील विश्वास एकदम उडू लागला व युद्धाच्या भडकत्या ज्वालांत राष्ट्रसंघ नामशेष झाला. × या संघटनेत इतक्या उणीवा होत्या की तिचे पुनरुज्जीवनही होऊ शकले नाही. फक्त स्मृती मात्र शिल्लक आहे.

---

×......it is, I think, obvious that with the breakdown of the League there would be an end to international experiment. We should then revert to the Pre-1914 situation, which is as we have learned, the inevitable source of war." Harold J. Laski, A Grammar of Politics, P. 604.

●●●

# राष्ट्रसंघ आणि भारत ९

भारत हा शांतताप्रिय देश आहे, हे जगाला फार पूर्वीपासून माहीत होते. जगात शांतता प्रस्थापित होणे आवश्यक आहे.

सर्वेपिः सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयः ॥
सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चिद् दुःखमाप्नुयात् ॥

अशी भारताची प्राचीन काळापासून शिकवण होती. प्राचीन काळात सम्राट अशोकाने युद्धे समूळ नष्ट करण्याचा प्रथम पद्धतशीर प्रयत्न केला. बौद्ध धर्माच्या अहिंसा व शांतता या प्रमुख तत्त्वांनुसार सम्राट अशोकाने सार्वत्रिक शांततेचे प्रयत्न केले.

भारताला राष्ट्रसंघाचे सदस्यत्व प्राप्त झाल्यावर त्याने शांततेच्या दृष्टीने अधिक जोमाने प्रयत्न केले.

**सदस्यत्व :**

कोणत्याही स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्रालाच राष्ट्रसंघाचे सदस्यत्व दिले जात असे. परंतु भारत हे परतंत्र राष्ट्र असूनही त्याला मूल सदस्य म्हणून स्वीकृती देण्यात आली होती, हे अपवादात्मक आहे.

भारताला राष्ट्रसंघाचे सदस्यत्व मिळवून देण्यामागे इंग्लंडचा दूरदर्शी-पणा होता. त्यामागे इंग्लंडची एक प्रकारे मुत्सद्देगिरीची भूमिका होती. लोकशाही राष्ट्र म्हणून पुढील काळात जरी भारत स्वतंत्र झाला तरी त्याने इंग्लंडच्या बाजूने राहावे ही भूमिका घेऊन भारतावर एक प्रकारे असे नैतिक बंधन पडेलच, अशी दृष्टी ठेवून इंग्लंडने भारताला राष्ट्रसंघाचे सदस्यत्व मिळवून दिले.

इंग्लंडने असे करण्याचे कारण स्पष्ट केले आहे. फक्त आता मुद्दा हा येतो की, अशी भूमिका इंग्लंडला का घ्यावी लागली? अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया यांसारखे देश इंग्लंडच्याच धर्माचे व वंशाचे असताना त्याच्यापासून स्वतंत्र झाले, तेथे भारतासारखा वंश आणि धर्माच्या दृष्टींनी सर्वस्वी वेगळा असलेला देश आपल्या कायमचा कह्यात राहणे शक्य नाही, हे इंग्लंडने जाणले. आणि भारताचा विरोध ओढवून घेण्यापेक्षा त्याला थोडी अधिक मोकळीक द्यावी, कारण भारत आज ना उद्या स्वतंत्र होण्याची धडपड करीलच, ही भीती इंग्रजांना वाटणे साहजिक होते. भारतात तशी चळवळही जोरात होती.

भारतास भौगोलिक, राजकीय व व्यापारदृष्ट्या महत्त्वाचे स्थान आहेच. इंग्रजांनी ईस्ट इंडिया कंपनीद्वारे व्यापारउद्योग आणि नंतर राज्यसत्ताही येथे प्रस्थापित केली होतीच. असा हा महत्त्वाचा देश उद्या स्वतंत्र झाल्यावर दुसऱ्या बड्या राष्ट्रांच्या मतप्रवाहाकडे झुकणे इंग्रजांच्या दृष्टीने धोक्याचे वाटले. तेव्हा या राष्ट्राने आपल्यापासून स्वतंत्र होऊनही आपल्या हातचे जाऊ नये, आपल्याच बाजूने राहावे ही मुत्सद्दीपणाची व दूरदर्शी भूमिका इंग्लंडने घेतली होती.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे एखाद्या प्रश्नावर मतदान घेतल्यास भारताचे मत ( Vote ) इंग्लंडच्या बाजूने एक अधिक ( Plus ) मत असे होई. म्हणून इंग्लंड एकच राष्ट्र असे होते की एकमत म्हणजे त्याच्याशी सहमत असलेली ( कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व दक्षिण आफ्रिका यांची ) सहा मते असे हुकमी प्रमाण बनले होते. त्यासाठी भारताचे मत मिळविणे हेही एक मुत्सद्दी धोरण इंग्लंडचे होते.

महायुद्धाच्या वेळी ज्या ज्या देशाचे सैनिक लढले त्या त्या देशांना राष्ट्रसंघात प्रतिनिधित्व दिले गेले. भारतादी ब्रिटिश साम्राज्यातील सैनिक

९८७६५

ब्रिटिश निशाणाखाली लढले. भारत हा स्वायत्त देश आहे असे समजूनच राष्ट्रसंघात त्याला सदस्यत्व देण्यात आले, हा दुसरा मुद्दा.

युद्धाच्या अखेरीस व्हर्सायच्या तहावर ज्या ज्या राष्ट्रांनी सह्या केल्या त्या त्या राष्ट्रांना राष्ट्रसंघाचे पदसिद्ध सदस्य मानले गेले. भारताने या तहावर सही केली होती म्हणून आपोआपच भारत पदसिद्ध सदस्य बनला.

राष्ट्रसंघाचे सदस्यत्व मिळाल्याने भारताचा कोणत्या दृष्टीने फायदा झाला ते थोडक्यात असे :–

*– जागतिक राजकारणात भारताची प्रतिष्ठा वाढली.

*– जगाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरलेल्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील सभा, आणि परिषदांमध्ये भारतीय तत्त्ववेत्त्यांना, राजकारणी मुत्सद्द्यांना वैचारिक बाजू मांडण्याची संधी लाभली.

*– ब्रिटिशांनी भारताविषयी पसरविलेले गैरसमज दूर करण्यास वाव मिळाला.

*– पुढील काळात ( U. N. ) संयुक्त राष्ट्रांचे सदस्यत्व आपोआपच मिळाले.

## राष्ट्रसंघ सभेत

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात, राष्ट्रसंघाचा सदस्य या नात्याने भारताचे स्थान काय होते हे संक्षेपाने येथे दिले आहे.

१९३७ साली आंतरराष्ट्रीय राजकारण अतिशय गुंतागुंतीचे झाले होते. अशा नाजूक प्रसंगी देखील राष्ट्रसंघाच्या सभासदांनी आगाखान या भारतीय व्यक्तीची राष्ट्रसंघाचे अध्यक्ष म्हणून निवड केली.

ग्रेट ब्रिटन ( U. K. )मधील इंडिया ऑफिस भारतातून राष्ट्रसंघाच्या बैठकीस गेलेल्या शिष्टमंडळाची कामे ठरवून देत असे. इतकेच नव्हे तर त्या मंडळातील नेमणुका देखील या इंडिया ऑफिसच्या कक्षेत होत्या. त्याचप्रमाणे शिष्टमंडळाचे धोरणदेखील कोणते व कसे असावे

हेही ठरवून दिले जात असे. भारतातील इंग्रज सरकारला केवळ शिष्टमंडळाच्या शिफारशीपुरतेच स्वातंत्र्य होते.

१९२० ते १९२९ या कालखंडात भारतीय शिष्टमंडळाचा प्रधान प्रतिनिधि हा इंग्लंडचाच असे. त्यामुळे प्रत्यक्षात त्या शिष्टमंडळाचे मत म्हणजे भारताचे मत नव्हते. ते इंग्लंडचे व इंग्लंडकारिताच एक अगाऊ मत ठरत असे. म्हणून या पद्धतीला भारतीय राष्ट्रीय नेत्यांनी विरोध केला. भारतीय प्रतिनिधि–मंडळाचा नायक व त्या मंडळातील सभासद भारताकडून निवडलेला असावा [ म्हणजे भारतीय जनतेची मान्यता ( Sanction ) असावी] व ते भारतीय नागरिक असावेत; असे मत व्यक्त करण्यात आले व काँग्रेस अधिवेशनात तसा ठराव घेण्यात आला. परिणामतः त्यानंतर राष्ट्रसंघाच्या शेवटपर्यंत शिष्टमंडळातील सर्व सभासद भारतीय असावेत यावर कटाक्षाने भर देण्यात आला.

राजकीय बाब सोडल्यास बाकीच्या बाबतींत व सर्व क्षेत्रांत भारतीय प्रतिनिधिमंडळाला आपले खरे मत मांडण्यास मुभा व स्वातंत्र्य होते.

१९२७ पासून काँग्रेसच्या प्रत्येक वार्षिक अधिवेशनामध्ये दर वर्षी राष्ट्रसंघाबाबत ठराव पास करण्यात आला आहे की 'युद्धाने कोणतेच प्रश्न सुटत नाहीत. वेळ पडल्यास बड्या राष्ट्राशीही तोंड देण्याचे सामर्थ्य राष्ट्रसंघात निर्माण झाले पाहिजे. राष्ट्रसंघाचे सर्वांत महत्त्वाचे व पहिले कर्तव्य, परतंत्र देशांनी वसाहतीचे स्वातंत्र्य ( Dominion Status ) देण्याचे, प्रयत्न करणे हेच असले पाहिजे.'

राष्ट्रसंघाच्या मर्यादित अधिकारांत वाढ करून त्याला खऱ्या अर्थाने जागतिक स्वरूप प्राप्त व्हावे असे भारताचे धोरण राष्ट्रसंघाच्या वेळीही होते. जगातील सर्व राष्ट्रे या संघाची सभासद असावीत ही भारताची तीव्र इच्छा होती. पण भारत स्वतःच परतंत्र असल्यामुळे भारतीय प्रतिनिधींना या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर आपली मते मांडण्याचे खरेखुरे

स्वातंत्र्य नव्हते. त्याच्या मतप्रदर्शनावर त्यामुळे मर्यादा पडली होती. ही एक बाब वगळल्यास इतर क्षेत्रांत आपली कर्तबगारी दाखविण्यास भारतीय शिष्टमंडळास बराच वाव होता. विशेषतः हे शिष्टमंडळ जागतिक शांततेच्या मूलभूत तत्त्वांचा सखोल विचार करणारे होते. याव्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक धोरणांचा प्रामुख्याने हिंदी शिष्टमंडळ विचार करीत असे.

राष्ट्रसंघ सभेने वर्गणीचे दर ठरविताना, भारताचा समावेश औद्योगिक दृष्ट्या महत्त्वाच्या अशा पहिल्या आठ राष्ट्रांत केला व वर्गणीचा दर ( १९३७-३९ च्या दरम्यान ) ४९ एकक ( units ) म्हणजे एखाद्या बड्या राष्ट्राइतका लावला. वास्तविक ही वर्गणी दुसऱ्या राष्ट्राशी तुलनात्मक दृष्ट्या जास्त होती. राष्ट्रांच्या आर्थिक ( ability ) योग्यतेच्या दृष्टीनेही समानतेवर आधारलेली नव्हती. ही वर्गणी अर्थातच वाजवीपेक्षा जास्त लादली गेली होती.

## राष्ट्रसंघ–समिती व भारत

राष्ट्रसंघाच्या समितीत भारताला महत्त्वाचे स्थान मिळाले नाही. या समितीमध्ये बडी राष्ट्रे कायम सभासद होती. त्याउलट काही लहान राष्ट्रे हंगामी तसेच अस्थायी सदस्य असत. हंगामी सदस्यांना राष्ट्रसंघ सभा निवडून देत असे. भारताचे स्थान व महत्त्व लक्षात घेता त्याला कायम सदस्यत्व मिळणे न्यायाचे ठरले असते. पण स्वतःच्या पारतंत्र्यामुळे राष्ट्रसंघ–समितीवर भारताला कधीही जागा मिळाली नाही.

### सचिवालय

राष्ट्रसंघाचा प्रमुख सचिव हा नेहमी फ्रान्स अथवा इंग्लंडचा असावयाचा व सचिवालयाच्या कर्मचाऱ्यांमध्ये इंग्लिश व फ्रेंच लोकांचा विशेष भरणा असे. त्यांत भारतीयांना फारसा शिरकाव नसे.

## आंतरराष्ट्रीय कामगार संघटना

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या क्षेत्रात मात्र भारतास फार चांगला वाव मिळाला. भारतास औद्योगिक दृष्ट्या पहिल्या आठ क्रमांकात समाविष्ट केल्यामुळे त्याला आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेत एक प्रमुख स्थान प्राप्त झाले. तो तेंव्हापासून त्या संस्थेत सहभागी आहे.

या संघटनेने कामगारजीवनाशी संबंधित कार्य केले. बेकारीनिवारण, आजार, रोगराई, अपघात, वृद्धापकाळातील तरतुदी, स्त्रिया व मुलांकरिता कार्य, तांत्रिक शिक्षण व सुट्ट्या, मजुरांच्या अवस्थेत सुधारणा, वेतन, मजुरांचे संरक्षण, इत्यादी क्षेत्रांतहि भरीव कार्य केले.

या संघटनेच्या प्रयत्नामुळे भारतातील बालकांच्या परिस्थितीत इष्ट व योग्य अशी सुधारणा करण्यात आली. उदाहरणार्थ, मुलांचे कामाचे तास कमी करण्यात आले. त्याचप्रमाणे अगदी लहान मुलांकडून पूर्वी जसे काम घेण्यात येत असे ते या संघटनेच्या प्रयत्नामुळे अजीबात बंद झाले. एवढे असूनहि या क्षेत्रात बरेच कार्य करावयाचे अजून बाकी राहिले आहे.

१९२५ साली जिनेव्हा येथे भरलेल्या कॉन्फरन्समध्ये भारतीय शिष्टमंडळाच्या एका प्रवक्त्याने भारतीय श्रमजीवी वर्गातील कामगारांचे हलाखीचे दैनंदिन जीवन आणि येथील बालमृत्यूची संख्या, या दुःखद गोष्टीकडे कोणत्याही प्रगत राष्ट्रांचे लक्ष गेले नाही, * असे निवेदन केले.

संस्थापक–सभासद या नात्याने राष्ट्रसंघात भारताच्या प्रवेशास मान्यता मिळाल्यामुळे, त्यास आपले राष्ट्रसंघाच्या शाखा व उपशाखांसंबंधीचे कर्तृत्व दाखविण्यास वाव मिळाला.

---

* P. J. Noel Baker the League of Nations at work, 1926 Pub., P. 86.

इ. स. १९२७ व १९३२ या दोन वेळा सर अतुल चतर्जी या भारतीय सद्गृहस्थास आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे अध्यक्ष म्हणून मान मिळाला. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे सभासदत्व भारताला मिळाल्यामुळे भारतातील कामगार चळवळीला विशाल स्वरूप प्राप्त झाले आणि परिणामतः पुढील दहा वर्षांत कामगार कायद्याच्या स्वरूपात हितवह असे अनेक बदल घडून आले.

## आंतरराष्ट्रीय वचारिक सहकार मंडळ ( Intellectual Cooperation )

आंतरराष्ट्रीय वैचारिक सहकार मंडळाच्या स्थापनेमध्ये भारताचा फार मोठा वाटा आहे. राष्ट्रसंघाला सुरुवातीस या वैचारिक मंडळामुळे राष्ट्राराष्ट्रांतील वैचारिक संघर्ष कमी होतील, ही कल्पना पटली नाही. परंतु भारताच्या सतत आग्रहामुळे राष्ट्रसंघास, आंतरराष्ट्रीय वैचारिक सहकार मंडळ स्थापनं करणे भाग पडले. या मंडळामुळे राष्ट्राराष्ट्रांतील वैचारिक संघर्ष कमी झाले. श्री. जगदीशचंद्र बोस व डॉ. राधाकृष्णन् हे दोघे भारतीय, या मंडळाच्या १६ सभासदांपैकी सदस्य होते. आंतरराष्ट्रीय बौद्धिक महकार्यात भारतीय शिष्टमंडळ हिरीरीने भाग घेत असे.

## निर्वासित व युद्धकैदी ( High Commission )

यांच्या बाबतीत भारताने मांडलेले मुद्दे राष्ट्रसंघाला मान्य झाले तसेच १९३१ साली महापुरामुळे चीनची जी हानी झाली तिच्या परिहारार्थ सर्व आशियाई राष्ट्रांनी चीनला साह्य करावे ही श्रीयुत मित्रा या भारतीय प्रतिनिधीने केलेली विनंती मान्य करण्यात आली.

## ब्रूस रिपोर्ट ( Bruce Report )

आर्थिक व सामाजिक विषमतेचे निर्मूलन हा जागतिक सुरक्षिततेचा कणा आहे; हे बहुमोलाचे तत्त्व भारतीय प्रतिनिधी सर सी. पी. राम-

स्वामी यांनी १९२७ मध्ये जिनेव्हा येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेत मांडले. सॅनफ्रॅन्सिस्को येथे भरलेल्या या शाखेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष भारताचे रामस्वामी मुदलीयार होते.

भारतीय प्रतिनिधींनी प्रयत्न केल्यानुसार आंतरराष्ट्रीय पातळीवरून आर्थिक मंदीच्या भयानक लाटेसंबंधी सखोल अभ्यास व्हावा, हे तत्त्व सर्वांना मान्य होऊन त्या दिशेने प्रयत्न करण्यात आले.

आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक समस्यांकडे संपूर्णतया सतत लक्ष द्यावे हे, मत सतत १९ वर्षे भारत पुनःपुन्हा मांडीत आला, आणि शेवटी ते सर्वांना मान्य झाले. परिणामतः १९३९ मध्ये सर ब्रूसच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या कमिटीने एक स्वतंत्र आर्थिक व सामाजिक मंडळ स्थापन करण्याची शिफारस केली. हल्लीच्या ( U. N. ) संयुक्त राष्ट्रांची आर्थिक व सामाजिक मंडळ याची रचना ब्रूसच्या योजनेवरच अधारलेली आहे.

## मादक पदार्थांच्या व्यापारावर निर्बंध

पहिल्या महायुद्धानंतर जगातील सर्वच देशांत मादक पदार्थांचे उत्पन्न व उपयोग फारच वाढले. काही राष्ट्रांनी त्यांच्या उत्पादनावर निर्बंध घालून देखील त्याचे सेवन चालूच राहिले.

मादक पदार्थांच्या विरोधकांमध्ये भारत देशाने प्रामुख्याने भाग घेतला होता. जिनेव्हा येथे इ. स. १९२५ व १९३१ मध्ये जी आंतरराष्ट्रीय परिषद भरविण्यात आली तीत मादक पदार्थांविरुद्ध करार सर्वमान्य करून घेण्यात भारताचा फार मोठा वाटा होता.

## आरोग्य संस्था ( Healtch Organization )

राष्ट्रसंघाची आरोग्य संस्था ही महत्त्वपूर्ण कार्यसंस्था ठरली. या संस्थेच्या कार्यक्षेत्रात भारतास वाव मिळाला व भारताचा फायदाही मोठ्या प्रमाणात झाला.

जिनेव्हा आणि जपान येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय आरोग्य परिषदेला भारताचे प्रतिनिधी डॉ. सौझा हे गेले होते.

राष्ट्रसंघाच्या आरोग्य संस्थेने फार मोठी कामगिरी केली. सिंगापूर येथे एक खास कार्यालय स्थापन करण्यात आले. त्यात भारतीय प्रतिनिधीची निवड केली गेली. या प्रतिनिधीच्या आग्रहास्तव पाश्चिमात्य राष्ट्रांनी धन आणि ज्ञान या दोन्ही साधनांनी मलेरियासारख्या साथीच्या रोगावर उपाय शोधून इतर देशांप्रमाणे भारतालाही त्याचा फायदा मिळवून दिला.

१९२५ नंतर या समितीने सार्वजनिक आरोग्याकडे संपूर्णतया लक्ष पुरवून विनयनकेंद्रे स्थापन केली, आणि परिसंवादाच्या द्वारे इतर देशांप्रमाणे भारतालाही सक्रिय मदत दिली. तज्ज्ञाचा सल्ला, औषधे व वैद्यकीय मदत यांद्वारे साथींच्या रोगापासून भारताला मुक्त करण्याचा प्रयत्न केला.

●●●

# समारोप १०

जागतिक शांततेसाठी जागतिक शासनाची निकड जगाला विसाव्या शतकात भासू लागली. तसे पाहता शांततेच्या तत्त्वाचा भारताने पूर्वीपासून पुरस्कार केला आहे. वसुधैव कुटुंबकम् ही कल्पना प्राचीन भारतीय साहित्यात व तत्त्वज्ञानात आढळते. आधुनिक जगाला या गोष्टीची तीव्रतेने जाणीव झाली ती पहिल्या महायुद्धानंतरच. या वेळी या राजकीय नेत्यांना, मुत्सद्यांना या कल्पनेने आकर्षिले. या कल्पनेला मूर्त स्वरूप आणण्याच्या दृष्टीने केलेला एक प्रयत्न म्हणजे राष्ट्रसंघ.

राष्ट्रसंघ ही संस्था ज्या गतीने स्थापन झाली, जेवढ्या लवकर तिने आकार घेतला तेवढ्याच गतीने ती मोडकळीस आली. ही संस्था टिकली असती, त्यात सुधारणा होत जाऊन काही भरीव निष्पन्न झाले असते, तर दुसऱ्या पर्यायी संस्थेची आवश्यकताही भासली नसती. तिच्या अंगभूत दोषामुळे राष्ट्रसंघाचा विलय अपरिहार्य ठरला. तरीही एवढे मात्र म्हणता येईल की राष्ट्रसंघ अस्तित्वात असेपर्यंत या संस्थेद्वारे झालेले कार्य चिरस्मरणीय आहे. ही संस्था लयाला गेल्यानंतर लवकरच दुसरी पर्यायी संस्था म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाची उभारणी झाली. राष्ट्रसंघ या संस्थेचे पुनरुज्जीवन मात्र झाले नाही. एवढेच काय, जेव्हा ( U. N. ) संयुक्त राष्ट्रसंघटनेचा मसुदा तयार करण्यास मंडळ बसले तेव्हा या मंडळातील काही सभासदांकडून राष्ट्रसंघ या

संस्थेचा पुनरुच्चार करण्यास देखील विरोध झाला. संयुक्त राष्ट्रांच्या उभारणीचा पाया मात्र राष्ट्रसंघाच्या मूळ कल्पनेतूनच भरला गेला.

राष्ट्रसंघ ही संस्था लयाला गेली पण आपले अस्तित्व या संस्थेला टिकवता आले नसते का? कशामुळे ही आपत्ती ओढवली? याचा संक्षेपाने विचार केल्यास काही प्रमुख दोष स्पष्ट दिसून येतात. उदाहरणार्थ, कोणत्याही राष्ट्राराष्ट्रांत निर्माण झालेला संघर्ष मिटविण्याचे काम व अधिकार स्वतःकडे घेतल्यानंतर राष्ट्रसंघानेच ते बघावयास पाहिजे होते. अशा वेळी ज्यांच्यात संघर्ष आहे त्या राष्ट्रांना आपापल्या शस्त्रबळावर आपसांतील संघर्ष मिटविण्याची मुभा दिली नसती तर राष्ट्रसंघाला ही आपत्ती टाळता आली असती.

सार्वत्रिक शांतताप्रस्थापनेचे ध्येय बाळगणाऱ्या या संस्थेला बलाढ्य राष्ट्रांच्या विरुद्ध उपाययोजना करता येत नव्हती व त्यांच्यामुळे निर्माण झालेले संघर्ष मिटविता येत नव्हते. म्हणून शांतता प्रस्थापन करण्याच्या कामी राष्ट्रसंघाची यंत्रणा कुचकामी ठरली. हे मोठे वैगुण्य होय. कोणतीही संघटना यशस्वी होण्यासाठी सर्व सभासदांचा विचार व आचार या दोन्हीही बाबत किमान एकवाक्यता व एकमत आवश्यक असते; हे राष्ट्रसंघात घडले नाही. तसेच राष्ट्रसंघ ही जगातील संपूर्ण राष्ट्रांची संघटना समजली जात नसे. बरीचशी राष्ट्रे त्याची सभासद नव्हती. यामुळे सर्व जगातील विचारांचे मंथन होऊन त्यातून सामुदायिक, विश्वव्यापी विचारप्रवाह ( General will of the People of the world ) निर्माण होऊ शकला नाही. यावरून जागतिक शांतता प्रस्थापनेच्या योजनेचा अर्धा भाग पक्का आणि अर्धा कच्चा असल्याचे जाणवते. हा देखील या संघटनेच्या वैगुण्याचा दुसरा पुरावा होय.

आपल्या कक्षेत येणाऱ्या तंट्याचाच निवाडा कायम आंतरराष्ट्रीय न्यायालय देऊ शकत असे. पण तीन महिन्यांची नोटिस दिल्यानंतर राष्ट्रसंघाच्या कक्षेतील एखादे राष्ट्र वादग्रस्त प्रश्न आपल्या मताने सोडविण्यासाठी युद्ध करी आणि त्यामुळे शांतताप्रस्थापनेच्या ध्येयास आपोआपच तडा जाई. अशा रीतीने ज्या उद्देशाने योजना आखली त्या योजनेस अर्थ उरला नाही.

शांतता प्रस्थापित करावयाची असल्यास निःशस्त्रीकरण करणे आवश्यक आहे. राष्ट्रसंघाच्या सनदेत निःशस्त्रीकरणाबाबत अनेक तरतुदी करून ठेवलेल्या होत्या. त्यात एक स्वतंत्र आभिलेख शस्त्रकपात सुचविणारा होता. परंतु त्यात खऱ्या निःशस्त्रीकरणावर भर दिलेला नव्हता आणि त्याप्रमाणे वेळोवेळी निःशस्त्रीकरणाबाबत अधिवेशने भरविण्यात आली होती. पण संकल्पित योजनांना म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. याउलट जेते राष्ट्र हे संपूर्ण शस्त्रधारी असावे, असे अपेक्षिले जात होते.

जागतिक सुरक्षितता ही, व्यापार, औद्योगिक धंदे, कारखाने, इत्यादिकांसंबंधी योग्य आर्थिक उपाययोजना; आणि लोकसंख्या राज्यस्थलांतर ( migration ) वगैरे सामाजिक समस्यांचे निराकारण यावर अवलंबून असते. वर दर्शविल्याप्रमाणे, आजच्या आधुनिक काळातील युद्धसंघर्षाचे मूळ आर्थिक आणि सामाजिक विषमतेत रुजलेले आहे. परंतु या बाबींसारख्या महत्त्वाच्या राष्ट्रसंघाच्या सनदेमध्ये कोणत्याही प्रकारची तरतूद नव्हती.

काही राष्ट्रे एकीकडे शांततेचा उद्घोष करीत असताना दुसरीकडे गुप्तपणे युद्धाची सिद्धता करीत होती. युद्धोपयोगी सर्व शक्तींचा गुप्त-

पणेच विकास करीत होतो. या हालचालींची माहिती मिळविण्याची संघाकडे कोणतीही यंत्रणा नव्हती. जर एखाद्या राष्ट्राची स्थिती दुसऱ्या राष्ट्रापेक्षा औद्योगिक क्षेत्रात, शक्तीच्या साधनात किंवा लोकसंख्या अथवा इतर कोठल्याही क्षेत्रात प्रगतिपथावर असेल तर राष्ट्रसंघाजवळ या नव्या प्रगत स्थितीचे मोजमाप करणारी यंत्रणा नव्हती. त्यामुळे नव्या बदलत्या स्थितीचा राष्ट्रसंघाला केव्हाच मेळ बसविता आला नाही. या कारणाने रशिया व जर्मनी यांना राष्ट्रसंघ सोडावा लागला. राष्ट्रसंघाच्या अपयशात या कारणाचा वाटा फार मोठा आहे.

जागतिक सुरक्षितता ही शेवटी जागतिक शांतता टिकविणाऱ्या राष्ट्रांच्या योग्यतेवर व त्यांच्या बौद्धिक पातळीवर आधारित असे.

फक्त एवढेच म्हणता येईल की जे ध्येय राष्ट्रसंघाने निश्चित केले होते ते जरी गाठता आले नाही तरी त्या ध्येयाची पुसटशी काहीअंशी कल्पना मात्र जगाला राष्ट्रसंघामुळे झाली.

राष्ट्रसंघ अपयशी ठरला असला तरी त्याने केलेल्या भरीव कामगिरीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. चर्चा व तद्वारे काही भरीव कार्यवाही करणारी कार्यक्षम प्रातिनिधिक संस्था म्हणून राष्ट्रसंघाचा उल्लेख करावासा वाटतो. राष्ट्रसंघाने किरकोळ समस्येपासून ते मोठ्या संघर्षापर्यंतच्या प्रकारांची सोडवणूक करण्याची जी पद्धती अमलात आणली त्यावरून तिने थोड्या वेळात प्रशंसनीय कामगिरी केल्याचे स्पष्ट होते. ‘ विश्वात्मकता ’ निर्माण करण्यासाठी राष्ट्रसंघाने जे काही प्रयत्न सुरू केले होते. ते आशादायक असल्यामुळे भावी काळाच्या दृष्टीतून त्याला

फार महत्व प्राप्त झाले आहे. * राष्ट्रसंघ या निश्चित संघटनेमुळे भावी काळात आंतरराष्ट्रीय तंटे न्याय, सामंजस्य आणि विवेकतेने सोडविण्याची निश्चित दिशा जगाला समजली व यामुळे जगाच्या इतिहासाचे एक नवीन पर्व सुरू झाले.

---

* " The League of Nations Collapsed because of its unsound stiucture, but its defeat was temporary. It's essential spirit will be reborn, and will triumph in an other world federation that embodies its principle—the supremacy of a Law of nations over the anarchy of individual nations Here is the meaning of the titanic struggle between the eternal Wilsons and the perennial Hitlers, "—Elv culbertson, Authority on contract Bridge. Summary of the World Federation Plan, P. 6–7, Garden city Pub. Co., Garden city New York, 43

" ......... The Utopia of one century is the reality o its successor, " Harold J. Laski, A Grammar of Politics, P. 661, 1929 Publication.

*राष्ट्रसंघाच्या आरोग्यसंस्थेचे रूपांतर जागतिक आरोग्य संघटनेत झाले आणि राष्ट्रसंघाच्या आहारविषयक मंडळाचे रूपांतर संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न व शेतकीविषयक संघटनेत झाले. वैचारिक सहकार मंडळाचे रूपांतर संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संस्थेत झाले. राष्ट्रसंघाच्या उच्चाधिकार समितीचे ( High Commissioner ) रूपांतर निर्वासितांकरिता संयुक्त राष्ट्रांचे हायकमिशनर मध्ये झाले. परंतु मादक पदार्थांवरील नियंत्रणाचे कार्य पूर्वीप्रमाणेच चालू राहिले. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेला संयुक्त राष्ट्रांचे उपांग म्हणून मान्यता देण्यात आली. दळणवळण व वाहतूक संघटना संयुक्त राष्ट्रांकडून चालू राहिली. १९३९ मधील राष्ट्रसंघाचे आर्थिक व सामाजिक केंद्रीय मंडळाचे रूपांतर संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक व सामाजिक मंडळात झाले.

# राष्ट्रसंघ व संयुक्त राष्ट्रे यांची तुलना १ १

| राष्ट्रसंघ | संयुक्त राष्ट्रे |
|---|---|
| [ १ ] पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाची स्थापना झाली. | [ १] दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्राची स्थापना झाली. |
| [ २ ] राष्ट्रसंघाची सनद ही व्हर्सायच्या तहाचा एक भाग होती. | [२]संयुक्त राष्ट्राची सनद स्वतंत्र होती. दुसरे महायुद्ध संपण्यापूर्वीच ती तयार झाली होती. |
| [ ३ ] राष्ट्रसंघाच्या सनदेची कलमे एकूण २६ होती. | [ ३ ] संयुक्त राष्ट्राच्या सनदेची कलमे एकूण १११ आहेत. |
| [ ४ ] राष्ट्रसंघाच्या सनदेतील कलमांवर पुनर्विचार करण्याच्या बाबतीत कसलीच तरतूद नव्हती. | [४] संयुक्त राष्ट्राच्या सनदेतील कलमावर पुनर्विचार करण्याची तरतूद आहे. |
| [ ५ ] राष्ट्रसंघाच्या सनदेत निःशस्त्रीकरणावर जास्त जोर देण्यात आला होता. | [ ५ ] संयुक्त राष्ट्राच्या सनदेत निःशस्त्रीकरणावर कमी जोर देण्यात आला आहे. |
| [६] राष्ट्रसंघाचे कार्यक्षेत्र मर्यादित होते. फक्त राजकीय पेचप्रसंगाबाबतच राष्ट्रसंघ क्रियाशील होता. राष्ट्रसंघाचे कार्य तीन प्रमुख अंगांद्वारेच होत असे. [ मात्र अगदी अंतिम काळात फक्त १९३९ मध्ये आर्थिक व सामाजिक कार्याच्या | [ ६ ] संयुक्त राष्ट्राचे कार्यक्षेत्र विस्तृत आहे. संयुक्त राष्ट्राने केवळ राजकीयच नव्हेत तर त्याबरोबर सामाजिक, व आर्थिक समस्या सोडविण्याचेही कार्य हाती घेतले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्य प्रमुख सहा अंगांद्वारे केले जात आहे. |

दृष्टीने ठोस अहवाल सादर करून या कार्याकडे लक्ष वेधले होते. ]

[ ७ ] विश्वराज्याच्या प्रस्थापनेच्या दृष्टीने राष्ट्रसंघाने पाऊल उचललेले नव्हते; किंवा त्या बाबतीत राष्ट्रसंघाला स्वारस्यही नव्हते.

[७] संयुक्त राष्ट्राने मात्र विश्वराज्याच्या स्थापनेची कल्पना उचलून धरली व त्या दृष्टीने प्रयत्नही चालू ठेवले आहेत.

[८] राष्ट्रसंघाने जागतिक शांततेसाठी राष्ट्रांच्या अंतर्गत प्रश्नामध्ये कधीही हस्तक्षेप केला नाही.

[८] संयुक्त राष्ट्रांनी जागतिक शांततेसाठी का होईना परंतु राष्ट्रांच्या अंतर्गत प्रश्नामध्ये हस्तक्षेप केला आहे.

[ ९ ] राष्ट्रसंघामध्ये सदस्यत्वाचा राजीनामा देण्याची तरतूद होती.

[ ९ ] संयुक्त राष्ट्रांची सनद, सदस्यत्वाच्या राजीनाम्याबाबत स्तब्ध आहे.

[१०] राष्ट्रसंघाची सनद मर्यादित होती. या सनदेत समिती व सभा यांतील फरक स्पष्ट व तपशीलवार देण्यात आला नव्हता.

[१०] संयुक्त राष्ट्रांची सनद मुद्देसूद आणि विस्तृत पायावर आधारलेली आहे. आमसभा व सुरक्षा-समिती यांतील फरक स्पष्ट व तपशीलवार आहे.

[११] कोणत्याही दोन राष्ट्रांतील (Declared war) प्रकट युद्ध आणि आक्रमण ( Aggression ) यांतील फरक राष्ट्रसंघाच्या सनदेत स्पष्ट केलेला नव्हता.

[११] संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत प्रकट युद्ध आणि आक्रमण या बाबतीत फरक स्पष्ट केलेले आहेत.

[१२] राष्ट्रसंघाचे पालकत्व मंडळ (Mandate) केवळ वादग्रस्त प्रदेशांचे प्रश्न सोडविण्याकरिताच स्थापन केले जाई व त्यात आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या तज्ज्ञांचा समावेश

[१२] संयुक्त राष्ट्रांच्या विश्वस्त मंडळाच्या कार्यक्षेत्रात पालक मंडळाचे ( Mandate ) प्रदेश दुसऱ्या महायुद्धातील शत्रुराष्ट्रांचे प्रदेश, व स्वेच्छेने प्रवेश घेऊ इच्छिणारे प्रदेश

असे. त्यात संबंधित राष्ट्राचे प्रतिनिधित्व असावे, अशी कोणतीही खबरदारी यांच्या रचनेच्या वेळी घेतली जात नसे. शिवाय राष्ट्रसंघ सनदेत पालक (M adnate) मंडळाच्या रचनेचे फक्त एकच कलम होते.

[१३] राष्ट्रसंघाच्या सनदेत लोकशाही तत्त्वाला कमी प्राधान्य होते. सनदेची सुरुवात– ( 'The High Contiacting Partiers)–' म्हणजे करार करणाऱ्या उच्चाधिकारी पक्षांनी–"अशा प्रकारची होती.

[१४] राष्ट्रसंघाच्या प्रत्येक सदस्यराष्ट्रास स्वयंनिर्णयाचा हक्क होता. म्हणजेच ( Veto ) नकाराधिकार प्रत्येक सदस्य राष्ट्र वापरू शकत होते.

[१५]सभा व समिती(Council) या राष्ट्रसंघाच्या दोन्ही प्रमुख अंगांतील निर्णय एकमताने घेतले गेले पाहिजेत असे बंधन होते.

[१६] कायम आंतरराष्ट्रीय न्यायालय हे राष्ट्रसंघाचे उपांग मानले जात असे.

[१७] राष्ट्रसंघाच्या प्रमुख सचिवाचे अधिकार मर्यादित होते.

यांचा समावेश होतो. याशिवाय विश्वस्तमंडळ असल्या प्रदेशाची पाहणी करते. तक्रारींची छाननी करते. म्हणजे ( administering state) कारभारी सरकार विश्वस्त प्रदेशाबाबत संयुक्त राष्ट्रसंघटनेला जबाबदार आहे.

[१३] संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत लोकशाही तत्त्वाला विषेश प्राधान्य दिले आहे. सनदेची सुरुवात " We the Peocle of United Nations" आम्ही संयुक्त राष्ट्रांची जनता " अशा प्रकारे आहे.

[१४] संयुक्त राष्ट्रात प्रत्येक सदस्य-राष्ट्रास (Veto) नकाराधिकाराचा हक्क नाही. तो हक्क फक्त पांच बड्या राष्ट्रांपुरताच मर्यादित आहे.

[१५]आमसभा व सुरक्षासमिती या दोन्ही प्रमुख अंगातील निर्णय एकमताने घेतले पाहिजेत असे बंधन नाही.

[१६] आंतरराष्ट्रीय न्यायालय संयुक्त राष्ट्रांचे प्रमुख अंग ठरविण्यात आले आहे.

[१७] संयुक्त राष्ट्राच्या प्रमुख सचिवाचे अधिकार विस्तृत करण्यात आलेले आहेत.

[१८] राष्ट्रसंघास जागतिक मान्यता लाभलेली नव्हती. कारण– त्या वेळी अमेरिका, रशियासारखी राष्ट्रे या संघटनेबाहेर होती. त्यात फक्त युरोपीय राष्ट्रांचा प्रभाव होता आफ्रो-आशियाई राष्ट्रांचे तेवढेसे प्रतिनिधित्व नव्हते.

[१९] शांतता प्रस्थापित करण्यासाठी लष्करी सामर्थ्याचा वापर करून हस्तक्षेप करण्याचा अधिकार राष्ट्रसघाला नव्हता- त्यामुळे लष्करी खर्चाचा वाटा उचलण्याची जबाबदारी कोणत्याही सदस्य राष्ट्रावर नव्हती.

[२०] राष्ट्रसंघाच्या सनदेत राष्ट्रांच्या वैयक्तिक व सामुदायिक संरक्षणाबाबत विशेष स्पष्टीकरण केले नव्हते.

[२१] SEATO, NATO सारखे सामुदायिकसंरक्षणाचे करार करण्यास राष्ट्रसंघाच्या सनदेत फारच कमी प्रमाणात वाव होता.

[१८] संयुक्त राष्ट्रांत सर्वच बडी व इतरही राष्ट्रे सामील आहेत. व म्हणून त्याला जागतिक मान्यता लाभली आहे. आफ्रो–आशियाई राष्ट्रांचेही प्रतिनिधीत्व वाढून त्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

[१९] संयुक्त राष्ट्रच्या सनदेत लष्करी सामर्थ्य वापरण्याची व हस्तक्षेप करण्याची तरतूद करण्यात आली आहे. या लष्करी खर्चाचा वाटा प्रत्येक सदस्य राष्ट्राने उचलणे आवश्यक ठरविले आहे.

[२०] संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत प्रत्येक राष्ट्राला वैयक्तिक व सामुदायिकरीत्या संरक्षणाचा हक्क देण्यात आला आहे; व हे संरक्षण सुरक्षा समितीच्या प्रत्यक्ष हस्तक्षेपापर्यंत प्रत्येक राष्ट्रास मिळविता येते.

[२१] संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत प्रादेशिक संरक्षणाचे SEATO, NATO सारखे करार करण्यास संपूर्ण मुभा आहे.

[२२] राष्ट्रसंघात सभा व समिती यांच्या अधिकाराबाबत व कार्यपद्धतीबाबात कोणतेही स्पष्टीकरण नव्हते व विशिष्ट कार्यपद्धतीची चाकोरी ठरवून देण्यात आली नव्हती.

[२२] संयुक्त राष्ट्रांत आम सभा व सुरक्षा-समिती यांच्या कार्यांचे स्वरूप व्यापक व विस्तृत करून व्यावहारिक चाकोरी घालून देण्यात.आली आहे. उदाहरणार्थ, प्रमुख सचिवाने आमसभेला वार्षिक कार्यवृत्तान्त व अहवाल सादर करावा असे बंधन घालण्यात आले आहे.

**—: साम्य :—**

(२३) राष्ट्रसंघ व संयुक्त राष्ट्रे दोन्ही एकाच उद्देशाने स्थापन झाले आहेत. आर्थिक, सामाजिक, राजकीय विषमता तसेच अज्ञान व गैरसमजुतीमुळे जी युद्धे होऊ शकतात त्या युद्धांची बीजे नष्ट करण्याच्या दृष्टीने राष्ट्रसंघ व संयुक्त राष्ट्रे दोघेही प्रयत्नशील राहिले.

(२४) दोन्ही संघटनांनी राष्ट्रीय सार्वभौमत्वाचा मान राखला व समानतेच्या तत्त्वास उचलून धरले.

* * *

[१८] राष्ट्रसंघास जागतिक मान्यता लाभलेली नव्हती. कारण– त्या वेळी अमेरिका, रशियासारखी राष्ट्रे या संघटनेबाहेर होती. त्यात फक्त युरोपीय राष्ट्रांचा प्रभाव होता आफ्रो-आशियाई राष्ट्रांचे तेवढेसे प्रतिनिधित्व नव्हते.

[१८] संयुक्त राष्ट्रांत सर्वच बडी व इतरही राष्ट्रे सामील आहेत. व म्हणून त्याला जागतिक मान्यता लाभली आहे. आफ्रो–आशियाई राष्ट्रांचेही प्रतिनिधीत्व वाढून त्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

[१९] शांतता प्रस्थापित करण्यासाठी लष्करी सामर्थ्याचा वापर करून हस्तक्षेप करण्याचा अधिकार राष्ट्रसघाला नव्हता- त्यामुळे लष्करी खर्चाचा वाटा उचलण्याची जबाबदारी कोणत्याही सदस्य राष्ट्रावर नव्हती.

[१९] संयुक्त राष्ट्रच्या सनदेत लष्करी सामर्थ्य वापरण्याची व हस्तक्षेप करण्याची तरतूद करण्यात आली आहे. या लष्करी खर्चाचा वाटा प्रत्येक सदस्य राष्ट्राने उचलणे आवश्यक ठरविले आहे.

[२०] राष्ट्रसंघाच्या सनदेत राष्ट्रांच्या वैयक्तिक व सामुदायिक संरक्षणाबाबत विशेष स्पष्टीकरण केले नव्हते.

[२०] संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत प्रत्येक राष्ट्राला वैयक्तिक व सामुदायिकरीत्या संरक्षणाचा हक्क देण्यात आला आहे; व हे संरक्षण सुरक्षा समितीच्या प्रत्यक्ष हस्तक्षेपापर्यंत प्रत्येक राष्ट्रास मिळविता येते.

[२१] SEATO, NATO सारखे सामुदायिकसंरक्षणाचे करार करण्यास राष्ट्रसंघाच्या सनदेत फारच कमी प्रमाणात वाव होता.

[ २१ ] संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत प्रादेशिक संरक्षणाचे SEATO, NATO सारखे करार करण्यास संपूर्ण मुभा आहे.

[२२] राष्ट्रसंघात सभा व समिती यांच्या अधिकाराबाबत व कार्यपद्धतीबाबात कोणतेही स्पष्टीकरण नव्हते व विशिष्ट कार्यपद्धतीची चाकोरी ठरवून देण्यात आली नव्हती.

[२२] संयुक्त राष्ट्रांत आम सभा व सुरक्षा-समिती यांच्या कार्यांचे स्वरूप व्यापक व विस्तृत करून व्यावहारिक चाकोरी घालून देण्यात.आली आहे. उदाहरणार्थ, प्रमुख सचिवाने आमसभेला वार्षिक कार्यवृत्तान्त व अहवाल सादर करावा असे बंधन घालण्यात आले आहे.

## —: साम्य :—

(२३) राष्ट्रसंघ व संयुक्त राष्ट्रे दोन्ही एकाच उद्देशाने स्थापन झाले आहेत. आर्थिक, सामाजिक, राजकीय विषमता तसेच अज्ञान व गैरसमजुतीमुळे जी युद्धे होऊ शकतात त्या युद्धांची बीजे नष्ट करण्याच्या दृष्टीने राष्ट्रसंघ व संयुक्त राष्ट्रे दोघेही प्रयत्नशील राहिले.

(२४) दोन्ही संघटनांनी राष्ट्रीय सार्वभौमत्वाचा मान राखला व समानतेच्या तत्त्वास उचलून धरले.

***

# परिशिष्ट १ ले

## राष्ट्रसंघ सनद (Covenant)

आंतरराष्ट्रीय शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने, प्रमुख राष्ट्रांनी एकत्रित येऊन राष्ट्रसंघाची सनद (Covenant) तयार केली. युद्धे थांबविण्याकरिता किंबहुना युद्धाची कारणे समूळ नष्ट करण्याकरिता "राष्ट्रसंघ" या संस्थेची स्थापना करण्यात आली. सनद सारांशरूपाने खालीलप्रमाणे आहे :

राष्ट्रसंघाच्या सनदेची जी कलमे आहेत त्यात क्रमांक १ पासून ते ७ पर्यंत सभासदत्वाच्या अटी व संघटनेचे कार्यात्मक वर्णन आहे. त्या नंतर क्रमांक ८ पासून ते २१ पर्यंतच्या कलमांत राष्ट्रसंघ जागतिक शांतता कशी टिकवू शकेल याचा आढावा घेण्यात आलेला आहे व आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी राष्ट्रसंघ काय करू शकेल याची माहिती २२ ते २५ या कलमानुक्रमे सांगण्यात आली आहे. ती अशी :

कलम १.– ज्या वेळी सनद अस्तित्वात आली त्या वेळी स्वाक्षरी करणाऱ्या ४२ राष्ट्रांना या संघटनेचे मूळ सभासद समजण्यात आले. नंतर इतर काही राष्ट्रांना सभासद करून घेण्यात आले.

दोन वर्षांची पूर्वसूचना देऊन या संघटनेमधून सभासद-राष्ट्रे बाहेर पडू शकतील.

कलम २.– राष्ट्रसंघाची तीन प्रमुख अंगे सभा ( Assembly ), समिती ( Council ) व सचिवालय ( Secretariate ). या अंगांमार्फत संघटनेचे कार्य चालू राहील.

कलम ३.– सभेमध्ये प्रत्येक राष्ट्राचे तीन प्रतिनिधी राहतील पण प्रत्येक राष्ट्राला मत मात्र एकच राहील.

कलम ४.– समितीमध्ये इंग्लंड, फ्रान्स, इटली व जपान हे कायम सभासद राहतील व आणखी त्यात दुसरे सहा तात्पुरते सभासद सभेकडून निवडले जातील. याशिवाय जी राष्ट्रे या परिषदेचे सभासद नाहीत पण एखाद्या प्रश्नात त्यांचे हितसंबंध गुंतले असतील तर ते आपले प्रतिनिधी पाठवू शकतील. तसेच सनदेच्या कक्षेत येणारे सर्व विषय व जागतिक शांततेचा प्रश्नही परिषद व सभा हाताळील.

कलम ५.– सर्व महत्त्वाच्या प्रश्नांवर समिती किंवा सभा यांतील सर्व सभासदांचे एकमत होणे आवश्यक राहील.

कलम ६.– या कलमान्वये कायम सचिवालयाची स्थापना करण्यात येईल.

कलम ७.– जिनेव्हा हे त्यांचे मुख्य ठिकाण राहील.

कलम ८.– सर्व सभासद-राष्ट्रांच्या मतानुसार जागतिक शांततेच्या दृष्टीने शस्त्रकपातीची योजना समितीकडून मांडण्यात येईल.

कलम ९.– या कलमान्वयें कायम स्वरूपाची लष्करविषयक सल्लागार समिती नेमण्यात येईल.

कलम १०.– प्रत्येक सभासद-राष्ट्राला प्रादेशिक स्वायत्ततेची हमी इतर राष्ट्रांनी दिली.

कलम ११.–जागतिक शांततेला धोका निर्माण करणारी कोणतीही परिस्थिती निर्माण झाल्यास तो प्रश्न चर्चेसाठी कोणीतेही सभासद-राष्ट्र समितीसमोर मांडू शकेल.

कलम १२.–सभासद-राष्ट्रांनी परस्परांना कबुली दिली की आपापसांतील मतभेद न्यायालय, लवाद अथवा समितीच्या चौकशी-मंडळामार्फत सोडवतील. अहवाल जाहीर केल्यापासून तीन महिन्यांची मुदत संपेपर्यंत कोणत्याही परिस्थितीत युद्धमार्गाचा वापर करणार नाहीत.

कलम १३.– या कलमान्वये आंतरराष्ट्रीय कायद्याच्या क्षेत्रातील प्रश्न लवादाकडे सोपविण्यात येतील.

कलम १४.– या कलमान्वये एक कायम स्वरूपाचे आंतरराष्ट्रीय न्यायालय स्थापन करण्यात येईल.

कलम १५.– परस्पर राष्ट्रांमध्ये निकालात न निघालेल्या प्रश्नावर समिती विचार करील व दोन्ही पक्षांना मान्य होईल अशी तडजोड करण्याचा प्रयत्न करील. ही तडजोड न झाल्यास, व समितीचा निर्णय एकमतानुसार असेल तर तडजोड मान्य करणाऱ्या राष्ट्राच्या विरुद्ध सभासद-राष्ट्रे युद्ध करणार नाहीत.

कलम १६.–जर एखाद्या राष्ट्राने राष्ट्रसंघाच्या सनदेच्या कलमाचे उल्लंघन केले तर त्याच्या विरुद्ध उपाययोजना करण्यासाठी राजकीय दडपण आणणे, नाकेबंदी करणे व जरूर पडल्यास सैन्यबळाचा उपयोग करण्याबाबत सभासद-राष्ट्रांनी परस्परांना कबुली दिली आहे.

कलम १७.– राष्ट्रसंघातील सभासद-राष्ट्रे व बिगर-सभासद-राष्ट्रे यांच्यात होणाऱ्या तंट्याबाबत या कलमात तरतूद करण्यात आली आहे.

कलम १८.– कोणताही आंतरराष्ट्रीय करार राष्ट्रसंघाच्या सचिवालयात नोंद केल्याशिवाय कोणालाही बंधनकारक असणार नाही.

कलम १९.– ज्या करारांची मुदत संपली आहे, अशा करारांचा पुनर्विचार करावयाच्या शिफारशीचा अधिकार राष्ट्रसंघाच्या सभेला देण्यात आला आहे.

कलम २०.– सनदेच्या विरुद्ध असणारे करार (उदा. आक्रमक लष्करी करार,) पाळण्याचे सभासद-राष्ट्रावर उत्तरदायित्व असणार नाही.

कलम २१.– जागतिक शांतता राखण्याचे करार पाळण्याची जबाबदारी मात्र त्यांच्यावर राहील.

कलम २२.– या कलमान्वये अविकसित प्रदेशाच्या विकासासाठी कायम प्रादेशिक मंडळ पद्धतीची तरतूद करण्यात आली आहे.

कलम २३.– आंतरराष्ट्रीय सामाजिक व आर्थिक कार्याच्या क्षेत्रात नियंत्रण ठेवण्याचे व देखरेख करण्याचे अधिकार राष्ट्रसंघाला देण्यात आले आहेत.

कलम २४.– यापुढे सर्व आंतरराष्ट्रीय कार्यालये राष्ट्रसंघाच्या आधिपत्याखाली राहतील.

कलम २५.– शांततेच्या काळात आंतरराष्ट्रीय "रेड क्रॉसच्या" चळवळीला प्रोत्साहन देण्यात येईल.

कलम २६.– राष्ट्रसंघाच्या सनदेत दुरुस्ती करावयाची तरतूद व पद्धती या कलमावन्ये करण्यात आली आहे.

***

# परिशिष्ट २ रे

## संदर्भसूची


| अ. नं. | लेखक | ग्रंथाचे नाव |
|---|---|---|
| 1. | Hans Aufricht. | Guide to League of Nations Publications, 1951 edition, Columbia University Press, Newyork. |
| 2. | F. P. Walters. | A History of the League of Nations, volume I, II |
| 3 | -do- | A History of the League of Nations, 1960 Edition, in one volume. |
| 4. | Gerard J. Mangone. | A Short History of International Organization, 1954 Edition. |
| 5. | S. Shivaram and Brijmohan Sharma. | India and the League of Nations. |
| 6. | P. J. Noel Baker. | The League of Nations at Work. |
| 7. | Umesh Chandra Shukla. | International Organization and Institutions. |

| | |
|---|---|
| 8. Ruhl F. Bartlett. | The League to Enforce Peace. |
| 9. 1927 Publication of the League. | The League of Nations and Intellectual Co-operation, Revised Edition, 1927, Information Section, League of Nations Secretariat, Geneva. |
| 10. L. Oppenheim. | International Law. |
| 11. -do- | Encyclopaedia Britannica. |
| 12. Hurtz | International Peace in Nuclear Age. |
| 13. C. D. M. Ketelbey. | A History of Modern Times. |
| 14. Margaret E. Burton. | The Assembly of the League of Nations. |
| 15. Lyman Cromwell White. | International Non-Governmental Organizations. |
| 16. A. J. Grant and Harold Temperley. | Europe in the Nineteeth and Twentieth Centuries ( 1789–1950 ), 6th edition, 1962. |
| 17. J. C. Revill. | World History, 2nd Edition 1962. |
| 18. Gangal S. C. | League of Nations. |
| 19. Bertrand Russell. | Freedom and Organization ( 1814–1914 ). |
| 20. -do- | Human Society in Ethics and Politics. |
| 21. George W. Southgate. | A Text Book of Modern European History ( 1789–1945 ), 1957 Edition, M/s J. M. Dent K. Sons, Ltd., London, Rs. 6/- |

22. Julia E. Johnson. — Reconstituting the League of Nations.

23. Henry Noel Brailsford. — A League of Nations

24. Harold J. Laski. — A Grammar of Politics.

25. Sir Geoffray. — A Handbook to the League of Nations.

26. Richard I. Miller. — Dag Hammarskjold and Crisis Diplomacy.

27. H. A. Davias. — An Outline History of the World.

28. Dr. V. D. Mahajan. — International Law.

29. Dr. Tara Chand. — Dumbarton Oaks Proposals, Indian Council of World Affairs, Paper; 3, New-Delhi, 1945 A. D.

३०. स. शं. देसाई, — पहिले जागतिक महायुद्ध.

३१. प्रा. व. ग. सिरसीकर, — आधुनिक जगाचा इतिहास.

३२. द. श्री. मराठे, — जगाचा इतिहास.

३३. आचार्य जावडेकर, — आधुनिक राज्यमिमांसा.

३४. डॉ. ना. य. डोळे, — जागतिक राजकारणात भारत.

३७. ,, — युनो.

# परिशिष्ट ३ रे

## विश्वशांतीचा प्रचार करण्यासाठी आवाहन

१.– युद्धाचे दुष्परिणाम समजावून सांगणे.

२.– युद्धात भाग न घेण्यासाठी शांततेचा सहेतुक पुरस्कार करणे.

३.– निःशस्त्रीकरणासाठी व शस्त्रास्त्रांची निर्मिती थांबविण्यासाठी प्रचार करणे.

४.– युद्ध होऊ नये व करावयाचे नाही असे कायदे करणे, अथवा अभिवचन देणे.

५.– सामुदायिक संरक्षणयोजना मांडणे.

६.– जागतिक सरकारचा पुरस्कार करणे.

७.– मित्रमंडळींशी आणि आप्तेष्टांशी संयुक्त राष्ट्रसंघाबाबत वेळ प्रसंगी चर्चा होत असताना गैरसमज पसरले जाऊ नयेत याबाबत दक्षता घेणे व जागतिक शांतता व सहकार्य या दृष्टीने युनोचे महत्त्व समजावून देणे.

८.– स्थानिक शिक्षणसंस्थांना युनोबाबत अधिकाधिक माहिती देण्याबाबत प्रोत्साहन देणे. तसेच वृत्तपत्रे, मासिके आणि नभोवाणी मार्फत संयुक्त राष्ट्र यांच्या, कार्याबाबत अधिक प्रचार करणे.

९.– United Nations Information Test ( United Schools Organiration of India, Arya Samaj Road, New Delhi —5 ) ची केंद्र व युनेस्को क्लब विद्यालयात उघडणे.

मराठी



१०. - आपल्या राष्ट्रातील ( U. N. ) संयुक्त राष्ट्रांच्या कार्यालयाशी संपर्क साधून एक संघ स्थापन करणे, असा संघ जवळपास अस्तित्वात नसेल तर संघ स्थापन करण्यास मार्गदर्शन घेण्याकरिता United Nations, New York किंवा United Nations Information Centre, 21, Curzon Road, New-Dehli— , या कडे विचारणा करणे.

११.– युनोच्या कार्याविषयी आस्था व माहिती असणाऱ्या तज्ज्ञांची व्याख्याने घडवून आणणे. आणि अशा विद्वान लोकांचे स्वागत करणे.


१२.– (UNESCO gift Coupons व UICEF greeting Cards) युनोस्कोची भेटकार्डे वेळप्रसंगी विकत घेऊन ( FA )) अन्न आणि शेतकी संघटना या संस्थेच्या कार्यात सहकार्य करणे.

१३.– सामाजिक संस्थांना युनोच्या कार्याविषयीचे महत्त्व पटवून देऊन युनोच्या कार्यात सहभागी होण्याचे आवाहन करणे.

१४.– सार्वजनिकरीत्या साजऱ्या केलेल्या समारंभामध्ये संयुक्त राष्ट्र ( युनो ) दिनासारखे सर्व जगभर पाळले जाणारे समारंभ जाणिवपूर्वक साजरे करणे.

१५.– तसेच मानवी हक्क ( १० डिसेंबर) साजरा करून जागतिक हक्काची नागरिकांना कल्पना देणे.

***



राष्ट्रसंघाची मुद्रा ( मोनोग्राम )

मराठी ग्रंथ संग्रहालय
१८१६४

REFBK-0018165